# लोकराज्य

जुलै २०२३/पाने ६८/किंमत ₹१०



## आशीर्वाद जनतेचे...
## पहिले वर्ष सुराज्याचे!

आज़ादी का अमृत महोत्सव | सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन | G20 भारत 2023 INDIA



**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

# योजना कल्याणकारी सर्वसामान्यांच्या दारी!




## अंमलबजावणी वेगवान

## अभियानाची वैशिष्ट्ये

प्रत्येक जिल्ह्यात किमान ७५००० लाभार्थ्यांना एकाच छताखाली लाभ देण्यात येणार

शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ, कमीतकमी कागदपत्रे आणि जलद मंजुरी

पहिल्यांदाच सर्व प्रशासन 'हर घर दस्तक' च्या माध्यमातून प्रत्येकाला योजनांची माहिती देणार



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

# अंतरंग




## ६ महाराष्ट्राच्या गतिमान विकासाचा संकल्प

गेले वर्षभर काम करताना दररोजचा दिवस नवा होताच. पण आव्हानेही खूप होती. तुलनेने वेळ कमी होता. त्यामुळे सुरुवातीपासूनच कामाचा झपाटा लावला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साथीने कोरोनामुळे आलेले मळभ झटकून टाकले. आमच्या सरकारच्या अनेक उपक्रमांना लोकांची उत्तम साथ मिळते आहे.

## ध्यास विकसित महाराष्ट्राचा! १०

सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत, यासाठी एक विकासयात्रा २०१४ ते २०१९ सुरू होती. त्याला पुढच्या २.५ वर्षांत खीळ बसली. त्यानंतर ३० जून २०२२ ला राज्यात सर्वसामान्य जनतेच्या मनातील आपले सरकार अस्तित्वात आले. या सरकारचा पायाच भक्कम आहे. कारण लोकशाहीत अपेक्षित जनादेशाचा सन्मान हा या सरकारचा भक्कम पाया आहे. अडीच वर्षे मागे पडलेला हा विकासाचा अध्याय आता नव्याने सुरू झाला आहे.

| | |
|---|---|
| महाराष्ट्राच्या गतिमान विकासाचा संकल्प | ६ |
| ध्यास विकसित महाराष्ट्राचा! | १० |
| पारदर्शक कामकाजावर भर | १४ |
| समृद्ध सांस्कृतिक वारसा | १७ |
| विद्यार्थीहिताला प्राधान्य | २० |
| विकासासाठी कटिबद्ध | २३ |
| शाश्वत विकासाचे ध्येय | २६ |
| लोकाभिमुख शासन | २९ |
| जलवाहतुकीला प्राधान्य | ३२ |
| आधुनिक तंत्रज्ञानावर भर | ३४ |
| कामगारांचे सबलीकरण | ३७ |
| विकास हाच केंद्रबिंदू | ४० |
| उद्योजकांची पसंती | ४३ |
| आरोग्यम् सुखसंपदा | ४६ |
| पायाभूत सुविधांची उभारणी | ४९ |
| कृषी क्षेत्रात अग्रेसर | ५२ |
| पारदर्शक आणि गतिमान | ५५ |
| सहकारातून समृद्धी | ५८ |
| विकासासाठी भरीव कामगिरी | ६१ |
| कुशल आणि रोजगारयुक्त | ६३ |
| मंत्रिमंडळात ठरले | ६६ |

वर्ष ७४ वे | अंक ९ | जुलै २०२३

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# शासकीय ई-बाजारात महाराष्ट्राची उल्लेखनीय कामगिरी

महाराष्ट्राने शासकीय ई-बाजारात लक्षणीय कामगिरी केल्याबद्दल राज्याला विविध श्रेणीत एकूण ५ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्यावतीने येथील वाणिज्य भवनात शासकीय-ई-बाजारपेठेला प्रोत्साहन देण्यासाठी ‘क्रेता-विक्रेता गौरव पुरस्कार २०२३’ प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री अनुप्रिया पटेल तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



केंद्र शासनाने शासकीय-ई-बाजारपेठ प्रणाली २०१६ पासून विकसित केली असून या अंतर्गत शासनाला लागत असलेल्या सेवासामग्रीचा पुरवठा जेमच्या माध्यमातून केला जातो. राज्य शासन, विविध विभाग, महिला उद्योजक, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांना या माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळत आहे. यामध्ये महाराष्ट्राने उल्लेखनीय अशी कामगिरी केलेली आहे. यासाठी विविध श्रेणीत महाराष्ट्राला ५ ‘क्रेता-विक्रेता गौरव पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले.

## पाच श्रेणीत राज्याला पुरस्कार

राज्याने सन २०२२-२३ मध्ये जेम प्रणालीवरून ४,१३० कोटी रुपयांची खरेदी करून देशात तिसरे स्थान पटकावून सिल्वर पुरस्काराचा मान मिळविला. स्टार्टअप-उद्योजकांच्या खरेदीमध्ये राज्याने दुसरे स्थान मिळविले असून, यासाठी गोल्ड पुरस्कार प्रदान करण्यात आला. अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती उद्योजकांच्या खरेदीमध्ये राज्याने चांगली कामगिरी केल्याने या श्रेणीत राज्याचा दुसरा क्रमांक आलेला असून गोल्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सूक्ष्म व लघु उपक्रमांमार्फतच्या खरेदीमध्ये राज्य तिसऱ्या क्रमांकावर असून यासाठी सिल्वर पुरस्कार प्रदान करण्यात आला. महिला उद्योजकांमार्फतच्या खरेदी या श्रेणीमध्ये राज्याने तिसरा क्रमांक मिळवून राज्य सिल्वर पुरस्काराचे मानकरी ठरले. या सर्व श्रेणीतील पुरस्कार उद्योग संचालनालयाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांनी केंद्रीय वाणिज्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या हस्ते स्वीकारले. उद्योग सहसंचालक (खरेदी धोरण) विजू सिरसाठ या यावेळी उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र विकासाची वर्षपूर्ती

महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास हे ध्येय घेऊन राज्यात सत्तेवर आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ३० जून २०२३ रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. या वर्षभरात देशपातळीवरच नव्हे, तर जागतिक स्तरावर महाराष्ट्र कुठे असावा, याचा एक रोडमॅप घेऊन, येथील सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवण्याच्या दृष्टीने जोरकस प्रयत्न झाले, अर्थात ते पूर्णत्वासही गेले आणि जात आहेत. महाराष्ट्राच्या विकासाचा अध्याय नव्याने सुरू झाला आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच सर्वसामान्य माणसाच्या जीवनात गुणात्मक बदल घडून येतील, असे लोककल्याणकारी निर्णय घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी या सरकारने सुरू केली. अल्पावधीतच हे सरकार जनतेच्या मनातील इच्छा-आकांक्षा पूर्ण करणारे सरकार म्हणून ख्यातिप्राप्त ठरले आहे.

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्याची संधी सरकारला मिळाली. 'शासन आपल्या दारी' या मोहिमेच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी योजना नागरिकांपर्यंत शासन घेऊन जात आहे.




पायाभूत सुविधा व सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय मोठ्या प्रमाणावर घेतले जात आहेत. राज्याच्या विकासात भरीव योगदान देणारा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग अंतिम टप्प्यात आहे. वडसा देसाईगंज-गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, पुणे व नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. विदर्भासाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे.

राज्याची अर्थव्यवस्था प्रगतिपथावर असून कृषी क्षेत्राबरोबरच उत्पादन क्षेत्रावरही विशेष भर देण्यात येत आहे. सेवा क्षेत्राला अधिक गती देण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ध्येयधोरणातील पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेत, वन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे योगदान देणारे महाराष्ट्र पहिले राज्य असेल. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध क्षेत्रातील विकास प्रकल्प आणि विशेष क्षेत्र निवडून त्यामधील गुंतवणूक वाढीवर, तसेच उत्पादन क्षेत्रावर भर देऊन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीकडे वाटचाल करून भर देण्यात येत आहे.

महाराष्ट्र हे उत्पादन, तंत्रज्ञान आणि स्टार्टअप क्षेत्रात अग्रगण्य आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात राज्याचा मोठा हिस्सा असल्याने महाराष्ट्र भारताचे पॉवरहाऊस आहे. दावोस परिषदेत जगभरातील विविध कंपन्यांसोबत सुमारे १.३७ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले. या माध्यमातून राज्यात एक लाख रोजगार निर्माण होतील. महाराष्ट्रात ९ लॉजिस्टिक पार्क उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात स्टार्टअप्स वाढीसाठी प्रोत्साहन देण्यात येत असून त्यासाठी आवश्यक इको सिस्टीमवर भर देण्यात येत आहे.

मुंबईचा कायापालट करण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मुंबईतील म्हाडा आणि एसआरएच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गृहनिर्माणाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मुंबई हे आय-लॅण्ड शहर असून एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी कमीतकमी वेळ लागावा, यासाठी मेट्रो, ट्रान्सहार्बर लिंक, कोस्टल रोड यांसारखे प्रकल्प हाती घेण्यात आले असून ते आता लवकरच पूर्णत्वाकडे जाणार आहेत. तब्बल ३३७ कि.मी. मेट्रोचे जाळे उभारले जात असून ही कामे पूर्ण झाल्यानंतर सुमारे १९ लाख प्रवासी मेट्रोमधून प्रवास करतील. कोस्टल रोडमुळे दळणवळण अधिक गतीने होईल. सध्या सुमारे ९० लाख प्रवासी लोकलमधून प्रवास करतात, तर मेट्रोमधून ८० लाख लोक प्रवास करू शकणार आहेत. यामुळे प्रवास करणे सुलभ होऊन वेळेची बचत होणार आहे. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्प हा २२ कि.मी.चा देशातील सर्वात लांब समुद्री मार्ग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टी आणि पाठबळाच्या जोरावर सरकारने करून दाखवला. नवी मुंबईतील विमानतळाजवळील नैना प्रकल्प तिसरी मुंबई म्हणून ओळखला जात असून, बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या विकासक, गुंतवणूकदारांना शासनाकडून काही सवलती देण्यासंदर्भात आवश्यक ती पावले उचलण्यात आली आहेत.

सर्वसामान्य नागरिक व राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जे काही निर्णय घ्यावे लागतील ते सरकार घेत आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांना, मग ती मेट्रो असो, बुलेट ट्रेन असो की, समृद्धी महामार्ग सर्व प्रकल्पांना गती मिळाली आहे. सामान्य माणसापासून ते पायाभूत सुविधेच्या प्रकल्पांपर्यंत सर्वत्र विकासाचे चक्र पुन्हा गतिमान झाले आहे. हा क्रम असाच सुरू राहील. खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे सरकार म्हणूनच जनतेची अपेक्षापूर्ती होईल. आरोग्यपूर्ण, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्राचे शासनाचे प्रयत्न आपल्या सर्वांच्या साथीने निश्चितपणे पूर्णत्वास जातील. या वर्षपूर्तीच्या निमित्ताने शासनाच्या विविध विभागांतर्गत गेल्या वर्षभरात घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्याचा प्रयत्न म्हणजे 'लोकराज्य'चा हा विशेषांक होय. हा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. हा वर्षपूर्ती विशेषांक वाचकांच्या पसंतीस पडेल, असा विश्वास आहे.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

गेले वर्षभर काम करताना दररोजचा दिवस नवा होताच; पण आव्हानेही खूप होती. तुलनेने वेळ कमी होता. त्यामुळे सुरुवातीपासूनच कामाचा झपाटा लावला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साथीने कोरोनामुळे आलेले मळभ झटकून टाकले. आमच्या सरकारच्या अनेक उपक्रमांना लोकांची उत्तम साथ मिळत आहे. महाराष्ट्र नव्याने घडवण्यासाठी, अर्थात अनेक संकल्पना अजून बाकी आहेत. हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे हीच भावना आज मनामध्ये आहे. गेल्या वर्षभरात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकींमध्ये सुमारे ३५० हून अधिक महत्त्वाचे निर्णय राज्याच्या विकासासाठी घेतले.

# महाराष्ट्राच्या गतिमान विकासाचा संकल्प





**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

गेले वर्षभर काम करताना दररोजचा दिवस नवा होताच; पण आव्हानेही खूप होती. तुलनेने वेळ कमी होता. त्यामुळे सुरुवातीपासूनच कामाचा झपाटा लावला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साथीने कोरोनामुळे आलेले मळभ झटकून टाकले. लोकांमध्ये उत्साह निर्माण झाला. दहीहंडी पासून सुरुवात केली. वर्षभर सारे सण मोठ्या उत्साहात साजरे झाले. लोकांमध्ये नवा उत्साह जागा झाला होता. आम्हाला त्याची प्रचितीही येत होती. त्याचबरोबर महाराष्ट्रात असलेल्या आव्हानांचीही कल्पना होती. अनेक प्रकल्प रेंगाळलेले होते. मुंबई आणि परिसरातील दाटीवाटीच्या लोकसंख्येमुळे इथल्या समस्या वेगळ्या होत्या. इथे नव्या पायाभूत सुविधांची गरज होती. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये कनेक्टिव्हिटीची मोठी समस्या होती. त्यामुळे डोक्यात 'समृद्धी'चे स्वप्न घर करून बसले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जेव्हा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे उद्घाटन झाले, तेव्हा मनापासून आनंद झाला. मंत्री झाल्यापासून हा 'गेमचेंजर' प्रकल्प पूर्ण व्हावा, यासाठी झटत होतो. मुख्यमंत्री झाल्यानंतर हा प्रकल्प पूर्ण झाला याचा विशेष आनंदही वाटला.

### समृद्धी महामार्ग

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गामुळे नागपूर ते मुंबई हे १४ तासांचे अंतर अवघ्या सहा ते आठ तासांवर आले. या ७०१ कि.मी.च्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तब्बल १० हजार हेक्टर जमिनीच्या अधिग्रहणाचे शिवधनुष्य यशस्वीरीत्या उचलून या ५५ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम जवळपास पूर्णदेखील होत आले आहे. पायाभूत सुविधांच्या मोठ्या प्रकल्पांसाठी हल्ली जमीन अधिग्रहण ही मोठी समस्या बनल्यामुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे दिसून येते; परंतु समृद्धी महामार्ग प्रकल्पासाठी स्वतः विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. आजवरचे नुकसानभरपाईचे सर्वोत्तम पॅकेज दिले. शेतकऱ्यांच्या खात्यात आरटीजीएसने पैसे जमा केले आणि मगच खरेदीखतावर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या. इतकेच नव्हे, तर विटनेस म्हणून स्वतः या कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या. नुकसानभरपाईसाठी सरकारी कार्यालयात खेटे मारावे लागत नाहीत, लाच द्यावी लागत नाही, हे पाहून शेतकऱ्यांच्या मनात विश्वास निर्माण झाला आणि या प्रकल्पासमोरील अडथळे दूर झाले. १० जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावांना लाभदायक ठरणारा हा प्रकल्प आणखी १४ जिल्ह्यांनाही अप्रत्यक्षपणे जोडणारा आहे. महामार्गालगत २० ठिकाणी कृषी समृद्धी केंद्रे विकसित करून शेतीशी निगडित लॉजिस्टिक्स, फूड प्रोसेसिंग, हॉस्पिटॅलिटी आदी उद्योगांना

पहिले वर्ष सुराज्याचे

चालना देऊन त्यातून रोजगारनिर्मितीवर भर दिला जात आहे. कृषिमाल वेळेत मुंबईसारख्या आर्थिक बाजारपेठेत पोहोचल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्याबरोबरच निर्यातीलादेखील चालना मिळणार आहे.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी प्रवास मोफत



देशाच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यातील ७५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी प्रवास मोफत करण्यात आला. त्याचबरोबर महिलांना या प्रवासामध्ये ५० टक्के सूटही देण्यात आली. या निर्णयामुळे मरगळलेली एसटीची व्यवस्था पुन्हा एकदा सुस्थितीत येऊ लागली. महाराष्ट्रातील तरुणांच्या हाताला काम मिळावे, यासाठी रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली. पोलीस भरतीची प्रक्रिया वेगाने सुरू केली. विविध प्रवर्गातील थेट नियुक्तीचे पत्रच देण्यात आले.

जवळपास दीड लाख तरुणांना रोजगार देण्याचे काम वेगाने सुरू आहे. कौशल्य विकास विभागामार्फत महारोजगार मेळावेही राज्यभर घेतले जात आहेत, त्याचाही फायदा तरुणांना होताना दिसतो आहे. गेल्या वर्षभरात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकींमध्ये सुमारे ३५०हून अधिक महत्त्वाचे निर्णय राज्याच्या विकासासाठी घेतले व ते निर्णय लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'शासन आपल्या दारी'सारखा उपक्रमही राबवण्यात येत आहे. त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या वर्षात काही प्रकल्पांवर विशेष लक्ष दिले. त्यावर टीम कामाला लावली. त्यामुळे दोन्ही प्रकल्प लवकर मार्गी लागत आहेत.



## सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती

पायाभूत सुविधांसाठी जसे महानगरांकडे लक्ष दिले. तसेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजीही घेतली. विशेषतः गेल्या वर्षभरामध्ये सततच्या पावसामुळे बळीराजाचे मोठे नुकसान झाले, त्यासाठी सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित केली. आतापर्यंत सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानासाठी सुमारे ७५५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. तसेच या कालावधीतील नुकसानासाठी ६२ लाख ६० हजार शेतकऱ्यांना सुमारे सात हजार कोटी रुपयांचा निधीही वाटप करण्यात आला. एनडीआरएफच्या निकषांमध्ये बदल करण्यात आले. त्याचा मोठा फायदा बळीराजाला होताना दिसला.

## मुंबई-पुणे मिसिंग लिंक

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गामुळे मुंबई ते पुणे हे अंतर अडीच ते तीन तासांवर आले. त्याचबरोबर पुण्यात शिक्षण आणि सेवा उद्योग विकसित होऊन पुण्याचा कायापालट झाला. मात्र वाढत्या वर्दळीमुळे, विशेषतः घाट मार्गात वाहतूक कोंडीची समस्या वारंवार उद्‌भवत असून अपघातांचे प्रमाणही मोठे होते. त्यामुळे या महामार्गाच्या क्षमताविस्ताराचे काम हाती घेण्यात आले. याअंतर्गत खालापूर ते खोपोली इंटरचेंज या अस्तित्वातील ६.५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे ८ पदरीकरण आणि खोपोली एग्झिट ते कुसगाव (सिंहगड संस्था) या १३.३ कि.मी.मध्ये दोन बोगदे व दोन व्हाया डक्टसह एकूण १९.८० कि.मी. लांबीचा ८ पदरी रस्ता करण्यात येत आहे. त्यामुळे खोपोली एग्झिट ते सिंहगड संस्था हे १९ कि.मी.चे अंतर ६ कि.मी.ने कमी होऊन प्रवासीवेळेत २० ते २५ मिनिटांची बचत होईल. घाटातील वाहतूक कोंडी सुटेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होईल. संपूर्ण प्रकल्प अंदाजे ६,७०० कोटी रुपयांचा आहे. प्रकल्पाचे काम दोन पॅकेजमध्ये करण्यात येत असून जम्मू-काश्मीरमध्ये भुयारी मार्गांचे काम करण्याचा अनुभव असलेल्या कंपन्यांना या प्रकल्पाचे काम देण्यात आले आहे. या प्रकल्पात होणारा टनेल हा आशिया खंडातील सर्वाधिक रुंदीचा टनेल आहे.

मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीवर होत असलेला कोस्टल महामार्ग प्रकल्पातील वांद्रे-वर्सोवा सी-लिंक हा महत्त्वाचा टप्पा आहे. ९ कि.मी. लांबीचा हा पूल असून प्रकल्पासाठी वनविभागाची परवानगी घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. कास्टिंग यार्डसाठी जागेचा शोध सुरू असून प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली आहे. केबल स्टेड पद्धतीने पूल बांधण्यात येणार असून एकूण ११ हजार कोटींचा हा प्रकल्प एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

## वाशी येथे तिसरा पूल

मुंबई-पुणे महामार्गाला जोडणारा शीव-पनवेल हा वर्दळीचा रस्ता १० पदरी आहे. मात्र या रस्त्याचा महत्त्वाचा भाग असलेला सध्याचा वाशी येथील खाडीपूल केवळ ६

पदरी असल्यामुळे गेल्या काही वर्षांपासून येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत होती. त्यावर उतारा म्हणून अस्तित्वातील दोन पुलांना समांतर अशा तिसऱ्या खाडी पुलाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. नवा पूल ६ पदरी असून त्याचे वेगाने काम सुरू आहे.

### ठाणे-बोरिवली भुयारी मार्ग

ठाण्याहून बोरिवलीला घोडबंदर रस्त्यामार्गे जाण्यासाठी किमान एक ते दीड तास लागतो. वाहतूक कोंडीमुळे वेळ आणि इंधनाचा अपव्यय होतो, तसेच पर्यावरणाचेही नुकसान होते. त्यामुळे पर्यायी मार्ग म्हणून ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाची संकल्पना मांडली. या ११ कि.मी. च्या रस्त्यामुळे ठाणे ते बोरिवली हे अंतर केवळ १० मिनिटांत पार करता येणार असून घोडबंदर रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडीही कमी होईल; तसेच इंधन आणि वेळेची बचत, प्रदूषणात घट होणार आहे. या प्रकल्पांतर्गत १० कि.मी.चा बोगदा बनवण्यात येणार असून ठाण्यातील टिकुजिनी वाडी येथून त्याची सुरुवात होणार आहे.

### क्लस्टर डेव्हलपमेंट

ठाण्यातील धोकादायक बेकायदा इमारतीत जीव मुठीत धरून राहणाऱ्या लक्षावधी ठाणेकरांचा प्रश्न मोठा होता. दरवर्षी काही इमारती कोसळून निष्पाप लोकांचे बळी जात होते. या इमारतींचा पुनर्विकास हा एकमेव उपाय होता. समूह विकास पद्धतीने येथे संपूर्ण परिसराचा विकास करण्याचा निर्णय घेतला आणि तेथील रहिवाशांना विश्वासात घेऊन त्याचे कामही सुरू केले. ठाण्यात तब्बल १,५०० हेक्टरवर हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येत असून, त्यामुळे ठाण्याला नव्याने नियोजनबद्धरीत्या विकसित करण्याची अपूर्व संधी मिळणार आहे. राज्यासाठी हा पथदर्शी प्रकल्प ठरू शकतो.

### 'एमटीएचएल' प्रकल्प

मुंबई पारबंदर प्रकल्पांतर्गत 'एमटीएचएल' या महत्त्वाकांक्षी समुद्री पुलाची मुख्य भूमीशी प्रत्यक्ष जोडणी करण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येईल. हा प्रकल्प मुंबई, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती पालटून टाकणारा ठरणार आहे. हा २२ किलोमीटर लांबीचा सागरी पूल आहे. हा पूल तीन अधिक तीन अशा सहा लेनचा आहे. या पुलाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या पुलाचा १६.५ किलोमीटरचा टप्पा हा समुद्रावर आहे. उर्वरित म्हणजेच साडेपाच






किलोमीटरचा टप्पा हा मुख्य भूमीवर आहे. या प्रकल्पाचे काम एकूण चार टप्प्यात केले जात आहे. या मुंबई ट्रान्सहार्बर लिंक मार्गाला मुंबईच्या बाजूने शिवडी आणि नवी मुंबईच्या बाजूने शिवाजीनगर आणि चिर्ले येथे इंटरचेंज देण्यात आले आहेत. या प्रकल्पाचे सध्या ९४% काम पूर्ण झाले असून उर्वरित सहा टक्के काम युद्धपातळीवर सुरू आहे.

याशिवाय मुंबई खड्डेमुक्त करण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने वेगाने वाटचाल सुरू केली. मुंबईच्या सर्व महत्त्वाच्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यासाठी निर्णय घेतले. जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे असावे यासाठी चंग बांधला. तसेच जी-२० परिषदेच्या निमित्ताने राज्यातील चार शहरांचे सुशोभीकरणही करण्याचा निर्णय घेतला. मुंबई शहरात झालेला बदल येथील प्रत्येक नागरिकाला आवडला. अनेकांनी तशा भावनाही बोलून दाखवल्या. खरे तर इतक्या कमी कालावधीत मुंबईसारख्या शहरात एवढा मोठा दिसणारा बदल हा सर्वांनाच अचंबित करणार होता; परंतु सर्वांच्या सहकार्याने एक टीमवर्क या नात्याने हा बदल आम्ही घडवू शकलो. सरकारच्या अनेक उपक्रमांना लोकांची उत्तम साथ मिळत आहे. महाराष्ट्र नव्याने घडवण्यासाठी अर्थात अनेक संकल्पना अजून बाकी आहेत. हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे, हीच भावना आज मनामध्ये आहे. राज्यातील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे हीच माझ्या मनाची मनीषा आहे. आमचे प्रयत्न त्या दृष्टीने सुरू आहेत.

***जय हिंद.. जय महाराष्ट्र..***

# ध्यास विकसित महाराष्ट्राचा!

**देशपातळीवरच नव्हे, तर जागतिक स्तरावर महाराष्ट्र कुठे असावा, याचा एक रोडमॅप घेऊन, येथील सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत, यासाठी २०१४ ते २०१९ या वर्षांत एक विकासयात्रा सुरू होती. त्याला पुढच्या २.५ वर्षांत खीळ बसली. त्यानंतर ३० जून २०२२ ला राज्यात सर्वसामान्य जनतेच्या मनातील आपले सरकार अस्तित्वात आले. या सरकारचा पायाच भक्कम आहे. कारण लोकशाहीत अपेक्षित जनादेशाचा सन्मान हा या सरकारचा भक्कम पाया आहे. अडीच वर्षे मागे पडलेला हा विकासाचा अध्याय आता नव्याने सुरू झाला आहे.**






**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

वर्षभरातच त्या अडीच वर्षांचा विकासाचा अनुशेष आपण भरून काढत विकासाचे इंजिन रुळावर आणले. पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच सर्वसामान्य माणसाच्या जीवनात गुणात्मक बदल घडून येतील, असे लोककल्याणकारी निर्णय घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली.

## प्रकल्पांच्या कामांना गती

गेल्या वर्षभरात काय बदलले, असा प्रश्न मला विचाराल तर मी एका शब्दात उत्तर देईन ते म्हणजे दृष्टिकोन. आम्ही प्रश्नांना कुरवाळत बसलो नाही. इच्छा असेल तर मार्ग निघतो. निळवंडे धरण या नावाने ओळखला जाणारा हा ऊर्ध्व प्रवरा प्रकल्प ५३ वर्षांपासून रखडला होता. रखडत-रखडत ८ कोटींचा असलेला हा प्रकल्प ५ हजार कोटींच्या पलीकडे गेला. कोट्यवधी रुपये खर्च करूनही या धरणाचा उद्देश यशस्वी होऊ शकला नाही. मात्र आपण समाजातील सर्व लोकांना विश्वासात घेत अडचणींवर मात करत डाव्या कालव्यात पाणी सोडण्याची चाचणी यशस्वी केली. त्यामुळे गेल्या तीन पिढ्यांपासून पाण्याची वाट पाहत थकलेल्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. अकोले, संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी व सिन्नर या तालुक्यांतील १८२ गावांना या प्रकल्पाचा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांची भाग्यरेखा बदलणारा हा प्रकल्प केवळ इच्छाशक्ती आणि लोकसहभागामुळे पूर्ण होऊ शकला. याच धर्तीवर जलसमृद्ध महाराष्ट्रासाठी विविध सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देत प्रकल्पांच्या कामांना गती देण्यात आली असून त्यातून अडीच लाख हेक्टरहून अधिक जमिनींसाठी सिंचन व्यवस्था निर्माण होणार आहे.

## लोककल्याणकारी निर्णय

विकासाचा मार्ग अवलंबताना भविष्याचा, तरुणांचा, शेतकऱ्यांचा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वसामान्य जनतेच्या जीवनात काय सकारात्मक बदल होणार, याचा प्रामुख्याने विचार करूनच निर्णय घेतले की, कामे सहज होतात. आपला उद्देश तळागाळातील जनतेचे कल्याण करण्याचा असला आणि व्यवहार पारदर्शी असेल तर लोक सरकारी योजनेत आपणहून सहभागी होतात. जलयुक्त शिवार योजनेने गावे जलयुक्त झाली. भूजल पातळी वाढली, जिथे एक पीक घेताना अडचण निर्माण होत होती, तिथे आता दोन-तीन पिके घेतली जात आहेत. अडीच वर्षांनी पुन्हा ही योजना राबवली जावी, ही लोकांची, ग्रामीण जनतेची भावना होती. आता ती नव्या स्वरूपात काही काळानुरूप बदल करून आली आहे. जी गावे गेल्यावेळी या योजनेत सहभागी झाली नव्हती, त्यांना आता ही संधी मिळत आहे.

अर्थनियोजन चांगले असले की, लोककल्याणकारी निर्णय घेता येतात, हे आपण अवघ्या वर्षभरात दाखवून दिले आहे. राज्याचा कारभार पारदर्शी करतानाच भ्रष्टाचाराबाबत 'झिरो टॉलरन्स'चे तत्त्व राज्य सरकारने अंगीकारले आहे.

### शासन आपल्या दारी !

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्याची संधी आपल्याला मिळाली. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर राज्य शासन चालत असून सुशासनासाठी आम्ही बांधील आहोत. 'शासन आपल्या दारी' या मोहिमेच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी योजना नागरिकांपर्यंत शासन घेऊन जात आहे. प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधी या योजना त्यांच्यापर्यंत घेऊन जात आहेत. सन्मानपूर्वक योजनांचा लाभ मिळत आहे.

### नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन

पायाभूत सुविधा व सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय मोठ्या प्रमाणावर घेतले जात आहेत. राज्याच्या विकासात भरीव योगदान देणारा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग अंतिम टप्प्यात आहे. वडसा देसाईगंज-गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, पुणे व नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. विदर्भासाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यात मागील काळात जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून रब्बीचे पीक जास्त घेता आले पाहिजे, यासाठी आपण प्रयत्न केले होते. यामुळे ३९ लाख हेक्टर जमीन रब्बी पिकाखाली आली आणि याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला. हे फायदे लक्षात घेऊन नव्या स्वरूपात ही योजना राबवली जात असून त्यातून प्रत्येक गाव जलस्वयंपूर्ण होणार आहे. राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले जात आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात २०२५ पर्यंत राज्यातील २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणली जाईल. २०१६-१७ मध्ये नैसर्गिक शेतीचे अभियान सुरू केल्यानंतर ९.५ लाख हेक्टर शेती नैसर्गिक पद्धतीने होत आहे. दुसऱ्या टप्प्यात हे क्षेत्र वाढवण्यासाठी कृषी व फलोत्पादन विभागाने आखलेल्या कार्यक्रमाला आवश्यक निधी देण्यात येत आहे.

मागील काळात आपले सरकार असताना नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरू केला. या मिशनला गती देण्याचे काम राज्य शासन करत आहे. 'स्मार्ट' प्रकल्पाचे राज्यातील १० हजार गावांमध्ये नियोजन करण्यात आले. या प्रकल्पाच्या माध्यमातून साठवणूक व्यवस्था, विविध श्रृंखला तयार करणे, मार्गदर्शन, बाजाराशी लिंकेज याद्वारे शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करून त्यांना निधी उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे.

### कायदा-सुव्यवस्थेला प्राधान्य

राज्य विकासाच्या मार्गावर जात असताना कायदा व सुव्यवस्था महत्त्वाची असते. विशेषतः महिला, मुले, वृद्धांना आपली जबाबदारी घेणारे सरकार राज्यात आहे, याचा विश्वास वाटला पाहिजे. त्यासाठी पोलीस दलाच्या बळकटीकरणावर भर देण्यात आला. २०१४ पासूनच या कामाला गती देण्यात आली होती. मधला काळ सोडला तर पुन्हा आता पोलीस दलाच्या बळकटीकरणावर भर दिला आहे. लोकसंख्या व तंत्रज्ञानावर आधारित पोलीस स्टेशन्सची निर्मिती केली जात आहे. मुंबईमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा टप्पा-१ पूर्ण झाला असून टप्पा-२ची कार्यवाही सुरू आहे. तसेच राज्यातील सर्व पोलीसठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू आहे. राज्यामध्ये २० हजार पोलिसांची पदे भरण्याच्या प्रक्रियेला वेग देण्यात आला आहे. पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांच्या नैमित्तिक रजा १२ वरून २० इतक्या वाढवण्यात आल्या. ३० जूनपर्यंतचे राजकीय, सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात विविध ठिकाणी जिल्हा तसेच दिवाणी न्यायालये स्थापन करणे व त्यासाठीच्या पदनिर्मितीस मान्यता देण्यात आली आहे. महिला व बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष जलदगती न्यायालयासाठी आवश्यक

पहिले वर्ष सुराज्याचे

नियमित आणि बाह्ययंत्रणेमार्फत पदे भरावयाच्या प्रक्रियेस मान्यता देण्यात आली.

### अर्थव्यवस्थेचे इंजिन

देशाचे ग्रोथ इंजिन महाराष्ट्र आहे. देशाला जर पाच ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे उद्दिष्ट गाठायचे असेल, तर महाराष्ट्राला वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी व्हावेच लागेल. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तिन्ही विकास मंडळांच्या पुनर्गठनासाठी केंद्र सरकारला विनंती करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्याची अर्थव्यवस्था प्रगतिपथावर असून कृषी क्षेत्राबरोबरच उत्पादन क्षेत्रावरही विशेष भर देण्यात आला. सेवा क्षेत्राला अधिक गती देण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ध्येय-धोरणातील पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेत, वन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे योगदान देणारे महाराष्ट्र पहिले राज्य असेल. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध क्षेत्रातील विकास प्रकल्प आणि विशेष क्षेत्र निवडून त्यामधील गुंतवणूक वाढीवर; तसेच उत्पादन क्षेत्रावर भर देऊन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीकडे वाटचाल करून भर देण्यात येत आहे. त्याचबरोबर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आणि ग्रामीण रस्त्यांसाठी नाबार्डच्या योजनांची मदत घेण्यात येईल. जनसामान्यांच्या आणि सर्वच क्षेत्रांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने भरीव तरतुदी करण्यात येणार आहेत.

### उद्योगांना प्रोत्साहन

महाराष्ट्र हे उत्पादन, तंत्रज्ञान आणि स्टार्टअप क्षेत्रात अग्रगण्य आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात राज्याचा मोठा हिस्सा असल्याने महाराष्ट्र भारताचे पॉवरहाऊस आहे. मनुष्यबळ हे आपले बलस्थान आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळात आपण

## निर्णयांची अंमलबजावणी

५जी तंत्रज्ञानासाठी पायाभूत सुविधा वेगाने वाढवण्यासाठी दूरसंचार पायाभूत सुविधा धोरण, औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, तर उस्मानाबादचे धाराशिव नामकरण, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात ७५ हजार पदभरती, राज्यात केंद्राप्रमाणे दिव्यांगांना पदोन्नती आरक्षण धोरण, अतिवृष्टीग्रस्तांना दोनऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत, एनडीआरएफच्या मदतीपेक्षा दुप्पट मदत, सततचा पाऊस आता नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित, केवळ एक रुपयात पीक विमा योजना, 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजना, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ, बाजार समितीच्या निवडणुकींमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार; तसेच निवडणूक लढवण्याचा अधिकार, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान, नवी मुंबई विमानतळाचे 'लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ' नामकरण, नगराध्यक्ष, सरपंचाची निवड थेट जनतेमधून, स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभागाची निर्मिती, शिक्षणसेवकांच्या मानधनात वाढ, राज्यात केंद्रपुरस्कृत महिलांसाठी शक्तिसदन व सखी निवास योजना, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीत वाढ आदी निर्णय राज्याच्या सामाजिक व भौगोलिक विकासाची गती दर्शवतात.

उद्योगांना पायघड्या घातल्या. मात्र मधल्या काळात उद्योग महाराष्ट्रात आले नाहीत. आता वर्षभरापासून परिस्थिती बदलू लागली आहे. उद्योग महाराष्ट्राकडे आस्थेने आणि आशेने बघत आहेत. दावोस परिषदेत जगभरातील विविध कंपन्यांसोबत सुमारे १.३७ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले. या माध्यमातून राज्यात एक लाख रोजगार निर्माण होतील.

महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कायदा २०२२ या विधेयकाच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली असून, यामुळे उद्योगांसाठीची परवानगीप्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ होईल. राज्यात खनिज उत्पादनात वाढ होत असून त्यापासून मिळणाऱ्या महसुलातदेखील वाढ होत आहे. राज्यातील खनिज संपत्तीचा शोध, प्रक्रिया उद्योग, खनिजपट्ट्यांचे वाटप; तसेच खनिज संपत्ती विकासाच्या योजना राबवल्या जात आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात स्वतंत्र खनिकर्म उपविभाग निर्माण करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश व संरक्षण, रेडिमेड गारमेंट उद्योगधोरणांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्रात ९ लॉजिस्टिक पार्क उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. नाशिक, जळगाव, सांगली, अकोला, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, भिवंडी, पुणे येथे हे लॉजिस्टिक पार्क उभारले जात आहेत. जालना येथे 'मल्टिमॉडल लॉजिस्टिक पार्क' उभारण्यासाठी नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. जेएसडब्ल्यू कोकणामध्ये सुमारे ४,२०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल. देशात सुमारे ८० हजार स्टार्टअप्स आणि १०० युनिकॉर्न असून त्यापैकी जवळजवळ १५ हजार स्टार्टअप्स आणि २५ युनिकॉर्न हे एकट्या महाराष्ट्रात आहेत. मुंबई ही फिनटेक स्टार्टअप्स कॅपिटल बनली आहे. राज्यात स्टार्टअप्स वाढीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

## देशाबाहेरही महापुरुषांची थोरवी

रशियातील मॉस्को येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे लोकार्पण, तैलचित्राचे अनावरण करण्याची, तसेच मॉरिशसच्या मोका येथे अखंड हिंदुस्थानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ फूट उंचीच्या अश्वारूढ पुतळ्याचे मॉरिशसचे प्रधानमंत्री प्रवींदकुमार जगन्नाथ यांच्यासह अनावरण करण्याची अलौकिक संधी मला मिळाली. मॉरिशसमधील मराठी मंडळ फेडरेशनला महाराष्ट्र भवनाच्या विस्तारासाठी ४४ दशलक्ष मॉरिशस रुपये अर्थात ८ कोटी रुपये देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. मॉरिशसमधील १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार असून तेथील मराठी आणि महाराष्ट्रीयन बांधवांना राज्याशी सतत संपर्कात राहता यावे, यासाठी एक कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

## सिंचन प्रकल्पांना गती

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसाहाय्यित योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती दिली आहे. रखडलेल्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देताना प्रादेशिक समतोल राखला जाईल, याची काळजी घेतली जात आहे. सुमारे ६ लाख हेक्टरसाठीच्या सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत.

## मुबलक वीज

वीज कृषी व औद्योगिक क्षेत्रासोबतच राज्याच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचा घटक आहे. मुबलक विजेसाठी सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. राज्यात

## उपसा सिंचन योजनांना गती

नांदुरा येथील जिगाव प्रकल्प, ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना, भातसा, वाघूर प्रकल्प, वर्धा बॅरेज उपसा सिंचन योजना, लेंडी लघु पाटबंधारे प्रकल्प, उर्ध्व गोदावरी प्रकल्प, भंडारा जिल्ह्यातील सुरेवाडा उपसा सिंचन योजना, कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, बुलडाणा जिल्ह्यातील दोन लघु पाटबंधारे प्रकल्प, अमरावती जिल्ह्यातील सपन मध्यम प्रकल्प, नाधवडे लघु पाटबंधारे प्रकल्प, कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना, पेंच प्रकल्प, पुरंदर उपसा सिंचन योजना, निरा देवघर पाटबंधारे प्रकल्प, उर्ध्व प्रवरा प्रकल्प, सिंधुदुर्गातील ओटाव लघु पाटबंधारे प्रकल्प, मुक्ताईनगर तालुक्यातील उपसा सिंचन योजना आदी प्रकल्पांच्या विविध कामांना सुधारित मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आल्याने प्रकल्पांना गती मिळाली आहे. वर्षभरात किमान ३९ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले.

पहिले वर्ष सुराज्याचे

२ लाख सौर कृषिपंपांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केंद्रसरकारच्या ‘कुसुम’ योजनेंतर्गत ‘मेडा’तर्फे १ लाख, तर महावितरणच्या माध्यमातून १ लाख सौर कृषिपंपांचे वाटप केले जात आहे. कृषीफिडरला सौरऊर्जेवर आणण्याची योजना आपण यापूर्वी सुरू केली होती, त्याला आता गती देण्यात येत आहे. शेतीपंपांना दिवसा अखंडित आणि भरवशाचा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा दुसरा टप्पा राबवण्याचा त्याचप्रमाणे वर्ष २०२५ पर्यंत ३० टक्के वाहिन्यांना सौरऊर्जेचा पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ राज्यातील ४५ लाख कृषी वीज ग्राहकांना होणार आहे. त्याचबरोबर यामुळे सबसिडीचा भारसुद्धा कमी होणार आहे. यासाठी जी जागा लागेल, त्यासाठी हेक्टरी १.२५ लाख रुपये वार्षिक भाडे (दरवर्षी ३ टक्के वाढीसह) शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळणार आहे. त्याचबरोबर ऊर्जासमृद्ध राज्यासाठी ऊर्जेची मागणी, विद्युत संच, विविध थकबाकी, कोळसा, मनुष्यबळ, भविष्यात राबवण्यात येणारे प्रकल्प, आधुनिकीकरण आदी विषय प्राधान्यक्रमावर ठेवण्यात आले आहेत. विद्युत वितरण प्रणालीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा करून वितरण कंपन्या आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ग्राहकांसाठी प्रिपेड/स्मार्ट मिटर बसवण्यात येत आहे. याचा सुमारे १ कोटी ६६ लाख ग्राहकांना फायदा होणार आहे.

## वेगवान मुंबई!

मुंबई शहर हे आर्थिक, व्यावसायिक आणि मनोरंजनाची राजधानी आहे. त्यामुळे मुंबईचा कायापालट करण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा विशेष हेतू कंपनी मॉडेलच्या माध्यमातून (एसपीव्ही) एकत्रित पुनर्विकास करणे हा असून त्यासाठी ५,०६९ कोटी रुपयांच्या निविदेस मान्यता देण्यात आली आहे. हा शहरी भागातील सर्वांत मोठा प्रकल्प असून या प्रकल्पामुळे संपूर्ण मुंबईचा चेहरा-मोहरा बदलणार आहे. रेल्वेच्या अंदाजे ४५ एकर जागेचा या प्रकल्पात समावेश आहे. मुंबईतील म्हाडा आणि एसआरएच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गृहनिर्माणाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मुंबई हे आय-लॅण्ड शहर असून एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी कमीत कमी वेळ लागावा, यासाठी मेट्रो, ट्रान्सहार्बर लिंक, कोस्टल रोड यांसारखे प्रकल्प हाती घेण्यात आले असून, ते आता लवकरच पूर्णत्वाकडे जाणार आहेत. तब्बल ३३७ कि.मी. मेट्रोचे जाळे उभारले जात असून ही कामे पूर्ण झाल्यानंतर सुमारे १९ लाख प्रवासी मेट्रोमधून प्रवास करतील. कोस्टल रोडमुळे दळणवळण अधिक गतीने होईल. सध्या सुमारे ९० लाख प्रवासी लोकलमधून प्रवास करतात, तर मेट्रोमधून ८० लाख लोक प्रवास करू शकणार आहेत. यामुळे प्रवास करणे सुलभ होऊन वेळेची बचत होणार आहे.

गेली ३५ वर्षे मुंबई ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्पाची केवळ चर्चा व्हायची. मात्र हा २२ कि.मी.चा देशातील सर्वात लांब समुद्रीमार्ग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टी आणि पाठबळाच्या जोरावर आपल्या सरकारने करून दाखवला. तिसऱ्या मुंबईची सामाजिक-आर्थिक परिस्थिती पालटून टाकणारा, राज्याला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीकडे घेऊन जाणाऱ्या या प्रकल्पाचे लवकरच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होईल. या वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्पामुळे नवी मुंबई विमानतळाशी वेगवान दळणवळण, तसेच मुंबई पोर्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट यांच्या दरम्यान वेगवान दळणवळण शक्य होणार आहे.

मुंबईजवळ नैना हे पूरक क्षेत्र तयार होत आहे. नवी मुंबईतील विमानतळाजवळील हा नैना प्रकल्प तिसरी मुंबई म्हणून ओळखला जात असून बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या विकासक, गुंतवणूकदारांना शासनाकडून काही सवलती देण्यासंदर्भात आवश्यक ती पावले उचलण्यात आली आहेत. या क्षेत्राचा जलदगतीने विकास करण्यावर भर देण्यात आला असून दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ व एमटीएचएल प्रकल्पामुळे तिसरी मुंबईचा झपाट्याने विकास होत आहे.

सर्वसामान्य नागरिक व राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जे काही निर्णय घ्यावे लागतील ते सरकार घेईल. पायाभूत सुविधा प्रकल्पांना, मग ती मेट्रो असो, बुलेट ट्रेन असो की, समृद्धी महामार्ग सर्व प्रकल्पांना गती मिळाली आहे. सामान्य माणसापासून ते पायाभूत सुविधेच्या प्रकल्पांपर्यंत सर्वत्र विकासाचे चक्र पुन्हा गतिमान झाले आहे. हा क्रम असाच सुरू राहील. खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे सरकार म्हणूनच जनतेची अपेक्षापूर्ती होईल. आरोग्यपूर्ण, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्राचे आमचे प्रयत्न आपल्या सर्वांच्या साथीने निश्चितपणे पूर्णत्त्वास जातील, हा मला विश्वास आहे.

### पायाभूत सुविधा निर्मिती

महावितरण कंपनीच्या ३९,६०२ कोटी रुपये व बेस्टच्या ३,४६१ कोटी रुपये रकमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली आहे. महापारेषणच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्मिती करण्यात येत आहे. महानिर्मिती कंपनीत वीजनिर्मितीचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सुपर क्रिटिकल प्रकल्प नव्याने तयार करून २०३४ पर्यंतचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. उपसा जलसिंचन योजनेमधील शेतकऱ्यांना वीजदरात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. अति उच्च दाब पारेषण वाहिन्यांसाठीच्या मनोऱ्यांसाठी जमिनीचा मोबदला देण्याकरिता सुधारित धोरणास मान्यता देण्यात आली. नव्या धोरणामुळे बाधित शेतकरी आणि जमीन मालकाला पुरेशी भरपाई मिळणार असल्याने मनोरा आणि वाहिनी उभारणी वेगाने होऊन वीज निर्मितीस मदत होईल.

**शब्दांकन : कीर्ती पांडे,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या जनसंपर्क अधिकारी

# पारदर्शक कामकाजावर भर

**राज्य शासनाच्या विविध विभागांशी सर्वसामान्य जनतेचा दैनंदिन संबंध येत असतो. महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय या विभागांमार्फत देण्यात येत असलेल्या योजना, सुविधा यांचा लाभ सर्वसामान्य जनतेला सहज आणि गतिमान पद्धतीने मिळावा, यासाठी या विभागाने गेल्या वर्षभरात महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.**



**राधाकृष्ण विखे-पाटील**
मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास

महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास या विभागांमार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवून जास्तीत जास्त गरजू नागरिकांना योजनेचा लाभ मिळावा, यासाठी राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले.

## 'सलोखा योजना'

या योजनेमुळे एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीनधारकांच्या अदलाबदल दस्तांसाठी ही योजना आहे. या योजनेमुळे गावातील वाद मिटणार आहेत, त्याचबरोबर लागवडीखालील क्षेत्रही वाढणार असून शेतकरी आत्महत्येचे प्रमाण घटणार आहे.



## सुधारित वाळू धोरण

अनधिकृत रेती/वाळू उत्खननाला आळा घालण्यासाठी विभागाने सुधारित वाळू/ रेती धोरण आणले आहे. या धोरणानुसार एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये (१३३ रुपये प्रति मेट्रिक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. वाळू लिलाव बंद होऊन डेपोतूनच ६०० रुपयांत वाळू उपलब्ध होणार आहे.

## महाराजस्व अभियान

महाराजस्व अभियानात शेतकऱ्यांना सातबारा देणे, फेरफार निकाली काढण्यासाठी कालमर्यादा आणि फेरफार अदालतीचे आयोजन करणे, भूसंपादनाची कमी-जास्त पत्रके अद्ययावत करणे, बिगरशेती प्रकरणे जलदगतीने मार्गी लावणे, पाणंद, शिवार रस्ते मोकळे करणे, गाव तेथे स्मशानभूमी, दफनभूमीसाठी सुविधा देणे, लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी, विस्तार पत्रकाच्या नोंदी अद्ययावत करणे, ई-पीक पाहणी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे या बाबी समाविष्ट आहेत.

## ई-पीक पाहणी

एखाद्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान होते. नुकसानाची भरपाई देण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे या सर्व अडचणींचा विचार करून शेतकऱ्यांनी पेरलेल्या पिकाची अचूक नोंद शासनाच्या अभिलेख्यांमध्ये व्हावी, संकटकाळात नुकसानभरपाईसाठी जलदगतीने लाभ व्हावा, हे उद्देश समोर ठेवून ई-पीक पाहणीचा प्रकल्प राज्यात राबवण्याचा येत आहे.

## कोतवालांच्या मानधनात वाढ

कोतवालांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. प्रति महिना १५ हजार रुपये सुधारित देण्यात येत आहे. येत्या १ एप्रिल २०२३ पासून याची अंमलबजावणी करण्यात आली असून याचा फायदा १२ हजार ७९३ कोतवालांना मिळाला आहे.

## प्रलंबित अर्जांचा आढावा

'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' सेवा पंधरवडा कालावधीत एकूण १४ सेवांकरिता प्राप्त अर्जांपैकी ६६ हजार ८१ हजार ७०१ अर्ज निकाली काढण्यात आले.

पहिले वर्ष सुराज्याचे

### महसूल विभागाचे अन्य महत्त्वाचे निर्णय

- पोस्ट खात्यास १ जानेवारी २०२२ पासून Revenue Stamp विक्रीच्या मनौतीच्या (Commission) बाबतचे पुढील आदेश काढण्याबाबतची अधिसूचना, राज्यातील जमिनींना अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्याबाबतची कार्यपद्धती.
- एअर इंडियाकडून एअर इंडिया इंजिनीअरींग सर्व्हिसेस लिमिटेड या कंपनीस हस्तांतर होणाऱ्या ५० एकर जमिनीच्या मूल्यावरील मुद्रांक शुल्क माफी. डिजिटल स्वाक्षरी डेटाबेस आधारित संगणकीकृत अधिकार अभिलेखास कायदेशीर वैधता देणे.
- भूमी अभिलेख विभागातील रिक्त असलेली सर्व्हेअरची १,२७० पदे सरळसेवेने भरती प्रक्रिया.
- प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे(नागरी) या धर्तीवर पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेत अंतर्गतपात्र भूमिहीन लाभार्थ्यांना १०००/- रुपये इतके मुद्रांक शुल्क कमी करण्यास मान्यता.
- सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत मिशन ऑक्सिजन स्वावलंबन योजनेंतर्गत राज्यामध्ये नवीन तसेच LMO प्रकल्प उभारण्याकरिता सदर प्रकल्प उभारणाऱ्या प्रकल्प उद्योग घटकांना अनुज्ञेय करण्यात आलेली मुद्रांक शुल्क माफी, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियमाच्या कलम १५ अन्वये भारत सरकारने विशेष आर्थिकक्षेत्र विकसित करण्यास दिलेल्या परवानगीच्या दिनांकापासून १५ वर्षांपासून २० वर्ष वाढवण्याबाबतचा निर्णय.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील नियम २९ व ३० अंतर्गत ई-पीक पाहणी नोंदणी प्रक्रियेतील तरतुदींमध्ये सुधारणा करणे, तालुका विभाजनाच्या अनुषंगाने सुधारित निकष निश्चित करणे.

### दस्तनोंदी अपग्रेड होणार

दस्तनोंदणी प्रक्रियेची आय-सरिता (I-Sarita) प्रणाली आणि भूमी अभिलेख विभागाची ई-फेरफार प्रणाली एकमेकांशी जोडल्या आहेत. यामध्ये खरेदी खत, गहाण खत, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वाटपपत्र व हक्कसोडपत्र या प्रकारच्या दस्तांची नोंदणी होताच फेरफारासाठी आवश्यक माहिती नोंदणी प्रणालीकडून ई-फेरफार प्रणालीकडे ऑनलाइन नोंद होऊन पुढील निर्णयप्रक्रिया महसूल विभागाकडून पार पाडण्यासाठी येते. ही व्यवस्था ७/१२ प्रमाणे मिळकत पत्रिकेसाठी (e-PCIS) लागू आहे.

### धोरणात्मक निर्णय

ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत सर्वांसाठी घरे-२०२४ या धोरणानुसार ग्रामविकास विभागाकडून या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी गायरान जमिनीवर केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी गायरान जमिनीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

### ४जी सेवा

भारत संचार निगम लिमिटेड यांची ४जी सेवा गावांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी भारत संचार निगम लिमिटेड यांना २०० चौ.मी.पर्यंतची जागा देण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. भारत संचार निगम लिमिटेड यांना २,७५१ गावांची निवड करण्यात आली आहे.

### नॉनस्टॉप दस्तनोंदणी

नागरिकांसाठी सुट्टीच्या दिवशी दस्त नोंदणी करता यावी, यासाठी दुय्यम निबंधक कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका क्षेत्रातील कार्यालये सुट्टीच्या दिवशी सुरू राहणार आहेत.

### ५० लाखांची तरतूद

राज्यातील महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या क्रीडा संस्कृतीला वाव मिळावा, यासाठी क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

### महाराष्ट्र जमीन महसूल नियमात सुधारणा

एखाद्या जमिनीवर बांधकाम परवानगी अथवा रेखांकन मंजुरी देण्यात आली असताना अशा जमिनीमध्ये प्रस्तावित अकृषिक प्रयोजनाचा वापर अनुज्ञेय असल्याची खात्री करण्यात येते. अशी खात्री केल्यानंतर अशा जमिनींकरिता स्वतंत्रपणे अकृषिक परवानगीची गरज नाही, अशी सुधारणा करण्यात आली आहे.

### सैन्यदलाच्या घरांचा प्रश्न मार्गी

लष्कर, नौदल व वायुदल या तीनही सैन्यदलाच्या पुणे येथील लोहगावस्थित सिव्हिल डिफेन्स गृहरचना संस्थेच्या मागण्या मान्य करून शासनाने घरांचा प्रश्न मार्गी लावला आहे.

### दीड कोटी पशुधनाचे मोफत लसीकरण

'पशुधन हिताय, बहुजन सुखाय' ब्रीद जपत शेतकरी, पशुपालकांसाठी काम करणारे हे शासन आहे. 'पशुधन' हा शेतीला पूरक असा व्यवसाय आहे. राज्यात दीड कोटी पशुधनाचे कमी कालावधीत विक्रमी मोफत लसीकरण व उपचार करण्यात राज्य शासनाला यश आले आहे. पशुधन गमावलेल्या शेतकऱ्यांना आतापर्यंत ८९ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. राज्य शासनाने लम्पी नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. लस निर्मिती करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरणार आहे.

### शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय

उत्तर महाराष्ट्रात अहमदनगर येथे नव्याने शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू केल्याने पशुपालकांचे विविध प्रश्न सुटणार आहेत, यासाठी चालू आर्थिक वर्षात ४५ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

### पशुवैद्यक पदवी महाविद्यालय

अकोला येथे नवीन पशुवैद्यक पदवी

महाविद्यालय स्थापन करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या महाविद्यालयाकरिता शिक्षक संवर्गातील ५६, शिक्षकेतर संवर्गातील ४८ आणि बाह्यस्रोताद्वारे ६० अशी एकूण १६४ पदे नव्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### महापशुधन एक्स्पो

नुकतेच शिर्डी येथे 'महापशुधन एक्स्पो'मध्ये ३०० स्टॉल्सची उभारणी करण्यात आली आहे. विविध प्रजातीचे पशुधन या 'महापशुधन एक्स्पो'मध्ये सहभागी झाले होते. या एक्स्पोला तीन दिवसांत ८ लाख लोकांनी भेट दिली होती.

### महाराष्ट्र गो-सेवा

देशी गो-वंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षणासाठी महाराष्ट्र गो-सेवा आयोगाची स्थापना केली आहे. या आयोगाच्या माध्यमातून गोवर्धन, गोवंश सेवा केंद्र योजना, गोमय मूल्यवर्धन योजना व देशी गोवंशांच्या संवर्धनासाठी भ्रृणब्राह्य फलन व प्रत्यारोपण सुरक्षेत वाढ करताना यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

### गोशाळांना अनुदान

राज्यातील ३२४ तालुक्यांमध्ये गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना राबवण्यात येणार आहे. ५० ते १०० पशुधन असणाऱ्या गोशाळेस १५ लाख रुपये, १०१ ते २०० पशुधन असणाऱ्या गोशाळेस २० लाख रुपये आणि २०० पेक्षा जास्त पशुधन असणाऱ्या गोशाळेस २५ लाख रुपये देण्यात येणार आहे. या योजनेमुळे गोवंश संवर्धनास मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे.

### मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळ

मेंढी पालनाला चालना देण्यासाठी मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना करण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. या महामंडळाचे राज्याचे मुख्यालय अहमदनगर येथे असणार आहे. या महामंडळाच्या माध्यमातून राष्ट्रीय सहकार विकास परिषदेच्या माध्यमातून १० हजार कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### दूध भेसळ रोखण्यासाठी हेल्पलाईन



राज्यात दूध भेसळीची समस्या अत्यंत गंभीर झाली आहे. येणाऱ्या काळात दूध भेसळ रोखण्यासाठी एक हेल्पलाईन तयार करण्यात आली आहे. एक विशेष अभ्यासगट तयार करून यामध्ये ग्रामीण भागातील प्रतिनिधी आणि या क्षेत्रातील तज्ज्ञ या अभ्यासगटात असणार आहेत.

### बोव्हाईन ब्रिडींग कायदा

महाराष्ट्रात दुग्धोत्पादन क्षमता वाढवण्यासाठी विशिष्ट जातीच्या नसलेल्या गायींचे संकरीकरण आणि विशिष्ट जात नसलेल्या म्हशींची दर्जावाढ पद्धतीने सुनियोजितपणे गुणवत्ता वृद्धी केली जात आहे. गायी व म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाकरिता गोठीत वीर्यनिर्मिती, प्रक्रिया, साठवण, विक्री, वितरण आणि प्रत्यक्ष कृत्रिम रेतन करणे; तसेच साहाय्यक पुनरुत्पादक तंत्र या बाबींसाठी बोव्हाईन ब्रिडिंग कायदा लागू केला आहे.

### आंतरवासिता भत्त्यात वाढ

पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता विद्यार्थ्यांना देण्यात येणारा आंतरवासिता भत्ता ६ हजार रुपयांवरून ११ हजार रुपये करण्यात आला आहे.

### विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प

हा प्रकल्प राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत राबवण्यात येतो. याअंतर्गत विदर्भ व मराठवाड्यातील ११जिल्ह्यांतील ४ हजार २६३ गावांमध्ये अनुदानावर पशुखाद्य व खनिज मिश्रण पुरवठा, संतुलित आहार सल्ला, दुधाळ जनावरे वाटप, वैरण विकास कार्यक्रम, प्रशिक्षण, वंध्यत्व निवारण शिबिरे, गोचीड निर्मूलन आदी बाबी राबवण्यात येणार आहेत.

### दुधाळ जनावरांच्या किमतींमध्ये वाढ

दुधाळ जनावरांच्या किमतींमध्ये वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गायींसाठी ७० हजार व म्हशींसाठी ८० हजार रुपये प्रमाणे वाढ केली आहे.

### कुक्कुट समन्वय समिती

खासगीरीत्या व व्यावसायिक कुक्कुटपालन करणारे शेतकरी, कंपन्या यांना कुक्कुटपालन व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे. यासाठी पशुसंवर्धन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन करून येणाऱ्या अडचणींच्या संदर्भात आवश्यक त्या शिफारशी शासनाला देण्याचे काम समिती करणार आहे.

### फिरती भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा

राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी अनुक्रमे अकोला, छत्रपती संभाजीनगर आणि अहमदनगर येथे प्रत्येकी एक यानुसार एकूण ३ फिरत्या भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना करण्यात येणार आहे. भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानामुळे उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गायींपासून स्त्री-बिजांचे संकलन करून अशा स्त्री-बिजांचे प्रयोगशाळेत सिद्धवळूच्या वीर्यापासून फलन करून असे गर्भ दुसऱ्या गायींमध्ये प्रत्यारोपण करण्यात येणार आहे. यामुळे १० ते १२ वासरांऐवजी मोठ्या प्रमाणात वासरांची निर्मिती करणे शक्य होणार आहे.

दुग्ध व कुक्कुटपालन व्यवसायाला नवीन दिशा मिळावी, नवनवीन तंत्रज्ञानाचा पशुधन व्यवसायाला फायदा कसा होईल, याला प्राधान्य दिले जाणार आहे. शेळी-मेंढी पालनाला चालना देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची शासनाने स्थापना केली आहे. हा व्यवसाय करणाऱ्या तरुणांना १ लाख ७५ हजार रुपयांचे बिनव्याजी कर्ज दिले जाणार आहे. पशुसंवर्धनाच्या व्यवसायात ग्रामीण अर्थचक्राला गतिमान करण्याची क्षमता असल्याने या व्यवसायाची व्याप्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**शब्दांकन : वर्षा आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

पहिले वर्ष सुराज्याचे

# समृद्ध सांस्कृतिक वारसा

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेण्याचा आणि सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध होऊन काम करण्यास वर्षभरापूर्वी सुरुवात झाली. वने, सांस्कृतिक कार्ये आणि मत्स्यव्यवसाय विभागाची जबाबदारी पार पाडताना या क्षेत्रात नवीन काही करण्याचा प्रयत्न या वर्षभरात झाला. सांस्कृतिक कार्ये, वन आणि मत्स्यव्यवसाय विभागातील विविध कामांना, उपक्रमांना गती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकसित



आणि बलशाली होत आहे. ९ वर्षांच्या काळात विविध क्षेत्रात एक महासत्ता म्हणून पुढे आला आहे. आपले राज्यही या विकासात आघाडीवर असावे, यासाठी सोपवलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडून या तिन्ही विभागांच्या माध्यमातून सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न होत आहेत.

## शिवराज्याभिषेक दिन सोहळा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनाचा ३५०वा वर्षसोहळा आपण साजरा केला. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन राज्यभरात करण्यात आले. दुर्गराज रायगडावर साजरा करण्यात आलेला देदीप्यमान असा राज्याभिषेक सोहळ्याचा कार्यक्रम, त्यासाठी १,००८ ठिकाणच्या पवित्र ठिकाणांहून आणलेल्या जलाने एकत्र केलेले 'जलकलश' ही संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण ठरली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिन सोहळ्याचे औचित्य साधून शिवकालीन सुवर्ण होन या नाण्याचे टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले. गेट वे ऑफ इंडियाच्या गाभाऱ्यात सांस्कृतिक विभागाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयातर्फे ऐतिहासिक शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत एक बोधचिन्ह राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त तयार केले. या बोधचिन्हातून राज्याभिषेकाचे महत्त्व समजण्यास मोठी मदत होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी जीवनाची नवीन पिढीला ओळख करून देण्यासाठी गडकिल्ले, मंदिरे व महत्त्वाची संरक्षित स्मारके यांचे संवर्धन करण्यात येत आहे. जिल्हा वार्षिक योजनेत यासाठी ३ टक्के निधीची तरतूद केली आहे. किल्ले रायगड विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले.

## सांस्कृतिक कार्य

- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनापासून म्हणजेच १९ फेब्रुवारी २०२३ पासून राज्यगीत म्हणून 'जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत आपण स्वीकारले. सांस्कृतिक विभागाने हे राज्यगीत तयार करण्यासाठी पुढाकार घेतला व महत्त्वाची भूमिका पार पाडली.
- भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या निमित्ताने आझादी का अमृत महोत्सवांतर्गत १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत विशेष समारंभ, उपक्रम, योजना व

**महाराष्ट्र राज्य हे खऱ्या अर्थाने सांस्कृतिक वारशाने समृद्ध आहे. हा समृद्ध वारसा जपणे, तो अधिकाधिक वृद्धिंगत करणे, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. सांस्कृतिक कार्य विभागाचा मंत्री म्हणून जे काही चांगले करता येईल, ते निश्चितपणे करण्याचा प्रयत्न केला आणि राज्यातील जनतेला अभिमान वाटावा, असेच काम या वर्षभरात झाले आणि यापुढेही होत राहील. याशिवाय वन विभागाची जबाबदारी सांभाळताना हरित महाराष्ट्राचे स्वप्न घेऊन वाटचाल सुरू आहे. मच्छीमारांना सुरक्षा देणे, त्यांना आर्थिक आधार देणे हे काम मत्स्यव्यवसाय विभागाच्या माध्यमातून होत आहे.**



**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय

विविध कार्यक्रमांचे आयोजन करत आहे. या प्रयोजनाकरिता तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर १ लाख ७५ हजारांहून अधिक कार्यक्रम व उपक्रमांची नोंदणी करण्यात आली आहे.

- पुणे येथील आंबेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यानासाठी ५० कोटी रुपयांची तरतूद.
- मुंबई, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथे दृक्श्राव्य माध्यम सुविधेसह शिवचरित्रावरील उद्याने निर्मित करण्यात येणार असून यासाठी २५० कोटी रुपयांची तरतूद.
- शिवनेरी किल्ल्यावर शिवछत्रपतींच्या जीवनचरित्रावर संग्रहालय तयार करण्यात येणार असून शिवकालीन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद.
- मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने १७ सप्टेंबर २०२२ पासून १७ सप्टेंबर २०२३ पर्यंत मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करत आहोत.
- सांगली येथे नवीन नाट्यगृहाच्या बांधकामासाठी २५ कोटी रुपये, तर राज्यातील सर्व नाट्यगृहांच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतूद.
- दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि कोल्हापूर चित्रनगरीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ११५ कोटी रुपये निधी प्रस्तावित.
- नाट्यनिर्मिती संस्थांना नवीन नाट्यनिर्मितीसाठी अनुदान योजनेस मान्यता देण्यात आली आहे. अनुदान योजनेंतर्गत नाट्य परीक्षण समितीची पुनर्रचना.
- सांस्कृतिक कार्ये विभागात १०० टक्के ई-ऑफीसचा वापर सुरू करण्यात आला आहे. यामुळे आता सर्व प्रत्यक्ष स्वरूपातील फाईल्स आणि टपाल बंद करण्यात आले असून, आता ते केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच हाताळले जात आहे.
- ज्येष्ठ गायिका आशा भोसले आणि पद्मभूषण आप्पासाहेब धर्माधिकारी यांना आपण महाराष्ट्र भूषण देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.
- सांस्कृतिक कार्ये विभागामार्फत ‘ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार’ सुरू करण्यात आले. ह.भ.प. बद्रीनाथ तनपुरे महाराज, स्वामी श्री गोविंददेव गिरी, बाभूळगावकर शास्त्री महंत यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## ‘चला जाणू या नदीला’ अभियान

सांस्कृतिक कार्य विभागामार्फत २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ करण्यात आला. या नदी यात्रेचा कालावधी २ ऑक्टोबर २०२२ ते १५ ऑगस्ट २०२३ असा असणार असून यामध्ये राज्यातील सुमारे ७५ हून अधिक नद्यांमधून यात्रा संपन्न होणार आहे. नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी आणि नदीचे संवर्धन करण्यासाठी ‘चला जाणू या नदीला’ हे अभियान सुरू केले. त्याला अतिशय सकारात्मक आणि उत्साहवर्धक असा प्रतिसाद मिळाला.

## वन संवर्धनासाठी

- राज्यात वन व वन्यजीव संवर्धनाच्या अनुषंगाने १८ नवीन संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यास तत्त्वतः मान्यता. त्यामुळे राज्यात संवर्धन राखीव क्षेत्रांची संख्या ५२ होणार आहे.
- वन विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचा वनांचे किंवा वन्यजीवांचे संरक्षण करताना वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू ओढवल्यास त्यांच्या वारसांना २५ लाख रुपये आणि कायमचे अपंगत्व आल्यास ३ लाख रुपये इतके आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्यहानी झाल्यास त्याबाबतीत प्रदान करावयाच्या आर्थिक साहाय्याच्या रकमेत १५ लाख रुपयांवरून २० लाख रुपये इतकी वाढ.
- रामसर परिषदेने, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून रामसर क्षेत्रघोषित केले आहे. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अन्वये, शासनाच्या मालकीच्या असलेल्या क्षेत्रात वन्य प्राण्यांचे आणि वनस्पतींचे व त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ राज्यात ११ नवीन संवर्धन राखीव क्षेत्रे अधिसूचित केली आहेत.
- राज्याचे नेट झिरो उत्सर्जन साध्य करण्यासाठी उपयायोजना करण्यात येणार आहे. राज्याचा मुख्यतः हरित ऊर्जा क्षेत्रावर भर असून त्याकरिता सौर, जल आणि पवनऊर्जा या क्षेत्रांमध्ये ३० हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी व पक्षी उद्यान आणि पुण्यातील शिवनेरी येथे बिबट सफारी सुरू करण्याचा निर्णय.
- जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ‘वनवार्ता’ या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

## पर्यटन विकास आराखड्यास मंजुरी

लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकासाकरिता लोणार सरोवर विकास समिती स्थापन करण्यात आली आहे. लोणार सरोवर जतन, संवर्धन आणि विकास करण्यासाठी ३६९ कोटी ७५ लाख रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. ८ विभाग जसे नगरविकास, नियोजन, वन, पर्यटन व सांस्कृतिक कार्ये, सार्वजनिक बांधकाम, गृहनिर्माण, जलसंपदा आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत विकास आराखड्यानुसार मंजूर करण्यात आलेली कामे करण्यात येणार आहे.

## जैवविविधता विषयावर प्रशिक्षण केंद्र

राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज असून यासंदर्भात जैवविविधता प्रशिक्षण केंद्र चंद्रपूर येथे सुरू करण्यात येणार आहे. जैवविविधतेचे संवर्धन करणे हे अत्यंत आवश्यक असल्याने महाराष्ट्रातील सर्वांसाठी एक प्रशिक्षण केंद्र चंद्रपूर येथे सुरू करण्यात येईल. या केंद्रामध्ये वर्षांतील ३६५ दिवस जैवविविधता जपण्यावर प्रशिक्षण देण्यात येईल. राज्य शासनातील विविध विभागात काम करणारे अधिकारी, विद्यार्थी, शेतकरी, कृषितज्ज्ञ यांच्यासह या विषयावर संशोधन करणाऱ्यांसाठी या केंद्राचा फायदा होईल.

पहिले वर्ष सुराज्याचे

## मत्स्यव्यवसायाला चालना

महाराष्ट्राला ७२० कि.मी लांबीचा विस्तीर्ण असा समुद्रकिनारा लाभलेला असून येणाऱ्या काळात पर्यटन आणि मत्स्यव्यवसायाला चालना देण्याचे काम राज्य शासन प्राधान्याने करत आहे. याशिवाय मुंबईतील कोळीवाड्यांचे सुशोभीकरण, कोळीवाड्यांचा पुनर्विकास, दर्याचा राजा अशी ओळख असणाऱ्या कोळीबांधवांचा विकास, त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा यासह त्यांची सुरक्षा यालासुद्धा राज्य शासन प्राधान्य देत आहे. मत्स्यव्यवसाय विकासाला चालना देणारे आणि मत्स्य उत्पादनात महाराष्ट्राला आघाडीवर ठेवेल असे समग्र मत्स्यविकास धोरण लवकरच आणण्यात येणार आहे.

## जोडधंदे आणि रोजगारनिर्मिती

राज्यात 'शेत तेथे मत्स्यतळे' योजना राबवण्यात येणार आहे. मत्स्यसंपदा योजनेसाठी केंद्र सरकार निधी उपलब्ध करून देणार आहे. मत्स्यउत्पादन अधिक काळ टिकण्यासाठी शीतगृह सुविधा, मत्स्य संगोपन व संवर्धनासाठी मच्छीमार बांधवांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. मासे हे नाशीवंत प्रकारात येत असल्याने ते त्वरित विकण्यासाठीची एक साखळीप्रक्रिया तयार करणे, मत्स्यव्यवसाय उद्योगाला चालना देणारे पूरक जोडधंदे आणि रोजगार उपलब्ध होणे यावर भर देण्यात येणार आहे.

केंद्र शासनामार्फत सागरी मासेमारीसोबतच गोड्या पाण्यातील मत्स्यपालनावर भर देण्याचे ठरवले असून त्याकरिता विविध योजना सुरू केल्या आहेत. गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाकरिता केंद्र शासनामार्फत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे, त्याच धर्तीवर राज्यानेही गोड्या पाण्यातील मत्स्यपालनावर भर देण्याचे ठरवले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेत मत्स्यपालन क्षेत्राचे योगदान मोठे असणार आहे.

## महत्त्वपूर्ण निर्णय

- आजवर सागरात केवळ मासेमारी चालत आली आहे. सागरी मत्स्यसंवर्धन किंवा सागरी मत्स्यपालन या विषयांवर फार भर दिला गेला नव्हता. मात्र आता समुद्रातही पिंजरा पद्धतीने मत्स्यपालनास प्रोत्साहन देण्याचे धोरण राज्य शासनामार्फत ठरवण्यात येणार आहे.
- निमखाऱ्या पाण्यात मत्स्यसंवर्धनाच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय क्षेत्रात रोजगार आणि उद्योगवाढीसाठी मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ ब्रॅकिश वॉटर ॲक्काकल्चर (सीआयबीए) यांच्यात सामंजस्य करार.
- डिझेल परतावा देण्याबाबत शासन अत्यंत सकारात्मक असून १२० हॉर्सपॉवरवरील पर्यंतच्या बोटींना डिझेल परतावा दिला जाणार आहे. यासाठी एक नियमावली करून उणे प्राधिकारपत्रावरही या पुढील काळात मच्छीमारांना हा डिझेल परतावा नियमित देण्याचे नियोजन.
- राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांसाठी राज्यस्तरीय नुकसानभरपाई धोरण आणण्यात आले आहे. यामध्ये मच्छीमारांना जवळपास ६ लाख रुपयांपर्यंत मदत मिळणार आहे.
- मत्स्य उत्पादन विक्री करण्यासाठी मच्छीमार बांधवांना हक्काची बाजारपेठ आवश्यक असल्याने पालघर जिल्ह्यातील साटपाटी येथे सर्व सुविधायुक्त आदर्श मच्छी बाजारपेठ उभारली जाणार आहे.
- सागरी व भूजल क्षेत्रातील मच्छीमार बांधवांनंतर आता गोड्या पाण्यातील तलाव किंवा जलाशयात मासेमारी करणाऱ्या मच्छीमार बांधवाना तलाव ठेका माफ करण्याचा निर्णय. २०२०-२१ या कोरोना काळातील नुकसान लक्षात घेऊन तलाव ठेका माफ करण्याचा निर्णय राज्य शासनामार्फत घेण्यात आला.
- सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील मासेमारी करणाऱ्या नौकांवर वापरण्यात येणाऱ्या नायलॉन व मोनोफिलामेंट जाळी खरेदीवर ५० टक्क्यांपर्यंत व रांपण संघाच्या प्रत्येक सभासदाला रांपणीच्या तयार जाळ्यांवर तयार जाळ्याच्या किमतीच्या ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येईल.
- बिगर यांत्रिकी नौकांच्या बाबतीत शासनाने लहान मच्छीमारांना अथवा रांपणकारांना १० टनापर्यंतची, लाकडी/फायबर नौका, बांधणी/तयार नौका खरेदी करण्यासाठी सध्याच्या प्रचलित दराने १ लाख रुपयांपर्यंतच्या देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा वाढवून ती अडीच लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे.

## मत्स्यबीज उत्पादनासाठी 'क्लस्टर'

सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर फ्रेश वॉटर ॲक्काकल्चर, महाराष्ट्र ॲनिमल आणि फिशरी सायन्सेस युनिव्हर्सिटी यांच्या सहभागातून चंद्रपूरमध्ये 'रिजनल रिसर्च सेंटर' मंजूर करण्यात यावे, अशी मागणी केंद्र शासनाला करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील गोड्या पाण्यातील मत्स्यसंवर्धनापैकी ५० टक्के वाटा हा विदर्भाचा आहे. विदर्भात मत्स्यबीज उत्पादनासाठी 'क्लस्टर' म्हणून विकसित होण्याची क्षमता आहे. त्यामुळे या मागणीचा विचार करावा, अशी विनंती केंद्र शासनाला निवेदनातून करण्यात आली आहे.

राज्यातील मत्स्यबीजाची मागणी पूर्ण होण्यासाठी राज्यातील ६४ शासकीय मत्स्यबीज केंद्रे पीपीपी तत्त्वावर भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेतून खासगी मत्स्यबीज निर्मितीला चालना देणे; तसेच शासकीय आणि खासगी मत्स्यबीज संवर्धन क्षेत्र वाढवण्यावर भर देण्यात येत आहे.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,**
विभागीय संपर्क अधिकारी

# विद्यार्थीहिताला प्राधान्य

**विद्यार्थी हे आपल्या देशाचे भवितव्य, राष्ट्राची संपत्ती व उद्याची उमेद आहे. राज्यातील शैक्षणिक परिस्थिती पाहता आणि भविष्याचा विचार करता विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि कमी खर्चात उच्च शिक्षण उपलब्ध करून देणे मोठे आव्हान आहे. शिक्षण हे जीवननिर्मित, मानवनिर्मित आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व निर्माण करणारे असले पाहिजे. उच्च शिक्षणातसुद्धा आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देण्यात येत आहे.**






**चंद्रकांत पाटील**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये

भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० तयार केले आहे. २१व्या शतकातील हे पहिले शैक्षणिक धोरण आहे. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हे या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणात बौद्धिक विकास आणि अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित आणि शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी उद्दिष्टे ठेवून भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल घडवून आणण्यासाठी हे नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. या धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्रात सुरू झाली आहे. आतापर्यंत १३ अकृषी विद्यापीठांच्या पदव्युत्तर विभाग, ज्या ९० स्वायत्त महाविद्यालय आणि विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम आहेत, अशा १,२९५ ठिकाणी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीस अधिक गती देण्यासाठी आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सुकाणू समितीसुद्धा गठित करण्यात आली आहे.

## संयुक्त उच्च शिक्षण परिषद

भारताने अमेरिकेप्रमाणेच ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत लक्षणीय प्रगती केली आहे. भारत आणि अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये उच्च शैक्षणिक सहकार्याच्या दृष्टीने विचारमंथन व्हावे, यासाठी राज्यपालांच्या पुढाकाराने राजभवन मुंबई येथे उच्च शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये अमेरिका आणि भारत यांच्यात अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया, संशोधन यावर चर्चा झाली. महाराष्ट्र आणि अमेरिकेतील विद्यापीठे एकत्र आल्यास २१व्या शतकातील शैक्षणिक उद्दिष्टे पूर्ण करण्यास मदत होणार आहे.

## संगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयासाठी मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुल येथे जागा निश्चित करण्यात आली आहे. सध्या तात्पुरत्या स्वरूपात पु. ल. देशपांडे कला अकादमीची जागा उपलब्ध करून देण्यात आली. भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयातील पहिले सहा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पु. ल. देशपांडे अकादमीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये एकूण एक वर्ष कालावधीचे सहा अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

## विद्यार्थ्यांच्या हितासाठी

- राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा अधिक सहभाग वाढावा, यासाठी या

योजनेच्या विद्यार्थ्यांची संख्या आता पाच लाख करण्यात आली आहे.

- राज्यातील विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना परदेशी विद्यार्थ्यांना सुविधा निर्माण व्हावी, तसेच विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नोंदणी करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी) नवीन वेबपोर्टल विकसित करण्यात आले आहे.
- विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व महाविद्यालयाच्या प्रशासनिक बाबींवर होणारा विपरित परिणाम विचारात घेता, सहायक प्राध्यापक, प्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल ही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली. सहायक प्राध्यापक २ हजार ८८ पदे, प्राचार्य १०० टक्के रिक्त होणारी प्राचार्य संवर्गातील पदे, ग्रंथपाल १२१ व शारीरिक शिक्षण संचालक-१०२ असे एकूण २२३ पदे भरण्यास मान्यता.
- अभिमत विद्यापीठांकरिता शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्तीची योजना लागू करण्याचा निर्णय. या निर्णयामुळे २१ अभिमत विद्यापीठांतील १४,२३२ विद्यार्थ्यांना लाभ होणार.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कोल्हापूर येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता.
- एसएनडीटी विद्यापीठाने महिलांना सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका घेतली असून दुर्गम भागातील हे केंद्र महिलांना आर्थिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे ठरेल.
- नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठातील सुविधांसाठी २५ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच कोविड-१९मुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत संपूर्ण शुल्क माफ करण्याचा निर्णय.
- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे 'लोक विद्यापीठ' झाले पाहिजे. समाजातील ज्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचले नाही, त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचून प्रमाणपत्र ते पदव्युत्तर असे गरजेनुसार शिक्षण विद्यार्थांना उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठाकडून विशेष प्रयत्न करून शिक्षणाचे प्रमाण अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न आहेत.
- राज्यातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणात्मक बदल करण्यासाठी 'परीसस्पर्श' योजना राबवण्याचा निर्णय.

## ग्रंथालय व्यवस्थापनाला अधिकार

राज्यातील तालुका पातळीवर ग्रंथ विक्रीची पुरेशा प्रमाणात व्यवस्था नसल्याने ग्रंथालयात वाचकांची गैरसोय होत होती, यासाठी संबंधित ग्रंथालय व्यवस्थापनाने ग्रंथ प्रकाशक/ग्रंथ विक्रेता यांना नवीन ग्रंथ विक्रीस परवानगी दिली. त्याची व्यवस्था करण्यासाठी जिल्हा, तालुका पातळीवरील 'अ' दर्जा वर्ग शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात, प्रकाशक, ग्रंथविक्रेता यांना नवीन ग्रंथ विक्रीसाठी ग्रंथालय व्यवस्थापनाला अधिकार देण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक ग्रंथालयांच्या दर्जात वाढ करताना आवश्यक तेवढेच पॅरामिटर्स ठेवून दर्जावाढ देण्यात येत आहे. तसेच वाचकांना सहज ग्रंथसंपदा उपलब्ध व्हावी, यासाठी फिरत्या वाचनालयांची संख्या वाढवण्यात येणार आहे. ग्रंथालय विभाग ऑटोमोव्हिंग करून पुस्तक देवघेव, अनुदान वितरण ऑनलाइन करण्याचा प्रयत्न आहे. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात ६० टक्के वाढ करून वाचनसंस्कृतीला बळ देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील सुमारे १२ हजार ग्रंथालयांना याचा लाभ. जिल्हा व तालुका स्तरावरील 'अ' आणि 'ब' तसेच 'क' आणि 'ड' ग्रंथालयांना याचा लाभ.



पहिले वर्ष सुराज्याचे

## अध्यापकांच्या मानधनात वाढ

कला, वाणिज्य, विज्ञान पदवी अभ्यासक्रमाकरिता ६२५ रुपयांवरून १,००० रुपये, पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ७५० रुपयांवरून १,००० रुपये प्रति तास, शिक्षणशास्त्र / शारीरिक शिक्षण / विधि (पदवी / पदव्युत्तर) या व्यावसायिक अभ्याक्रमांकरिता ७५० रुपयांवरून १,००० रुपये प्रति तास, उद्योग व्यवसाय क्षेत्रातून निमंत्रित तज्ज्ञ / अनुभवसंपन्न ज्येष्ठ अभियंता यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान १,००० रुपयांवरून १,५०० रुपये प्रति तास, पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी मानधन दर ६०० रुपयांवरून १,००० रुपये प्रति तास, पदविका अभ्याक्रमांसाठी मानधन दर ५०० रुपयांवरून ८०० रुपये प्रति तास, उद्योग व्यवसाय क्षेत्रातून निमंत्रित तज्ज्ञ / अनुभवसंपन्न ज्येष्ठ व्यवस्थापक यांचे व्याख्यान मानधन दर ७५० रुपयांवरून १,५०० रुपये प्रति तास, कला शिक्षण पदविका तसेच पदवी/पदव्युत्तर पदविका / पदव्युत्तर पदवी अभ्याक्रम मानधन दर ६२५ रुपयांवरून १,००० रुपये प्रति तास याप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

## शिक्षण संस्थांना विशेष अनुदान

डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, कॉलेज ऑफ इंजिनीअरींग पुणे; गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई., लक्ष्मी नारायण इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी, नागपूर या संस्थांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा देऊन विशेष अनुदान देण्यात येणार आहे.

### महत्त्वपूर्ण निर्णय

- शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगानुसारची गेली १० वर्षांपासून थकित असलेली थकबाकी देण्यात आली. कला संस्थांमधील शिक्षक, कर्मचाऱ्यांना विविध सेवाविषयक लाभसुद्धा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठ स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठास मान्यता.
- कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्या निवड पद्धतीत सुधारणा.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्रासाठी शासनाकडून तीन कोटी निधी मंजूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर भुयारी मार्गासाठी ८ कोटी ४८ लाख रुपयांचा निधी मंजूर.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीत कार्यरत असलेले सदस्य सचिव व सदस्यांच्या मानधनात वाढ करून सदस्य सचिवांना १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये मानधन आणि समितीला सोयी-सुविधांसह समितीचे संशोधन व प्रकाशनाचे काम जलदगतीने होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.
- मुंबई विद्यापीठांत जेष्ठ मार्गदर्शक प्रा. कै. बाळासाहेब आपटे यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

### संशोधन प्रकल्पासाठी महाराष्ट्राची निवड

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या शिफारशींनुसार केंद्र सरकारकडून जागतिक बँक अर्थसाहाय्यित तंत्र शिक्षणातील बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन सुधारणा प्रकल्प (Multidisciplinary Education and Research Improvement in Technical Education) राबवण्यात येत आहे. यामध्ये महाराष्ट्राची निवड केली आहे. या प्रकल्पासाठी देशातील साधारणतः १५० ते १७५ पदवी संस्था आणि १०० पदविका संस्थांची निवड प्रकल्पाच्या निकषांच्या आधारे केंद्र व राज्याद्वारे करण्यात येणार आहे. हा प्रकल्प एकूण ४,२०० कोटी रुपये इतक्या निधीचा असून प्रकल्प कालावधी ५ वर्ष आहे. प्रकल्पात निवड झालेल्या प्रत्येक पदवी संस्थेला १० कोटी रुपये, तर पदविका संस्थेला प्रत्येकी ५ कोटी रुपये असे अनुदान प्रकल्प कालावधीमध्ये केंद्र सरकारकडून प्राप्त होणार आहे.

### सामंजस्य करार

सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (सीईई) इंडिया आणि ॲक्राडॅम, पुणे यांच्या तांत्रिक साहाय्याने उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफ मुंबई यांनी एकत्र येऊन या अभ्यासक्रमाची रचना केली आहे. हा अभ्यासक्रम विनामूल्य असून इंग्रजी आणि मराठी भाषांमध्ये उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील कोणीही या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो. उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफने एकत्र येऊन १३ जिल्ह्यांतील ६ विद्यापीठांतील ३ हजार महाविद्यालयातील विद्यार्थी जोडले जातील. या कार्यक्रमादरम्यान, ६,२०० हून अधिक प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले जाईल आणि ३,००० महाविद्यालयांमध्ये 'ग्रीन क्लब' तयार करून अध्यापन सामग्री तयार करणे, जलसंधारण उपक्रमांबद्दल अल्पकालीन मोहिमांचे प्रशिक्षण आदी उपक्रम राबवले जातील. पर्यावरणविषयक कौशल्य, उद्योजकता हेसुद्धा ग्रीन क्लब अंतर्गत उपक्रमांचा एक भाग आहे. त्यात तरुणांना पाण्याची बचत करण्यासंबंधी सात उपाययोजना शिकवल्या जातील. ज्यामुळे पुढील ३ वर्षांमध्ये महाविद्यालयांमध्ये ४३ दशलक्ष घनलिटर पाण्याची बचत होईल.

### त्रिपक्षीय करार

आर्थिक साक्षरता ही काळाची गरज आहे. गुंतवणूकदारांची गुंतवणूक सुरक्षित राहण्यासाठी काय खबरदारी घ्यावी, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण कसे करावे, याबाबत राज्यात विशेष अभियान राबवण्यात येणार आहे. यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, नॅशनल स्टॉक एक्सचेंज आणि मनि बी प्रा. लि. यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अभियानातून लाखो लोकांना साक्षर करण्याचा प्रयत्न करणार आहे.

### नवीन वस्त्रोद्योग धोरण

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत वस्त्रोद्योग क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. देशातील एकूण कापड आणि वस्त्रोद्योग उत्पादनात १०.४ टक्के, तर रोजगारानिर्मितीत १०.२% महाराष्ट्राचा वाटा आहे. कापूस उत्पादक क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यासाठी नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. या धोरणाच्या माध्यमातून २५ हजार कोटींची गुंतवणूक आणि ५ लाख लोकांना रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच कापूसप्रक्रिया क्षमता ३० वरून ८० टक्के वाढवणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ हे भारत सरकारच्या ५-एफ व्हिजनवर आधारित आहे. वस्त्रोद्योग मूल्यसाखळीतील सर्व उपक्षेत्रांच्या सातत्यपूर्ण वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करणे व वस्त्रोद्योग मूल्यसाखळीला एकात्मिक स्वरूप देणे हे या धोरणाचे ध्येय आहे. राज्य शासन रिड्युस, रियूज आणि रिसायकल या ३-आर मॉडेलच्या आधारे शाश्वत वस्त्रोद्योग मूल्यसाखळी निर्माण करण्याच्या दिशेने पाऊल उचलण्यासाठी वस्त्रोद्योग घटकांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरणामध्ये स्वच्छ ऊर्जा आणि पर्यावरण अनुकूल उपायांच्या वापरावर भर देण्यात आला आहे. तसेच जिनिंग, स्पिनिंग, पॉवरलूम, हातमाग, प्रक्रिया, विणकाम, होजियरी आणि गारमेंटिंग, रेशीम उद्योग, लोकर, अपारंपरिक आणि सिंथेटिक सूत/फायबर आणि तांत्रिक कापड यासह प्रत्येक उप-क्षेत्राला प्रोत्साहन देऊन राज्यातील संपूर्ण वस्त्रोद्योग मूल्यसाखळीत शाश्वतता आणि तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहन देऊन कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि मागासवर्गीय, अल्पसंख्याक आणि माजी सैनिकांना अतिरिक्त साहाय्य प्रदान करणे, वस्त्रोद्योग क्षेत्राला लक्षणीय भरारी देणे आणि तरुणांसाठी पुरेसा रोजगार निर्माण करणे हे या धोरणाचा उद्देश आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

# विकासासाठी कटिबद्ध

पहिले वर्ष सुराज्याचे



आदिवासी समाजाचा बहुविध वारसा आणि संस्कृतीचे जतन करत त्यांना सक्षम करणे आणि त्यांचे हित जोपासण्यासाठी चालना देणे, हे आदिवासी विकास विभागाचे ध्येय आहे. मागील वर्षभरात या विभागाचा मंत्री म्हणून घेतलेले निर्णय असोत किंवा पुढील काळात घेण्यात येणारे निर्णय, या प्रत्येकाचा उद्देश हा आदिवासी समाजाचा विकास हाच आहे. आदिवासींची लोकसंख्या जास्त प्रमाणात असलेले नंदुरबार, धुळे, नाशिक, पालघर, ठाणे, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, गोंदिया हे जिल्हे आहेत. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्य व केंद्र स्तरावरून विविध योजना व उपक्रम राबवले जात आहेत.



**विजयकुमार गावित**
मंत्री, आदिवासी विकास

अनुसूचित क्षेत्रातील अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे स्थानिक आदिवासींमधून भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सरळसेवेच्या पदभरतीसाठी अर्ज करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) रहिवासी दाखला हा संबंधित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात विहित मुदतीत उपलब्ध होणार आहे. राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ज्या गावांमध्ये आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे, अशा सर्व गावांमध्ये १७ संवर्गातील सरळसेवेची १०० टक्के पदे स्थानिक आदिवासींमधून भरण्याचा निर्णय झालेला आहे.

### मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक

बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आदिवासी विकास विभागाद्वारे योजनांच्या माहिती व मार्गदर्शनासाठी स्वतंत्र टोल-फ्री क्रमांक १८००२६७०००७ सुरू करण्यात आला असून लवकरच बहुसंवादी मोबाइल ॲप्लिकेशन व वेबपोर्टलची स्थापना करण्यात येणार आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या योजना, उपक्रम यांची सर्व प्रकारची माहिती मिळविणे अधिक सोपे व सुलभ झाले आहे. अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना शिधापत्रिका, आधारकार्ड, पॅनकार्ड, जमातीचा दाखला, बँकेत खाते उघडणे, मनरेगा नोंदणी, आयुष्यमान भारत कार्ड आदी कागदपत्रे मिळण्याबाबतची माहिती व मार्गदर्शन कार्यालयीन वेळेत या टोल-फ्री क्रमांकावरून मिळणार आहे.

### आश्रमशाळा, वसतिगृहांसाठी इमारती

येत्या दोन वर्षांत राज्यातील सर्व आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे व त्यात काम करणारे शिक्षक कर्मचारी यांच्या निवासस्थानांसाठी स्वमालकीच्या शासकीय इमारती उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच पुढील वर्षापासून पहिली ते दुसरीच्या वर्गात मराठी, हिंदी, इंग्रजी या अनिवार्य भाषांसोबतच स्थानिक आदिवासी बोलीभाषेतून शिक्षण देण्याची योजना सुरू करण्यात येणार आहे.

राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या सर्व आश्रमशाळा व वसतिगृहांचे डिजिटलायजेशन केले जाणार असून व्हर्चुअल क्लासरूमची संकल्पना अमलात आणली जाणार आहे. मातृभाषेतून शिक्षणासोबतच आदिवासीबहुल भागातील विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वाढीस लागावी, यासाठी आदिवासी बोलीभाषांमधून पहिली, दुसरीच्या वर्गात दृक्‌श्राव्य पद्धतीने विविध संकल्पना शिकवून त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजीत काय संबोधले जाते याचेही समांतर शिक्षण देण्यात येणार आहे.

## योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही योजना केवळ जिल्हास्तरावरून अथवा राज्यस्तरावरून न राबविता सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती सुधारणा योजना पूर्वीची दलित वस्ती सुधार योजना व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना या योजनांप्रमाणे राज्यस्तर व जिल्हास्तर अशा दोन्ही स्तरांवर राबवण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत कामांची यादी, योजनेची व्याप्ती व कामांचे लोकसंख्यानिहाय आर्थिक निकष सुधारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती

महाविद्यालयीन शिक्षणामध्ये संशोधन हा महत्त्वाचा भाग असताना आदिवासी विद्यार्थ्यांनी संशोधन करावे, त्यांना इतर संस्थांप्रमाणे आर्थिक साहाय्य मिळावे, यासाठी राज्यातील १०० आदिवासी विद्यार्थ्यांना दरवर्षी संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती दिली जाते. सद्य:स्थितीत सुरू असलेल्या संशोधन अधिछात्रवृत्तीमध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश केला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना दरमहा ३१ हजार रुपये अधिछात्रवृत्ती दिली जाते. दिव्यांगांना अतिरिक्त दोन हजार रुपये साहाय्य अनुदान दिले जाते. विशेष म्हणजे सगळ्या लाभार्थींना त्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा केली जाते. फेलोशिप जास्तीत जास्त पाच वर्षांपर्यंत देण्याचा निर्णय हे सरकार आल्यानंतर प्रथमच घेण्यात आला आहे. आगामी काळामध्ये नीती आयोगाच्या शिक्षणविषयक धोरणाप्रमाणेच आदिवासी विभागामध्ये शैक्षणिक धोरण राबवले जाणार आहे. पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण हे मातृभाषेमध्ये व बोली भाषेमध्ये देण्याबाबतचा निर्णय प्रथमच घेण्यात आला आहे.

## पोर्टल विकास

आदिवासी युवक व युवतींसाठी शैक्षणिक सुविधा, प्रशिक्षण किंवा व्यवसाय मार्गदर्शन याबाबत पोर्टल विकसित करण्यात येणार आहे. २१ वर्षांवरील आदिवासी युवक-युवतींना यामध्ये आपली नावनोंदणी करता येईल. त्यांच्या पुढील शैक्षणिक सुविधेबाबत तसेच प्रशिक्षणाबाबत किंवा व्यवसायाबाबत मार्गदर्शन व मदत केली जाईल. या पोर्टलमध्ये युवक-युवतींना पुढील काळात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना शिक्षण/प्रशिक्षण/व्यवसाय/साहाय्य/उत्पन्न वाढीबाबत मदत व मार्गदर्शन विभागामार्फत करण्यात येईल.

## जोडरस्ते योजनेसाठी तरतूद

आदिवासी पाडे जोडरस्त्यांच्या माध्यमातून जोडण्यासाठी बिरसा मुंडा जोडरस्ते ही नवी योजना राज्यात पहिल्यांदा राबवली जाणार आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात बिरसा मुंडा जोडरस्ते योजना सुरू केली असून, यासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून हजारो आदिवासी पाडे हे रस्त्यांच्या माध्यमातून जोडली जाणार आहेत.



## वनहक्क कायद्याची अंमलबजावणी

राज्यात वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून वैयक्तिक स्वरूपाचे व सामूहिक स्वरूपाचे दावे मंजूर करून राज्याने आदिवासी बांधवांच्या उत्कर्षासाठीचा एक नवा आदर्श सर्वांसमोर घालून दिला आहे. आदिवांसीची जमीन हीच त्यांची ओळख आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, ३१ डिसेंबर २००७ पासून राज्यात लागू झाला आहे. या अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांना वैयक्तिक किंवा सामूहिक वनहक्क धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. नोव्हेंबर २०२२ अखेरपर्यंत राज्यात १,९८,५५९ वैयक्तिक दावे व ८,५०८ एवढे सामूहिक वनहक्क दावे मान्य करण्यात आलेले आहेत. मान्य केलेल्या वैयक्तिक वनहक्क दाव्यांसाठी १,८४,१०९ हेक्टर वनक्षेत्र व सामूहिक वनहक्क दाव्यांसाठी १३,११,२८३ हेक्टर वन क्षेत्र मंजूर करण्यात आलेले आहे. माहे एप्रिल २०२३ अखेरपर्यंत १,९८,२१३ वैयक्तिक, तर ८,५५७ इतके सामूहिक वनहक्क दावे मान्य करण्यात आलेले आहेत.

## प्रमाणपत्र तपासणी समित्यांची स्थापना

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती अर्जदारांचे दावे तत्काळ निकाली काढले जावेत, याकरिता आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या विद्यमान ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयांव्यतिरिक्त नवीन ७ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात जिथे आवश्यक आहे, तिथे जात पडताळणी कार्यालये उघडले आहेत. जात वैधता समितीची संख्या सातत्याने वाढवण्यात आली आहेत.

## शबरी घरकुल योजना

आदिवासी समाज हा अतिदुर्गम भागात झोपड्यांमध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या घरात राहतो. त्यांना हक्काचे व कायमस्वरूपी पक्के घर मिळावे, यासाठी शबरी घरकुल योजना विभागामार्फत राबवली जाते. शबरी आदिवासी घरकुल योजनेसाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता एकूण ९३,२८८ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यासाठी ९८,३२५ लाख रुपये एवढा निधी वितरित करण्यात आला आहे. योजनेकरिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता एकूण १ लाख घरकुलांचे उद्दिष्ट आहे.

## आदिवासी सांस्कृतिक महोत्सव

राज्यात नाशिक येथे राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात आदिवासी पारंपरिक खाद्य, आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा, आदिवासी लघुपट तसेच माहितीपट महोत्सव, राज्यस्तरीय आदिवासी पारंपरिक हस्तकला प्रदर्शन व

विक्री अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी बांधवांच्या उत्थानासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना असून या योजना तळागाळातल्या आदिवासी बांधवांपर्यंत अशा प्रकारच्या सांस्कृतिक महोत्सवातून पोहोचवण्याचे काम शासनामार्फत केले जात आहे. आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड जोपासण्यासाठी त्यांना आश्रमशाळेत साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### स्वतंत्र क्रीडा आश्रमशाळा

आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये आश्रमशाळांचे योगदान उल्लेखनीय आहे. आधुनिक काळातील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी या शाळांमध्ये आमूलाग्र बदल केले जात आहेत. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये खेळण्याची कला उपजत असते. त्यांना क्रीडा क्षेत्रात उत्तम दर्जाचे प्रशिक्षण व योग्य ते मार्गदर्शन मिळण्यासाठी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध जमिनीवर दोन आश्रमशाळांची निवड करण्यात येऊन एक मुलींकरिता व दुसरी मुलांकरिता स्वतंत्र क्रीडा आश्रमशाळा विकसित करण्यात येणार आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी क्रीडा कौशल्य विकासित करण्यासाठी क्रीडा धोरण तयार करण्यात येणार आहे.

### कृषी व जोडधंद्यासाठी मदत

आदिवासी बांधवांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी ज्या आदिवासी व्यक्तीकडे जमीन आहे, त्यांना कृषी साहित्य, बी-बियाणे उपलब्ध करून देणे, त्यांच्या शेतात विहीर बांधण्यासाठी अर्थसाहाय्य करणे अशा योजना राबवण्यात येणार असून ज्या आदिवासी व्यक्तींना मच्छीमारी व्यवसाय करावयाचा असेल त्यांना केज फिशिंग सुविधा उपलब्ध करून देणे, ज्यांना जोड धंद्या म्हणून दुग्धव्यवसाय करावयाचा आहे, त्यांना दुधाळ जनावरे उपलब्ध करून देणे, ज्यांना बकरी पालनाचा व्यवसाय करावयाचा आहे, त्यांना बकरी उपलब्ध करून देणे, कृषी व कृषीविषयाशी संबंधित विविध योजना, शासनाचे इतर विभाग व आदिवासी विभागामार्फत विविध योजना सुरू करण्यात आल्या असून आदिवासी बांधवांचे उत्पन्न वाढवणे हा उद्देश आहे. नुकताच आदिवासी विभाग व शबरी आदिवासी विकास महामंडळ नाशिक यांच्याद्वारे २८ शेतकरी उत्पादक गटांना वित्तीय मदत करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

### आदिवासी उद्योजकांना पाठबळ

आदिवासी भागात वनसंपत्ती विपुल प्रमाणात आहेत. उपलब्ध वनसंपत्तीचा वापर करून प्रक्रिया उद्योगासाठी अनेक महिला बचतगट, उद्योग संस्था पुढे येत आहेत. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत या प्रक्रिया उद्योगांसाठी आदिवासी उद्योजकांना आवश्यक आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले जाणार आहे. आदिवासी बांधवांना उद्योजकतेच्या प्रशिक्षणातून व्यवसाय उपलब्ध करून त्यांना आर्थिक सक्षम कसे करता येईल, यादृष्टीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ कार्यरत आहे.

येणाऱ्या काळात आदिवासी बांधवांनी प्रक्रिया उद्योगातून तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जाणार आहेत.

### शिक्षणातून समृद्धीकडे कार्यशाळा

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा दर्जा वाढावा, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, एकही आदिवासी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या सर्व विषयांवर विचारमंथन करण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील सर्व आदिवासी विभागांच्या प्रकल्प अधिकाऱ्यांची नाशिक येथे 'शिक्षणातून समृद्धीकडे' दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी, सोयी-सुविधा, नावीन्यपूर्ण उपक्रम, शिक्षकांचे प्रशिक्षण, तसेच संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी शिक्षण विभागात प्रवेश, परीक्षा या सर्व बाबतीत एकसूत्रता आणण्यासाठी कार्यशाळेत चर्चा झाली. यावेळी प्रथमच संपूर्ण महाराष्ट्राचे आदिवासी विभागाचे शैक्षणिक कॅलेंडर प्रर्दशित करण्यात आले.

पहिले वर्ष सुराज्याचे

### विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास

आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास करण्याच्या अनुषंगाने गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून आदिवासीबहुल जिल्ह्यात गुणवंत विद्यार्थ्यांसाठी समर्पित स्वतंत्र आश्रमशाळा जवाहर नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता उंचवण्यासाठी पुणे येथे Tribal Centre For Education Sport and Culture ची स्थापना करण्यात येऊन त्या सेंटरमार्फत आदिवासी आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा आणि नामांकित शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर व केंद्रस्तरावर असलेल्या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्यात येणार आहे. स्पर्धात्मक परीक्षांची माहिती उपलब्ध करून त्यांना मार्गदर्शन करणे व अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या सुविधा त्यांना पुढील काळात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आदिवासी भागातील कुपोषण निर्मूलनासह स्थलांतर आणि रोजगार निर्मितीवर भर देण्यात येत असून त्यासाठी ॲप विकसित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी चांगल्या प्रकारे शिक्षणाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शेवटच्या आदिवासी व्यक्तीसाठी, त्याच्या उत्थानासाठी व विकासासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला असून आदिवासी समाज सक्षम होण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील राहू.

**शब्दांकन : शैलजा पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी

**भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला पाहिजे. ग्रामविकास झाला तरच राष्ट्राचा आणि पर्यायाने राज्याचा विकास होईल. समाजातील सर्व थरातील लोकांचा उद्धार कसा होईल, ग्रामउन्नती व गावाचे कल्याण कशा पद्धतीने साध्य करता येईल, या उद्देशाने स्वच्छ, सुंदर आणि हरितग्राम तयार करण्यासाठी या विभागाद्वारे विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत.**

# शाश्वत विकासाचे ध्येय






**गिरीश महाजन**

मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

राज्यातील प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार मिळावा आणि त्यांचे जीवनमान उंचावण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. ग्रामीण नागरिक शहराकडे मजुरीसाठी वळतात, हे चित्र बदलायचे आहे. शहरांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी ग्रामीण विकासाच्या माध्यमातून आमूलाग्र बदल केले आहेत.

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्यातील गावे स्वयंपूर्ण व्हावीत, सर्व मूलभूत सोयी मिळाव्यात हे अभियानाचे उद्दिष्ट आहे. दारिद्र्य निर्मूलन करणे, इंदिरा आवास योजनेंतर्गत निवाराविषयक सुविधा पुरवणे, प्रशिक्षणातून विकास कार्यक्रम आखणे, लोकप्रतिनिधींचे सक्षमीकरणाद्वारे पंचायती राज व्यवस्था बळकट करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहेत. मजबूत रचनात्मक, सर्वसमावेशक व स्थायी ग्रामीण विकास साधणे हे मुख्य ध्येय आहे.

वैद्यकीय शिक्षण, आयुष (AYUSH) (आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी चिकित्सापद्धत) आणि अन्न व औषध प्रशासन या उपविभागाकडून राज्यातील जनतेस प्राथमिक आरोग्यासह औषधोपचार, विशेषोपचार व अतिविशेषोपचार सेवा देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे.

## पंचायत राज व्यवस्था

महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के प्रतिनिधित्व दिल्यामुळे ग्रामपंचायतींमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढला आहे. भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने सुधारित पंचायत शाश्वत विकास संकल्पना राबवून राज्यातही पंचायतीं विकासाचे नियोजन विकासाच्या ९ संकल्पनांवर आधारित करावयाचे ठरवले आहे. या ९ संकल्पना म्हणजे १) गरिबीमुक्त गाव २) आरोग्यदायी गाव ३) बालस्नेही गाव ४) जलसमृद्ध गाव ५) स्वच्छ आणि हरित गाव ६) पायाभूत सुविधांनी युक्त गाव ७) सामाजिक न्याय आणि सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव ८) सुशासनयुक्त गाव ९) लिंग समभावयुक्त/महिलास्नेही गाव याप्रमाणे आहेत.

## उमेद

ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचतगटांचे 'उमेद' अभियानही राज्यात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. महिला राजकारणासोबत उद्योजकतेत आघाडीवर राहतील, यासाठी शासनाचा विशेष प्रयत्न असणार आहे. या उमेद अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण महिलांचे गरिबी निर्मूलन हाच आहे. महिलांना आर्थिक साक्षर करणे, त्यांना

कौशल्य प्रशिक्षण देणे व त्यातून त्यांना रोजगार मिळावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

### महाआवास

गावातील प्रत्येक गरीब व गरजू व्यक्तीला स्वतःचे हक्काचे घर असावे, हा त्यांचा अधिकार आहे. यातून राज्यात महाआवास अभियानाचा प्रारंभ झाला. लाभार्थ्यांना आवश्कतेनुसार जागा देणे किंवा त्यांना घरकुल बांधून देणे, अर्थसाहाय्य अशा माध्यमातून जास्तीत जास्त बेघरांकरिता घरे उपलब्ध व्हावीत, यासाठी आमचे विशेष प्रयत्न असणार आहे.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजना

स्वतःची जागा नसलेल्या कुटुंबांना जागा खरेदासाठी अर्थसाहाय्य करण्याकरिता राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे.

### रस्ते विकास

ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रस्त्यांचे मजबूत जाळे असणे फार गरजेचे आहे. रस्त्यांची सुविधा असली की ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहात आणून गावाच्या विकासाला सुरुवात होते. नाबार्ड, आशियाई विकास बँक व तत्सम संस्थेकडून कर्जरूपाने निधी उपलब्ध करून घेण्याबाबत विचार सुरू आहे.

### बँक सखी

महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी आणि सबलीकरणासाठी ग्रामीण भागात बँक सखी कार्यरत करण्यात येत आहे. बी.सी. सखी ग्रामीण भागातील लोकांच्या दाराशी जाऊन बँकेतून पैसे काढणे, बीलभरणा करणे व विविध विमा योजना यांसारख्या सुविधा पोहोचवते. या सुविधांमधून महिलांना बँकेद्वारे उपजीविकेच्या संधी प्राप्त होतात.

### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग

प्रत्येक रुग्णालयात ऑक्सिजन, व्हेंटिलेटर्स, रुग्णशय्या या साधनसामग्रीची संख्या वाढवण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येत असून राज्य शासन तसे निर्णयही घेत आहे.

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालये

प्रत्येक नागरिकांस उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा देण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. मागील ९ वर्षात चंद्रपूर, गोंदिया, नंदुरबार, बारामती, सातारा, जळगाव, सिंधुदुर्ग, अलिबाग, धाराशिव अशी ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात आली असून आणखी नाशिक, रत्नागिरी, परभणी या ३ जिल्ह्यांत वैद्यकीय महाविद्यालये लवकरच सुरू होतील. ठाणे, पालघर, जालना, बुलडाणा, अमरावती, वाशिम, भंडारा, गडचिरोली, हिंगोली या ९ जिल्ह्यांमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू करणार आहोत.

### पायाभूत सोयी-सुविधांवर भर

केवळ श्रीमंतांची मक्तेदारी असणारे वैद्यकीय शिक्षण सर्वसामान्य जणांसाठी खुले करण्याचे व त्याचे प्रवेश पारदर्शी करण्याचे काम या शासनाने हाती घेतले आहे. अशा पद्धतीने नवीन महाविद्यालयांमुळे वाढीव डॉक्टर्स निर्माण होणार आहेत. त्यामुळे ग्रामीण, आदिवासी, डोंगरी भागातील वैद्यकीय सेवेचा अभाव दूर करण्यास मदत होईल. तसेच दरवर्षी हजारो डॉक्टर्स सामाजिक दायित्व सेवेंतर्गत शासनास समाजातील अंतिम घटकापर्यंत पोहोचण्यासाठी उपलब्ध होतील. ही सर्व महाविद्यालये नव्याने निर्माण करण्यासाठी व जुन्यांची श्रेणीवाढ करण्यासाठी सुमारे ४,००० कोटींचे कर्ज आशियाई विकास बँकेकडून (ADB) कमीत कमी दरात मिळवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

### ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे महत्त्वाचे निर्णय

**थेट सरपंच निवडणूक –** ● गावाच्या पात्र मतदारांकडून पंचायतीच्या सरपंचपदाची थेट निवडणूक. ● थेट निवडून आलेल्या सरपंचांविरूद्धच्या अविश्वासाच्या प्रस्तावास ग्रामसभेद्वारे आणि शिरगणना करून साध्या बहुमताने अनुसमर्थन देण्याची तरतूद.

**अध्यक्ष व उपाध्यक्ष –** ● महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायतसमित्या अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करून सन २०२२च्या अधिनियम ४६ अन्वये अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधी तीन महिन्यांपर्यंत वाढवण्यात निर्णय.

**सदस्य संख्या –** ● महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करून जिल्ह्यातील मतदार विभागांमधून प्रत्यक्ष निवडून आलेल्या ७५ पेक्षा अधिक नसणाऱ्या व ५० पेक्षा कमी नसणाऱ्या सदस्यांचा जिल्हा परिषदेत समावेश करण्याचा निर्णय.

**सर्वांसाठी घरे -२०२४ –** ● राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना सन २०२४ पर्यंत स्वतःचे हक्काचे घर. ● पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत जागा खरेदी करताना प्रधानमंत्री आवास योजना- शहरीच्या धर्तीवर मुद्रांक शुल्काची रक्कम रुपये १ हजार. ● पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दोन मजलीऐवजी चार मजली इमारत बांधण्यास मान्यता. ● अतिक्रमणे नियमानुकूल करताना महसूल विभागाच्या तरतुदीप्रमाणे मागासवर्गीय लाभार्थ्यांना विनामूल्य नियमानुकूल करून देण्यातही मान्यता.

तसेच CSR माध्यमातून मोठ्या उद्योजकांकडून निधी उपलब्ध करून घेऊन वैद्यकीय क्षेत्रातील पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात येत आहे.

### ‘स्वच्छ मुख अभियान’ सदिच्छादूत

प्रसिद्ध क्रिकेटपटू, भारतरत्न सचिन तेंडुलकर राज्य शासनाच्या ‘स्वच्छ मुख अभियाना’चे सदिच्छादूत (ब्रँड ॲम्बेसेडर) म्हणून कार्य करणार आहेत. राज्य शासनाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या या अभियानासाठी सदिच्छादूत म्हणून लोकांमध्ये जनजागृतीची महत्त्वाची जबाबदारी असणार आहे.

कॅलेंडर, कॅम्प आणि कॅम्पेन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजात मौखिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अभियान राबवले जाते.

### नर्सिंग महाविद्यालये वाढीसाठी प्रयत्न

देशपातळीवर नर्सेसचे प्रमाण वाढावे, याकरिता वैद्यकीय महाविद्यालयास जोडून वाढीव १५७ नर्सिंग महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबत सन २०२३-२०२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे देशात प्रतिवर्षी १५,७०० नर्सेस वाढीव उपलब्ध होणार आहेत. त्याच धर्तीवर राज्यात नर्सेसचे प्रमाण वाढण्याकरिता प्रत्येक शासकीय महाविद्यालयास जोडून Bsc नर्सिंग महाविद्यालये सुरू करणार आहेत.

### विविध आरोग्य अभियान/मोहीम

वैद्यकीय शिक्षण विभागाने आरोग्य संबंधित ८ अभियान राबवण्याचा यशस्वी संकल्प केलेला आहे. १) रक्तदान अभियान, २) स्थूलपणा जनजागृती उपचार अभियान, ३) स्तन कर्करोग जनजागृती व उपचार अभियान ४) स्वच्छ मुख अभियान ५) थायरॉईड जनजागृती व उपचार अभियान ६) अवयवदान जनजागृती अभियान, ७) अंधत्व निवारण अभियान ८) ऑस्टीओपोरेसीस अभियान. अशाप्रकारे राज्यात विविध आरोग्य अभियान व मोहिमा शासकीय व खासगी वैद्यकीय/दंत/आयुष/नर्सिंग व इतर संस्थेद्वारे जनतेपर्यंत पोहोचवून आरोग्यसेवांचे बळकटीकरण, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा आणि संशोधन व्यापकता उंचावण्यास उपयुक्त ठरतील.

### रिक्त पदांची भरती

राज्यातील शासकीय वैद्यकीय रुग्णालयांमध्ये परिचर्या, तांत्रिक व अतांत्रिक पदे रिक्त असल्याने रुग्णालयांमध्ये रुग्णांना सेवा देताना अडचणी निर्माण होत होत्या. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालयातील परिचर्या, तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील विविध पदभरती करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून, त्याबाबतची एकूण ५,१८२ पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या भरतीप्रक्रियेत पारदर्शकता निर्माण व्हावी, याकरिता भरती प्रक्रिया ही टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या नामांकित कंपनीकडून ऑनलाइन स्पर्धा परीक्षेमार्फत राबवण्यात येणार आहे. शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद व होमिओपॅथिक महाविद्यालये व रुग्णालयांतील गट-क व गट-ड या संवर्गामधील ५,०५६ पदे बाह्यस्रोताने भरण्यात येणार आहेत.

### तृतीयपंथांच्या सुविधांमध्ये वाढ

तृतीयपंथी हा देखील समाजाचा एक घटक आहे. ‘सबका साथ सबका विकास’ असे म्हणत असताना या घटकातील लोकांच्या समस्या सोडवण्यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील नाही, तर देशातील पहिला विशेष कक्ष तृतीयपंथीयांसाठी मुंबईतील जी. टी. रुग्णालयात कार्यान्वित झाला आहे. आतापर्यंत राज्य शासनाच्या वैद्यकीय रुग्णालयात भरती होत असताना केस पेपरवर महिला किंवा पुरुष असे दोनच रकाने असायचे आता तृतीयपंथी हा नवीन रकानासुद्धा असणार आहे. यामुळे समाजातील या दुर्लक्षित घटकाच्या विकासासाठी मदत होईल.

### आयव्हीएफ सेंटर सुरू

बदलत्या जीवनशैलीमुळे वंध्यत्वाचे प्रमाण वाढत आहे. त्यानुसार कामा व आल्ब्लेस रुग्णालय मुंबई येथे राज्यातील पहिले शासकीय आयव्हीएफ सेंटर सुरू करण्यात येत आहे. राज्याच्या इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्येदेखील असे आयव्हीएफ सेंटर सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे.

### क्रीडा कामगिरीसाठी आधुनिक तंत्रज्ञान

राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्रोत्साहन मिळावे, जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, युवकांनी खेळाकडे आकर्षित व्हावे, याकरिता राष्ट्रकुल स्पर्धा २०२२ मधील पदक विजेत्या क्रीडापटूंच्या बक्षिसाच्या रकमेत पाचपट वाढ केली आहे. आता राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंना ५० लाख रुपये, रौप्यपदक विजेत्या खेळाडूंसाठी ३० लाख रुपये, तर कांस्यपदक विजेत्या खेळाडूंना २० लाख रुपये करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंच्या मार्गदर्शकासाठी १२.५० लाख रुपये, रौप्यपदक विजेत्या खेळाडूंच्या मार्गदर्शकांना ७.५० लाख रुपये, तर कांस्यपदक विजेत्या खेळाडूंच्या मार्गदर्शकांना ५ लाख रुपये बक्षिस देण्यात येणार आहे.

### सामंजस्य करार

राज्यातील फूटबॉल खेळाच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य क्रीडा विभाग व एफ.सी बायर्न म्युनिक (FC Bayern Munich) जर्मनी यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यात आला. हा होणारा सामंजस्य करार महाराष्ट्रातील फूटबॉल खेळाडूंच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. कुस्ती खेळाडूंना तांत्रिक दृष्टीने सक्षम करण्यासाठी जपानमधील वाकायामा राज्याच्या कुस्तीगीर संघटनेबरोबर सामंजस्य करार.

महाराष्ट्र व वाकायामा या दोन्ही राज्यांतील खेळाडूंना परस्परांच्या देशात जाऊन एकत्र सराव, तंत्रांची देवाणघेवाण करणे सुलभ होणार असून प्रशिक्षकांनाही सहकार्य करून खेळाडूंना नवनवीन तंत्रे शिकवणे शक्य होणार आहे. खेळाडूंच्या खेळाचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील कामगिरी उंचावण्यास मदत होणार आहे. पुणे स्थित असोसिएशन ऑफ फ्रेंड्स् ऑफ जपान (AFJ) या संस्थेच्या समन्वयाने हा करार साध्य झाला आहे.

**शब्दांकन : राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी

पहिले वर्ष सुराज्याचे

# लोकाभिमुख शासन



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ३० जून रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहे. या कालावधीत आमच्या सरकारने लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान निर्णय घेऊन लोकाभिमुख शासनाचे नवे पर्व सुरू केले. महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पातळ्यांवर अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. तसेच विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.



**गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

राज्याचा पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाचा मंत्री म्हणून सातत्याने माझ्या ग्रामीण महाराष्ट्रातील जनतेशी संपर्क आला आहे. या जनतेला पिण्याचे पुरेसे आणि स्वच्छ पाणी मिळावे, यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

## स्वच्छ पाणी सर्वांसाठी

महाराष्ट्र राज्य हे पाणीपुरवठा व स्वच्छता बाबतीत संस्थात्मक बळकटीकरण आणि मागणीवर आधारित पुरवठा करणारे देशातील अग्रगण्य राज्य आहे. ग्रामीण महाराष्ट्राशी निगडित सर्वाधिक महत्त्वाच्या अशा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची जबाबदारी सांभाळताना ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेसे आणि स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे, यासाठी या विभागामार्फत काम सुरू आहे. 'स्वच्छ पाणी सर्वांसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन आपण सर्वसामान्यांसाठी काम करत आहोत. राज्याच्या काही भागात टंचाईच्या झळा असताना त्यांच्या गावपाड्यांवर ही योजना घेऊन जाणे आणि पाणी मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यांवरचा ओसंडून वाहणारा आनंद पाहणे यासारखे सुख नाही. ते सुख आणि ती पुण्याई या विभागाच्या माध्यमातून काम करताना मिळत आहे.

राज्यभरात पाणीपुरवठ्याच्या विविध योजनांची अंमलबजावणी, अपूर्ण कामे पूर्ण करण्याला प्राधान्य, नागरिकांना स्वच्छ पाणी देण्याचा आग्रह आणि त्या दिशेने उचललेली पावले निश्चितच समाधान देणारी आहेत. उद्दिष्ट साध्य होईपर्यंत आपले हे काम सुरू राहणार आहे. हे काम अतिशय दर्जेदार होईल, यासाठी माझा आग्रह आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि विविध क्षेत्रीय यंत्रणांच्या माध्यमातून या विभागाचे काम सुरू आहे. राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याचा पाणीपुरवठा करणे, त्यासंबंधित धोरणात्मक निर्णय घेणे, अंमलबजावणी करणे, तसेच ग्रामीण भागातील नागरिकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेसंबंधित सर्व कार्ये या माध्यमातून हाताळण्यात येतात. विभागाच्या आधिपत्याखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या माध्यमातून हे काम सुरू आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमाचे समन्वयन व संनियंत्रण करणे आदी कामेही या विभागाच्या माध्यमातून करण्यात येतात.

या विभागांतर्गत ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व स्वच्छतेसंदर्भातील कार्याचे धोरण ठरवण्याचे आणि क्षेत्रीय कार्यक्रमांची देखरेख तसेच संस्थात्मक बळकटीकरणाचे कार्य करण्यात येते. राज्याच्या माध्यमातून ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या सेवांचे

नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता या बाबतीत संस्थांच्या कामगिरीचा दर्जा उंचावण्याबाबत महत्त्वाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न या यंत्रणांच्या माध्यमातून होत आहे. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांना भरभक्कम पाठिंबा मिळत आहे. हे काम करताना जलजीवन मिशन अंतर्गत होत असलेल्या कामांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

## हर घर नल से जल

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या माध्यमातून १५ ऑगस्ट २०१९ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जलजीवन मिशनची घोषणा केली. जलजीवन मिशनअंतर्गत ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत 'हर घर नल से जल'प्रमाणे पाणीपुरवठा करण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे. मार्च २०२४ अखेरपर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळजोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन प्रमाणात गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे हे जलजीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे.

## जलजीवन मिशन

राज्यातील अवर्षणप्रवण क्षेत्रातील गावे, संसद आदर्श ग्राम योजनेतील गावे, आकांक्षित जिल्ह्यातील गावे, आदिवासी क्षेत्रातील गावे तसेच अनुसूचित जाती-जमाती-बहुल वस्ती असलेली गावे यांचा समावेश कृतिआराखड्यामध्ये प्राधान्याने करण्यात आला आहे. याशिवाय राज्यातील शाळा, अंगणवाडी, आश्रमशाळा, आरोग्य केंद्र व शासकीय कार्यालयांच्या इमारती या ठिकाणी कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करून त्याप्रमाणे गतीने कार्यवाही आपण करत आहोत. जलजीवन मिशन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी आपण मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

ग्राम पाणी व स्वच्छता समिती आणि गाव कृतिआराखडा बनवण्यात आला आहे. यामध्ये राज्यात ४०,२९७ (१००%) ग्राम पाणी व स्वच्छता समित्या स्थापन झाल्या असून त्या सर्वांचा गाव कृतिआराखडा तयार करण्यात आला आहे. राज्यात जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मे २०२३ अखेरपर्यंत १ कोटी १२ लाख कुटुंबांना कार्यात्मक नळजोडणी पुरवण्यात आली आहे. याशिवाय राज्यातील ३४,७४७ योजनांपैकी सर्व योजनांसाठी कार्यादेश देण्यात आले असून ३१ हजार ५९४ योजनांची कामे सुरू करण्यात आली आहेत. टंचाईग्रस्त गावांमध्ये शाश्वत नळ पाणीपुरवठा साध्य करण्यासाठी देशांत सर्वप्रथम महाराष्ट्राने स्रोत बळकटीकरण उपाययोजना हाती घेतल्या आहेत. या उपक्रमांतर्गत राज्यातील २,७५६ गावांमध्ये थेट भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून सन २०२३- २४ मध्येदेखील या उपक्रमात आणखी १,४४९ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

ज्या ठिकाणी पाणीटंचाई जाणवत आहे, तेथील योजना गतीने पूर्ण करण्याचा विभागाचा प्रयत्न असून उन्हाळ्यात संबंधित गाव आणि वाड्या वस्त्यांवर पाणीटंचाई जाणवणार नाही, याच्या उपाययोजना तत्काळ करण्याचे निर्देश स्थानिक स्तरावर दिले आहे.

## शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट साध्य

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या केंद्र पुरस्कृत महत्त्वाकांक्षी योजना राज्यात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत

## उल्लेखनीय कामगिरी

राज्याने जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मागील एक वर्षात (मे २०२३ अखेर) उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कार्यात्मक नळ जोडणी प्रदान करण्यात राष्ट्रीय सरासरी ६२.८४ टक्केच्या तुलनेत ७६.४८ टक्के उद्दिष्ट गाठले आहे. याशिवाय राज्यातील ७८ हजार १०२ शाळांपैकी ७६, ४०३ (९७.८२%) शाळांना आणि ९०.६९२ अंगणवाड्यांपैकी ८७,२६७ (९५%) अंगणवाड्यांना नळजोडणी देण्यात आली आहे. राज्यात जलजीवन मिशनची अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये मे २०२३ अखेरपर्यंत रु. २,११५.४६ कोटी निधी खर्च करण्यात आला असून आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी रु. ६,३२६.८९ कोटी इतका योजनांच्या पूर्ततेसाठी खर्च झालेला आहे.

पाण्याचा प्रवाह, पाण्याची पातळी, दरडोई दर दिवशी ५५ लिटरने नियमित पुरवठा, पाण्याचा दाब आणि पाण्यात विरघळलेल्या क्लोरिनची मात्रा यासारख्या सेवा वितरण मापदंडांचे वास्तविक वेळेत निरीक्षण करण्यासाठी राष्ट्रीय जलजीवन मिशनने (NJJM) सुरू असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांमध्ये (PWS) आयओटी सोल्युशन (इंटरनेट ऑफ थिंग्ज -IoT) लागू करण्याचा सल्ला दिला आहे. राज्याने २००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणी स्वतंत्र योजना असलेली गावे (Single Village Scheme - SVS) तसेच सर्व प्रादेशिक योजना (Multi Village Scheme - MVS) गावांसाठी मध्यवर्ती IoT सोल्युशनची अंमलबजावणी करण्याची योजना आहे.

राज्यातील १७० प्रयोगशाळांची NABL अधिस्वीकृती झाल्याने पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणीचे काम अधिक अचूकपणे करणे शक्य होत आहे. राज्यातील प्रत्येक गावातील ५ महिलांचे पाणी गुणवत्ता तपासणी प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.

जीवाणूमुळे (बॅक्टेरियोलॉजिकल) दूषित पाण्याचा सामना करण्यासाठी स्वतंत्र योजना असलेल्या (SVSs) गावांमध्ये पाण्याचे निर्जंतुकीकरण व्यवस्थित व नियमित करण्यासाठी व नागरिकांना शुद्ध व निर्जंतुक पाणीपुरवठा करण्यासाठी नळ पाणीपुरवठा योजनांना अत्याधुनिक पद्धतीने इलेक्ट्रोक्लोरिनेशन युनिट बसवण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेमार्फत राबवण्यात येत असलेल्या सर्व स्वतंत्र योजना असलेल्या गावांमध्ये याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. इलेक्ट्रो-क्लोरिनेशन युनिट्स मोठ्या प्रमाणावर बसवण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. यामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नागरिकांना जलजन्य आजाराचा सामना करण्यास मदत होणार आहे.

राबवण्यात येत आहे. १८ एप्रिल २०१८ रोजी संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र राज्य पायाभूत सर्वेक्षणानुसार हगणदारीमुक्त झाल्याचे घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या व पायाभूत सर्वेक्षणाबाहेरील वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध नाहीत अशा पात्र कुंटुंबाचा शोध घेऊन त्या एकूण १०,६०,९४२ पैकी १०,३४,४२७ कुटुंबांच्या वैयक्तिक शौचालयांची बांधकामे पूर्ण करण्यात येऊन त्यापैकी १०,१४,९११ कुंटुंबाना उत्तेजनार्थ अनुदानही वितरित करण्यात आले आहे. एकूणच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील वैयक्तिक शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणावर साध्य करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्याच्या यशस्वीतेनंतर राज्यात टप्पा-२ ची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## स्वच्छ भारत मिशन

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) ही केंद्र पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागाकरिता राबवली जात आहे. सार्वत्रिक स्वच्छता कव्हरेज साध्य करण्याच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी आणि सुरक्षित स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ची घोषणा केली. स्वच्छ भारत मिशन टप्पा-१च्या यशाला बळकटी देणे आणि व्यापक लोकचळवळीच्या माध्यमातून शाश्वत स्वच्छतेचे लक्ष्य गाठण्यासाठी, सन २०२०-२१ ते २०२४-२५ कालावधीसाठी केंद्र शासनाच्या, स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ची अंमलबजावणी सुरू आहे.

त्या अनुषंगाने केंद्र शासनाने जुलै, २०२० मध्ये स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ च्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. या दुसऱ्या टप्प्यांतर्गत ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी यापूर्वी कुटुंब संख्येच्या प्रमाणात ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद होती. तथापि केंद्र शासनाच्या सुधारित घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन मार्गदर्शक सूचनांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)टप्पा-२ करिता सन २०२०-२१ च्या वार्षिक कृतिआराखड्यामध्ये वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदान, सार्वजनिक शौचालय बांधकाम, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, गोबरधन, प्लास्टिक व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन आदी कामांसोबतच इतर कामे समाविष्ट करण्यात आली आहेत.

स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून राज्यातील सर्वात पहिला गोबरधन प्रकल्प नाशिक जिल्ह्यात (ग्रामपंचायत अंदरसुल, ता. येवला) आपण पूर्ण केला असून इतर अमरावती, पुणे, सातारा, जळगाव जिल्ह्यातील प्रकल्प पूर्ण झाले आहेत. राज्यातील सर्वात पहिला मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प आपण रत्नागिरी जिल्ह्यात (ग्रामपंचायत नाचणे, ता. रत्नागिरी) पूर्ण केला.

सन २०२२-२३ या वर्षात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियानाच्या टप्पा-२ अंतर्गत आपण वैयक्तिक शौचालय बांधण्याकरिता रुपये २३० कोटी एवढ्या रकमेची तरतूद केली होती. त्यानुसार सदर वर्षाच्या मार्च अखेरपर्यंत आपण १ लाख ०७ हजार ६४ वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम, तर ३ हजार १९ सार्वजनिक शौचालय संकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

सदर वर्षात हगणदारीमुक्त अधिक मॉडेल ४ हजार ७ गावे राज्यात घोषित करण्यात आली होती. तसेच १५ लाख ५५ हजार ३२९ वैयक्तिक शौचालयांचे रेट्रोफेटिंग करण्यात आले आहे. घनकचरा व्यवस्थापनाची राज्यात ३ हजार ५५६ गावात कामे पूर्ण झाली आहेत, तर सांडपाणी व्यवस्थापनाची राज्यातील ३ हजार ४९९ गावातील कामे पूर्ण झाली आहेत.

सन २०२३-२४ या वर्षात आपण राज्यातील सर्व गावे हगणदारीमुक्त अधिक (ODF+) गावे म्हणून घोषित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, शौचालय स्वच्छता, शाश्वत स्वच्छता ठेवणे, रस्ते साफ करणे, ओला कचरा, सुका कचरा वेगळा साठवणे यांसारखे अनेक उपक्रम प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने लोकांच्या प्रतिसादामुळे या अभियानाला लोकचळवळीत रूपांतर झाले आहे. म्हणून देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनामध्ये स्वच्छतेची आवड निर्माण झाली आहे.

आपल्या देशाला आणि समाजाला स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने पुढाकार घेतला पाहिजे. भारत देशाला स्वच्छ भारत बनवण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. कारण स्वच्छता हे ईश्वराचे रूप मानले जाते. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक नागरिकाला असे वाटले पाहिजे की, आपल्या प्रयत्नातून आपण एक दिवस नक्कीच भारत देशाला स्वच्छ भारत, सुंदर भारत बनवू शकतो. ते निश्चित आपण पूर्ण करू शकू, असा मला विश्वास आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत मिशनअंतर्गत मोठी चळवळ उभारली. त्यामुळे स्वच्छतेविषयी मोठ्या प्रमाणावर जनजागृती झाली. राज्य शासनाने हगणदारीमुक्तीच्या दृष्टीने ग्रामीण भागात चांगली कामगिरी केली आहे. ओला व सुका कचऱ्याचे व्यवस्थापन व पुनर्प्रक्रिया या बाबतीतही राज्याने भरीव कामगिरी केली आहे. मात्र सार्वजनिक व घरगुती शौचालयांचा प्रत्यक्षात वापर होतो का, त्याची देखभालदुरुस्ती, पुनर्प्रक्रिया केलेला बायोगॅस, कम्पोस्ट खताचा वापर कसा व किती प्रभावीपणे केला जातो, याबरोबर घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आदी बाबींमध्ये सातत्य राखण्यासाठी आगामी काळात पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग कटिबद्ध आहे.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# जलवाहतुकीला प्राधान्य

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाला एक वर्ष पूर्ण झाले आहे. या कालावधीत बंदरे व खनिकर्म विभागाचा कार्यभार सांभाळताना राज्यातील बंदरांचा विकास, अधिक प्रमाणात मालवाहतुकीला चालना आणि जलवाहतुकीस प्राधान्य देण्याची भूमिका माझ्या विभागाने घेतली. यापुढील काळातही अधिक वेगाने विकासकामांना गती देत ती कामे पूर्ण करण्याचा मानस आहे.**





**दादाजी भुसे**
मंत्री, बंदरे आणि खनिकर्म

राज्याच्या किनारपट्टी भागात होत असलेला वाढता औद्योगिक विकास लक्षात घेता बंदरांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासन काम करत आहे. सरकारी यंत्रणेच्या माध्यमासोबतच या बंदरांचा विकास खासगी क्षेत्राच्या सहभागातूनही करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभली असून, मुंबई उपनगर व मुंबई जिल्ह्यात अंदाजे ११४ कि.मी., ठाणे व पालघर जिल्ह्यात १२७ कि.मी., रायगड जिल्ह्यात १२२ कि.मी., रत्नागिरी जिल्ह्यात २३७ कि.मी. आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात १२० कि.मी. अशी पसरलेली आहे. या किनारी भागात मुंबई बंदर विश्वस्त व जवाहरलाल नेहरू बंदर विश्वस्त ही २ मोठी बंदरे व ४८ लहान बंदरे महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर आहेत.

## बंदरे विकासाची कामे

राज्याच्या किनारपट्टी आणि किनारपट्टीच्या पाठीमागील प्रदेशात आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून मालवाहतुकीस चालना देण्याकरिता लहान बंदरांचा विकास करणे, जलवाहतुकीचे नियमन, भाडेतत्त्वा, जलयानांचे परवाने इत्यादीकरिता तसेच लहान बंदरांचे प्रशासन व संरक्षणाकरिता विविध सागरी अधिनियम व कायद्यांची अंमलबजावणी करणे, राज्यातील मालवाहतूक तसेच प्रवासी वाहतुकीकरिता अंतर्गत जलवाहतुकीचा विकास करणे, महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीलगत तसेच कोकण प्रदेशातील खाड्यांमध्ये जलआलेखन सर्व्हेक्षण व इतर अन्वेषणे; तसेच गाळ उपसणी करणे, जलप्रवासी वाहतुकीसाठी नौकानयन मार्गात गाळउपसणी व देखभाल तसेच नौकावहन सुविधांचे देखभाल करणे, स्थापत्य अभियांत्रिकी विभागाद्वारे नवीन धक्के, जेट्टी, महाराष्ट्र सागरी मंडळाच्या मालमत्तांची दुरुस्ती व देखभाल करणे, जलक्रीडेसाठी परवानगी, त्यांची अंमलबजावणी व नियमन करणे, समुद्रकिनाऱ्यावरील सामाजिक व आर्थिक क्षेत्र अंमलबजावणी करणे, समुद्रकिनाऱ्यावरील संभाव्य क्षेत्र नियंत्रण आणि वापर करणे आदी माध्यमातून बंदरे विकासाची कामे केली जात आहेत.




## मालहाताळणीत राज्याचा तिसरा क्रमांक

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या माध्यमातून (महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड) या बंदरांचा विकास आणि त्याअनुषंगिक कामे केली जात आहेत. महाराष्ट्रात १५ जेटी / बंदरावरून मालवाहतूक हाताळणी केली जात आहे. लहान बंदरांतून ५२ दशलक्ष टन मालहाताळणी केली जाते, तर मुंबई बंदरे विश्वस्त (एमबीपीटी) येथून ६० दशलक्ष टन, तर जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण येथून ७६ दशलक्ष टन मालहाताळणी केली जाते. आज देशाच्या सर्व किनारी राज्यात मालहाताळणीत राज्याचा तिसरा क्रमांक आहे. लहान बंदरातून जलवाहतूक केली जाते.

बंदरे विकासासाठी खासगी क्षेत्राच्या सहभागाविषयी सर्वप्रथम १९९६ मध्ये बंदर विभाग धोरण जाहीर करण्यात आले. त्यानंतर २०१६ आणि २०१९ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आल्या. आता नवीन बंदर विकास धोरण तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

## बंदर विकास प्रकल्प

रेवस आवरे बंदर प्रकल्प ता. अलिबाग, दिघी बंदर प्रकल्प ता. मुरुड, बालाजी समूह नंतर आदानी पोर्टस्, धामनखोल जयगड (जेएसडब्ल्यू) बंदर प्रकल्प ता.जि. रत्नागिरी, लावगण रायगड बंदर प्रकल्प, मे. आंग्रे पोर्ट, विजयदुर्ग बंदर प्रकल्प, ता. देवगड, रेडी बंदर प्रकल्प - ता. वेंगुर्ला जिल्हा सिंधुदुर्ग, करंजा टर्मिनल जेटी प्रकल्प रायगड, योगायातन पोर्टस् जेटी प्रकल्प - ठाणे खाडीमध्ये वाशी पुलानजीक मानखुर्द बहुउद्देशीय टर्मिनल आदींचा विकास खासगी क्षेत्राच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

याशिवाय वाढवण बंदर प्रकल्पाचा विकास करण्यात येत आहे. जेएनपीए आणि महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांच्या वतीने या प्रकल्पाचा विकास करण्यात येत आहे. तब्बल ६५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक या ठिकाणी होणार आहे. वाढवण बंदरामुळे परिसराचे चित्र बदलणार आहे. उद्योग आणि रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. यामध्ये केंद्र आणि राज्य यांचा ७४:२६ असा सहभाग असणार आहे. वाढवण बंदर उभारणीनंतर ते निश्चितपणे क्रमांक एकचे महसुली उत्पन्नाचे स्रोत असणार आहे.

## प्रवासी जलवाहतूक




सध्या १३६ लाख प्रवासी वाहतूक ही वॉटर टॅक्सीच्या माध्यमातून केली जाते. मांडवा जेटी, बेलापूर नवी मुंबई, भाऊचा धक्का - कशीद दिघीपर्यंत ROPAX जलवाहतूक, एलीफंटा, जेएनपीटी, नेरूळ ते नवी मुंबई - सिडकोमार्फत प्रवासी टर्मिनल, ठाणे - वाशी - बेलापूर हॉवरक्राफ्टद्वारे प्रवासी वाहतूक आणि त्याद्वारे नागरिकांना सुलभता देण्याचा प्रयत्न आहे.

## मत्स्यबंदर विकासकामे

सध्या राज्यात मत्स्यबंदर विकासाची विविध कामे सुरू आहेत. यामध्ये १. हर्णे, दापोली, रत्नागिरी, २. साखरीनाटे, राजापूर, रत्नागिरी, ३. जीवना, श्रीवर्धन, रायगड, ४. भरडखोल, श्रीवर्धन रायगड, ५. सातपाटी पालघर आदी ठिकाणी ही कामे करण्यात येत आहेत.

## खनिकर्म

महाराष्ट्राच्या खनिज संपत्तीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने विविध खाणींच्या पद्धतशीर विकासाला चालना देणे. महाराष्ट्र राज्यात किंवा इतरत्र असलेल्या खाणी, खाण हक्क आणि धातूयुक्त जमीन खरेदी करणे किंवा भाडेतत्त्वावर घेणे आणि त्याठिकाणी संशोधन करणे, काम करणे, विकास करणे या कामांचा समावेश आहे. कंपनीच्या सुयोग्य संचालनासाठी लागणाऱ्या बाबींची पूर्तता करणे आणि उत्पादनाला वापरासाठी बाजारपेठ तयार करणे, सर्व प्रकारच्या प्रमुख आणि गौण खनिजांचे अपग्रेडेशन (स्तर वाढवणे) आदी माध्यमातून काम सुरू आहे. आता सुरू असलेल्या प्रकल्पांचा विस्तार, नवीन खाणी उघडणे आणि खनिज आधारित उद्योगांमध्ये वैविध्य आणण्याच्या दिशेने एक पाऊल विभागाने पुढे टाकले आहे.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,**
विभागीय संपर्क अधिकारी

# आधुनिक तंत्रज्ञानावर भर

**देशाच्या आर्थिक विकासासाठी देशातील नागरिकांना स्वस्त दराने अन्न मिळणे आवश्यक आहे. भारतात अन्न सुरक्षेचे स्वरूप गुणात्मक, परिणात्मक, आणि आर्थिक कसे असावे, याचा गुणात्मक अभ्यास करण्यावर राज्य शासन भर देत आहे. अन्न आणि औषधे यांचे प्रमाणीकरण करून त्यांच्या निर्मितीवर व वाटपावर नियंत्रण ठेवणारी शासकीय यंत्रणा आहे. लोकांच्या जीवनाची गुणवत्ता आणि सामाजिक व्यवस्थापन पातळीचा एक महत्त्वाचा उपाय म्हणजे अन्न सुरक्षा आहे. मागील एका वर्षाच्या कालावधीत विभागांतर्गत आधुनिक तंत्रज्ञान आणि पारदर्शक कारभार करण्यावर भर दिला आहे.**





**संजय राठोड**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन

अन्नपदार्थाच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी १९५४ पासून अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा २०११ पर्यंत लागू होता. २०११ पासून अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्याची जागा अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ या नवीन कायद्याने घेतली आहे. यामध्ये संपूर्ण देशभरात अन्नपदार्थांवरील नियंत्रणात सुसूत्रता आणली गेली आहे. अन्न सुरक्षा पर्यवेक्षणाची एकसमानता आणि क्षमता प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्य शासनाकडून कडक कायद्याची अंमलबजावणी केली आहे.

### प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण

दुधातील भेसळ रोखणे, आवश्यक असणारी औषधे वेळेवर उपलब्ध होणे आणि जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार होत नाही याची दक्षता घेणे यात विभागाची कार्यतत्परता आवश्यक आहे. विभागात अन्नपदार्थ तपासणीसाठी लागणाऱ्या प्रयोगशाळांची संख्या अपुरी आहे. यात वापरली जाणारी उपकरणे आणि तंत्रज्ञान कालबाह्य झाले आहे. यासाठी राज्यातील अस्तित्वात असलेल्या तीन लॅबच्या आधुनिकीकरणासाठी तातडीने ३ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. या प्रयोगशाळेमध्ये आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा आणि उपकरणांवर हा निधी वापरला जाणार आहे. या लॅबमध्ये आता अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अशी उपकरणे येतील. यामुळे अन्न तपासणीत येणाऱ्या अडचणी दूर होऊन कमी कालावधीत आणि अचूकपणे तपासणी करता येणार आहे. एवढेच नाही, तर प्रयोगशाळांची संख्या वाढवून १८ करण्यात येत आहे.

### सेफ्टी ऑन व्हिल्स

विभागात नवीन संकल्पना राबवून लोकाभिमुख कामकाज करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामध्ये 'सेफ्टी ऑन व्हिल्स' या नव्या संकल्पनेचाही समावेश आहे. या संकल्पनेचा वापर करण्याचे ठरवले आहे. तसेच वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. यात अन्न तपासणीसाठी १६ आणि औषध प्रशासनासाठी १६ गाड्या

पहिले वर्ष सुराज्याचे

घेण्यात आल्या आहेत. या गाड्यांमध्ये आवश्यक असणारे तपासणी साहित्य आणि तंत्रज्ञ असतील. ही फिरती प्रयोगशाळा असेल. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोक एकत्रित येतात, जसे की आठवडी बाजार, अशा ठिकाणी या फिरत्या प्रयोगशाळा उभ्या राहतील. यात अन्न भेसळ कशी ओळखावी, यासाठीदेखील जनप्रबोधन करण्यात येणार आहे. प्रयोगशाळेच्या अत्याधुनिकीकरणासाठी ४५ कोटी ७३ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

## आधुनिक तंत्रज्ञानावर भर

आधुनिकीकरणच नव्हे तर माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर भर दिला जात आहे. वेब ॲप्लिकेशन आणि क्लाऊड खरेदीसाठी रुपये ५० लक्ष एवढा निधी मान्य केला आहे. क्लाऊड बेस्ड ॲप्लिकेशनमुळे कामात पारदर्शकता येईल आणि वेळ तसेच संसाधनांची बचत होणार आहे. तसेच विभागासाठी नवीन १८ गाड्या खरेदी करण्यात आल्या आहेत. अन्न तपासणीसाठी १६ आणि औषध प्रशासनासाठी १६ गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. केवळ गाड्या आणि आधुनिकीकरणच नाही, तर विभागात आधुनिक तंत्रज्ञानाचा कामकाजात उपयोग करण्यात येत आहे. तसेच एक सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत असून ज्यामध्ये किरकोळ विक्रेत्यापासून ते घाऊक विक्रेत्यापर्यंत सर्व यंत्रणा अद्ययावत होणार आहे.

## अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना विशिष्ट ओळख

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना विशिष्ट पोषाख देण्याचे प्रस्तावित आहे. अन्न सुरक्षा अधिकारी हे जेव्हा तपासणीसाठी जातात, तेव्हा त्यांच्या पोषाखावरून त्यांची ओळख पटावी, यासाठी त्यांना विशिष्ट पोषाख देणे प्रस्तावित आहे. निळा व पांढऱ्या रंगसंगतीचा असा पोषाख त्यांचा असणार आहे. तसेच त्यांच्या पदाप्रमाणे रँकिंग दर्शवणारे, एक रिबीन किंवा दोन रिबीन अशा स्ट्रिप्सचा समावेशही त्यांच्या पोषाखात असणार आहे. याशिवाय महत्त्वाची अडचण आहे ती मनुष्यबळाची. राज्यव्यापी काम करण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ वाढवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. भरतीप्रक्रिया राबवण्यात येईलच; परंतु तोपर्यंत विज्ञान विषयाची



पार्श्वभूमी असलेले अधिकारी, कर्मचारी प्रतिनियुक्तीने घेऊन त्यांना प्रशिक्षित करण्यात येत आहे. यासाठीची मान्यता घेण्याचे काम सुरू आहे. यामुळे यंत्रणेवर सध्या असलेला ताण काही प्रमाणात कमी होणार आहे.

## जार पाणी उत्पादक व वितरकांना परवाना

राज्यात थंड पाण्याचे उत्पादन करणे व विक्री करण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. त्यासाठी कूल जार, मोठ्या बाटल्या किंवा डब्ब्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचे उत्पादन व विक्री करण्यात येते. अशा उत्पादक व वितरकांना परवाना देण्याबाबत अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांना विनंती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. हे परवाने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नियम व नियमन २०११ अंतर्गत पाणी उत्पादक व वितरक यांना देण्यात येतील.

## भेसळयुक्त व प्रतिबंधित अन्नपदार्थ विक्रीवर कारवाई

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त किंवा अप्रमाणित दर्जा असलेला माल पकडला जातो. धाड टाकल्यानंतर जप्त केलेला हा माल नंतर पोलीस विभागाकडे सुपूर्द केला जातो. त्यानंतरची कार्यवाही ही गृह विभागामार्फत केली जाते. या पकडलेल्या मालाची कस्टडी अन्न व औषध प्रशासन विभागाला मिळावी, यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. हा जप्त केलेला माल, त्यावरील कारवाई पूर्ण होईपर्यंत ठेवण्यासाठी विभागाकडे गोदामांची व्यवस्था नाही, ती गोदामे भाडेतत्त्वावर घेतली जातील.

प्रतिबंधित अन्नपदार्थ वाहतूक करताना जप्त करण्यात आलेली वाहने वन विभागाच्या धर्तीवर शासनाची मालमत्ता म्हणून घोषित करण्यासाठी अधिसूचना निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत आहे. तसेच गुटखा ज्या वाहनात पकडला, ते वाहन जप्त करण्याबाबत कायद्यात बदल करण्याचे प्रस्तावित आहे. गुटखाबंदी करणारे महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य राज्य आहे. आज राज्यात गुटखाबंदी असली तरी दुर्दैवाने जवळील राज्यातून चोरीने आपल्याच राज्यात गुटखा येत आहे. ही अत्यंत खेदजनक बाब निदर्शनास आली. या गुटखा, सुगंधित पानसुपारी यांसारख्या गोष्टीपासून मुक्तता करण्याचे ध्येय आता डोळ्यासमोर आहे. गुटखा राज्यातून हद्दपार करण्यासाठी गृह विभागाच्या सहकार्याने धडक कारवाई सुरू केली आहे. तसेच विभागामार्फत अवैधरीत्या विक्री, वाहतूक करण्यात येणारा गुटखा जप्त करण्यात येतो.

## इट राईट प्रशिक्षण

'इट राईट' आणि 'FOSTAC' प्रमाणपत्र या केंद्राच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांना प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. यासाठी लागणारे प्रशिक्षण देण्यात येत आहे. खाद्य सुरक्षेसह योग्य खान-पान यावरही लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.



इट राईट उपक्रमामध्ये एनजीओंना प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात येत आहे. सदर एनजीओ यामध्ये प्रशिक्षण देणार आहे. इट राईट इंडिया अभियानांतर्गत सर्व भारतीयांना सुरक्षित, आरोग्यवर्धक आणि टिकावू भोजन निश्चित करण्यासाठी देशातील खाद्यप्रणालीत बदल करण्यात येणार आहे.

विभाग म्हणून अधिक जबाबदारीने काम करण्याच्या सूचना सातत्याने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात येतात. त्याचबरोबर कामकाजाचा नियमित आढावा घेतला जातो. अनेक प्रलंबित असलेल्या अपिलांचा जलदगतीने निपटारा केला जातो. गतिमान, पारदर्शक आणि अत्याधुनिक अशी ओळख अन्न व औषध प्रशासन विभागाची व्हावी, असा माझा प्रयत्न आहे.

**शब्दांकन : निलेश तायडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# कामगारांचे सबलीकरण







कोणत्याही देशाची प्रगती आणि विकासामध्ये त्या देशातील कामगारवर्गाचा निर्णायक सहभाग असतो. कोणत्याही आर्थिक घडामोडीमध्ये मनुष्यबळ महत्त्वाची भूमिका निभावताना दिसून येते. कामगार कल्याण संदर्भात काम करण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे; तसेच कामगार सुखी आणि समृद्ध कसे होतील, हे सुनिश्चित करणे हे मुख्य उद्दिष्ट समोर ठेऊन सरकार काम करत आहे.



**सुरेश खाडे**
मंत्री, कामगार

भारतातील कामगारवर्ग संघटित आणि असंघटित अशा दोन क्षेत्रांमध्ये विभागला गेला आहे. संघटित क्षेत्रातील कामगार कडक कायदे आणि नियमाच्या बळावर आपल्या हक्कासाठी लढू शकतात. त्यांना काही प्रमाणात का होईना, आपल्या हक्काची जाणीव आहे; परंतु बहुतांश कामगार असंघटित वर्गवारीत मोडतात, ज्यांना कोणत्याही प्रकारची नोकरीची हमी किंवा सामाजिक सुरक्षा उपलब्ध नाही. आपल्यावरील अन्यायाचा ते योग्य प्रतिकार करण्यासही सक्षम नाहीत. देशातील सर्वच प्रकारच्या कामगारांच्या काही विशिष्ट समस्या आहेत मग ते संघटित क्षेत्रातील असो की असंघटित, औद्योगिक असोत की शेतमजूर किंवा स्थलांतरित असो किंवा स्थानिक.

भारत हा सर्वाधिक कार्यसक्षम मनुष्यबळ असणारा देश आहे. त्यामुळे कामगारविषयक सुधारित कायद्याच्या अनुषंगाने लक्ष दिले पाहिजे. कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कामगार कायद्यांचे सुलभीकरण, सुसूत्रीकरण आणि एकत्रीकरण करण्यासाठी राज्यशासन पावले उचलत आहे.

## प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन

कामगारांना आपल्या हक्काच्या सर्व सोयी सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन उभारण्यात येणार आहे. कामगारांना आरोग्यविषयक सर्व सोयी मिळाव्यात यासाठी मल्टीस्पेशालिस्ट कामगार रुग्णालय उभे करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील सुरक्षारक्षक कामगारांकरिता साधारणपणे १२ टक्क्यांपर्यंत पगारवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## सुधारित आकृतिबंध

राज्यातील ३६ माथाडी मंडळे व १५ सुरक्षा रक्षक मंडळे आहेत. माथाडी कामगारांना योग्य वेतन आणि अटीनुसार कामाच्या सुविधा मिळतात की नाही, तसेच महिन्याला वेतन मिळते की नाही याच्या नियंत्रणासाठी प्रशासकीय प्राधिकरण करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच राज्यातील माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळांकरिता सुधारित आकृतिबंध मंजूर करून पदभरती करण्याचा प्रस्ताव ही शासनाच्या विचाराधीन आहे.

कामगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी

राज्यातील प्रमुख कामगार संघटना प्रतिनिधींची राज्यस्तरीय बैठक आयोजित करून कामगारांच्या कल्याणासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींवर चर्चा करण्यात आली आहे. बाह्ययंत्रणेकडून कामे करून घेण्यासाठी ९ सेवापुरवठादार संस्थांच्या पॅनलची नियुक्ती करण्यात येणार आहे. बालकामगार प्रथा रोखण्यासाठी जनजागृती व प्रसार प्रसिद्धीसाठी आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

## इमारत व इतर बांधकाम कामगार मजूर

असंघटित कामगांरापैकी बांधकाम मजूर हा मोठा वर्ग आहे. इमारती, रस्ते रेल्वे, हवाई, वाहतुकीच्या दृष्टीने कामे, कालवे, गटारे, बंधारे व पूर नियंत्रण कामे, उर्जा वाहून नेणे वितरित करणे, पाण्यासंबंधीचे विविध कामे, तेल वायुसंबंधीची कामे, पोलादी पूल, पाणी वाहून येण्याचे नळ, इत्यादी. कामाचा समावेश होतो. राज्यातील इमारत कामगारांची नोंदणी वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली आहे. बांधकाम कामगारांच्या नोंदणीमधील अडथळे दूर करण्यासाठी नोंदणी शुल्क रु. २५/- ऐवजी केवळ १/- रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासण्यांमध्ये वाढ करून सद्य:स्थितीत २३ प्रकारच्या चाचण्या करण्यात येत आहेत. उपचारासाठी चाचण्यांचे विश्लेषण करून औषधोपचारासाठी आवश्यक ती मदत; तसेच गंभीर आजारांसाठी ५ ते ७ लाख रुपयांपर्यंतची मदत सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## विमा योजनेला प्राधान्य

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने नुकतेच बांधकाम कामगारांच्या आरोग्यासाठी सकारात्मक पाऊल टाकले आहे. राज्यातील कामगारांना दीड लाखापर्यंत मोफत उपचार घेता येणार आहेत. कामगारांना या योजनेचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी प्रत्येक तालुकास्तरावर कामगार सुविधा केंद्र उभारण्यासाठीची प्रक्रिया सुरू आहे.

शहरी भागांमध्ये रस्त्यावर उभे राहणाऱ्या बांधकाम कामगारांसाठी निवारा शेड/नाका शेड उभे करून प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच बांधकाम कामगार मंडळांतर्गत तक्रार निवारणासाठी हेल्पलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



## असंघटित कामगारांचे वर्गीकरण

अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतकरी, मासेमारी करणारे, जनावरांचे संगोपन करणारे, बांधकाम व्यवसायावर काम करणारे, विणकाम करणारे, कारागीर विटा व दगड खाणीत काम करणारे. लाकूड कापण्याच्या मिलमध्ये काम करणारे कामगार असंघटित कामगारांचे वर्गीकरण करण्यात येते.

एखाद्या उद्योगाला किंवा सध्याच्या सामाजिक सुरक्षेच्या योजना व कायदे लागू होण्यासाठी अनुक्रमे १०, २०, ३० कामगार संख्या असणे आवश्यक असते. अशा प्रकारे १० पेक्षा जास्त कामगारसंख्या असणाऱ्या क्षेत्राला संघटित क्षेत्र म्हणतात.

## गुणवंत कामगार पुरस्कार

१९७९ पासून गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार दिला जातो. नोकरी करत असतानाच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संघटन आदी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कामगारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे नोंदीत असलेल्या आणि आस्थापनेत कमीत कमी ५ वर्षे सेवा झालेल्या ५१ कामगारांना दरवर्षी हा पुरस्कार देऊन गौरवले जाते.

## अर्धवेळ कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात कार्यरत असलेल्या अर्धवेळ कर्मचाऱ्यांच्या मानधनात एक हजार रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. मंडळामार्फत महाकल्याण कौशल्य व विकास रोजगार योजना कार्यक्रमांतर्गत नाशिक, नागपूर व जळगाव येथे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये भाग घेतलेल्या ४,९४९ उमेदवारापैकी १,५९९ उमेदवारांना रोजगार प्राप्त झाला आहे. मंडळाच्या प्रभादेवी, मुंबई येथील कामगार क्रीडा भवनात १०० मी. रायफल शूटिंग रेंज उभारण्यात आली आहे. तसेच क्रीडा भवनाच्या मैदानात आर्चरी ट्रेनिंग सेंटर

उभारण्यात आले आहे.

## राज्य कामगार विमा योजना

प्रत्येक जिल्ह्यासाठी ईएसआयसी कर्मचारी विमा योजना सुरू करण्यात येणार आहे. सरकारी आणि खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठीही आरोग्य विमा योजना आहे. ज्या संस्थेमध्ये १० ते २० कर्मचारी किंवा त्याहून अधिक कर्मचारी आहेत अशा ठिकाणी ही योजना लागू होते. केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाच्या अंतर्गत ही योजना चालवली जाते. सध्या राज्यातील खालील ७ ठिकाणी ESIC चे हॉस्पिटल मंजूर झालेले आहे. पालघर, सातारा, पेण (रायगड), पनवेल (रायगड), जळगाव, चाकण (पुणे), बारामती (पुणे). इ. ईएसआयसी योजनेंतर्गत कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबाला वैद्यकीय सुविधा पुरवल्या जातात. कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतरही ESICचा फायदा मिळतो. कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर कुटुंबातील सदस्यांना पेन्शन सुविधा लागू होते.

## बाष्पके संचालनालय

बाष्पक म्हणजे ज्या बंद पात्र साधनात दाबाखाली बाष्पनिर्मिती होते. हे बाष्प ऑईल मिल, वस्त्रोद्योग, रासायनिक उद्योग, पेट्रोकेमिकल्स, रिफायनरिज (कच्चे खनिज तेल), दुग्ध/खाद्य व्यवसाय, हॉटेल उद्योग, वीजनिर्मिती इत्यादींसाठी वापरले जाते. या सर्व उद्योगात बाष्पकांची गरज भासते. जरी बाष्पक हा अत्यंत उपयोगी असला तरी त्याच्या स्फोटकतेमुळे तो धोकादायक ठरू शकतो. बाष्पकाच्या स्फोटामुळे अपघात होतात व त्यामुळे जीवित व वित्तहानी होऊ शकते. अपघात टाळण्यासाठी बाष्पकाच्या भागांची तपासणी (निरीक्षण) करत्यावेळी सुरक्षेच्या दृष्टीने किंवा बाष्पकाचे निरीक्षण करतेवेळी कर्मचाऱ्याने कोणती काळजी घ्यावी, यासंबंधी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.




## औद्योगिक सुरक्षा व संचालनालय

कामगारांच्या सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणासाठी काम करणे व कामगारांच्या हक्काचे संरक्षण आणि तक्रारींचे निराकरण करणे यासाठी काम करणे.

## कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्था-उद्दिष्टे

- शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण, यांच्या माध्यमातून कामगार क्षेत्रातील सर्व संबंधित घटकांचा व्यावसायिक दर्जा उंचावणे, तसेच विविध कामगार कायदे प्रभावीपणे व्यवहारात आणण्यासाठी श्रमिक अभ्यासाचे प्रशिक्षण देणे.
- सामाजिक कार्याची कामगार कल्याणास लागू होत असलेली तत्त्व व प्रणाली, इत्यादींविषयी मूलभूत प्रशिक्षण देणे.
- कामगार कल्याण कार्य व औद्योगिक संबंध, या क्षेत्रांतील सिद्धान्त व उपयोजन याविषयी व्यावसायिक शिक्षण प्रदान करणे; तसेच कामगार कल्याणाच्या क्षेत्रातील प्रशिक्षणार्थींमध्ये कौशल्ये व व्यावसायिक दृष्टिकोन यांचा विकास करणे.
- कामगार कल्याणाच्या कामास एक यशस्वी व्यवसाय करण्याच्या दिशेने; तसेच त्या क्षेत्रात व्यावसायिक स्थान व दर्जा मिळवण्याच्या दिशेने, कामगार कल्याण क्षेत्रातील कार्यकर्त्यांना आवश्यक ते साहाय्य करणे.
- कामगार क्षेत्रातील सामाजिक समस्यांचा शास्त्रीय अभ्यास करणे व अशा अभ्यासास प्रोत्साहन देणे. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या अभ्यासाच्या परिणामांचे व निरीक्षणांचे योग्य त्या माध्यमातून प्रकाशन करणे.
- भारताला जगातील सर्वात मोठे गुंतवणूक आणि उत्पादननिर्मिती केंद्र बनवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. त्यासाठी सरकार विविध उपयोजना करत असून नवी धोरणे आखत आहे. कामगार सुधारणाप्रति समग्र दृष्टिकोन ठेऊन आर्थिक वृद्धीसोबतच कामगारांचे खऱ्या अर्थाने कल्याण साधण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.


**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# विकास हाच केंद्रबिंदू

**महाराष्ट्रात शेती, शेतमजूर आणि शेतकरी हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे गेल्या वर्षात राज्य शासनाने ग्रामीण जनतेचे, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास सर्वाधिक प्राधान्य दिले. रोजगाराबरोबरच शेती समृद्ध आणि शेतकरी स्वयंपूर्ण झाला पाहिजे, यासाठी राज्य शासनाच्या रोहयो आणि फलोत्पादन विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शासनाच्या एका वर्षाच्या कालावधीतील रोहयो आणि फलोत्पादन विभागाच्या नवीन योजना आणि अंमलबजावणीबाबतचा हा आढावा..**






**संदिपानराव भुमरे**
मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन


अकुशल रोजगाराची पूर्तता, दीर्घकालीन टिकणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावेल व कायमस्वरूपी मालमत्ता तयार होईल, अशा प्रकारे योजनेची अंमलबजावणी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत. भविष्यातही नवनवीन उपक्रम राबवण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना वर्षभरात किमान १०० दिवस रोजगार उपलब्ध व्हावा, या हेतूने केंद्र सरकारने कायदा करून महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरू केली आहे. या योजनेतून प्रामुख्याने अकुशल मजुरांना रोजगार देणे हाच हेतू असल्याने सुरुवातीला त्यातून केवळ मजुरांकडून होऊ शकतील, अशीच कामे मंजूर केली जात होती.

## कुशल कामांचा समावेश

रोजगारनिर्मिती करताना कंपार्टमेंट बंडींग, चेक डॅम, कंटूर बंडिंग, गॅबियन बंधारे, गली एग, भूमिगत बंधारे, शेततळे, वैयक्तिक लाभाच्या सिंचन विहिरी, सामूहिक विहिरी, रेशीम लागवड, फळबाग लागवड, नर्सरी, कंपोस्ट पीट, व्हर्मी कंपोस्ट, नाडेप, जनावरांचे गोठे, वृक्षलागवड, सामूहिक वृक्षलागवड, वैयक्तिक वृक्षलागवड प्रामुख्याने महोगनी वृक्षलागवड, बारमाही रस्ते, पेव्हर ब्लॉक, काँक्रिट रोड, बाजार तळ, खेळाची मैदाने तयार करणे / दुरुस्ती करणे, धान्य गोदाम, अंगणवाडी, ग्रामपंचायत भवन, छोटे पाझर तलाव, स्मशानभुमी शेड, छोटे पूल, शौचालयाचे बांधकाम, शाळेसाठी कंपाऊंड वॉल, छतावरील पाण्याचे पुनर्भरण, इमारत दुरुस्ती कामे करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. या कामांचा समावेश वार्षिक कृतिआराखड्यात तसेच लेबर बजेटमध्ये करता येऊ शकेल व कामे कार्यान्वित करताना पुढे तांत्रिक अडचणी निर्माण होणार नाही, यासाठी राज्यभरातील सर्व पातळीवरील अधिकारी-कर्मचारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

## रोपवाटिकांची स्थापना

राज्यात विविध फळपिकांना असलेले पोषक हवामान विचारात घेता संबंधित विभागात त्या त्या फळपिकांच्या

रोपवाटिकांची स्थापना करण्यात आली आहे. राज्यामध्ये दर्जेदार रोपनिर्मिती व गुणवत्तापूर्ण कलमे/रोपांची निर्मिती करून शेतकऱ्यांना उच्चप्रतीची कलमे/रोपे पुरवण्यासाठी शासकीय रोपवाटिकांची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यातील फलोत्पादनामध्ये झालेल्या वाढीमध्ये शासकीय योजनांचा जसा सहभाग आहे, तसाच राज्यातील शेतकऱ्यांचेसुद्धा मोठे योगदान आहे. राज्याने केवळ फलोत्पादन पिकाच्या क्षेत्र वाढीमध्येच प्रगती केलेली आहे, असे नाही तर राज्यातील मोठ्या प्रमाणावर फळे व भाजीपाल्याचीही निर्यात युरोपियन युनियन व इतर देशांमध्ये होत आहे.

## कांदाचाळीसाठी १ लाख ६० हजार अनुदान

कांद्याच्या बाजारभावातील चढ-उतार होण्यापासून सुरक्षा, स्थानिक बाजारपेठेत योग्य दरात पुरवठा व निर्यातीची मागणी भागवण्यासाठी कांदा साठवणूक क्षमता वाढवणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्राहकांना माफक दरात व सातत्याने कांदा उपलब्ध होऊ शकतो.

## पाणंद शेतरस्ते योजनेत सुधारणा

मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद शेतरस्ते योजनेत सुधारणा करून नवीन योजना सुरू करण्यात येईल. रोजगार हमी योजना विभागास १०,२९७ कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येणार आहेत.

## सुविधासंपन्न कुटुंब मिशन आणि सर्वांगीण ग्रामसमृद्धी योजना

मनरेगा आणि विविध विभागांच्या योजनांच्या अभिसरणातून सुविधासंपन्न कुटुंब मिशन आणि सर्वांगीण ग्रामसमृद्धी योजना राबवण्यास येत आहे. रोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर अमृतमहोत्सवी फळझाड / वृक्षलागवड व फूलपीक लागवड कार्यक्रम राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

वैयक्तिक लाभार्थ्याला सिंचन विहिरीचा लाभ देण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. शासन निर्णयानुसार सिंचन विहिरीच्या खर्चाची मर्यादा ४ लक्ष रकमेपर्यंत वाढवण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जमाती व दारिद्र्यरेषेखालील कुटुंब यांकरिता दोन सिंचन विहिरींमधील किमान १५० मीटर अंतराची अट रद्द करण्यात आली.

## महाकृषिविकास अभियान

शेतीच्या शाश्वत विकासासाठी सर्वसमावेशकता अत्यंत गरजेची आहे. म्हणूनच 'महाकृषिविकास अभियान' योजना जाहीर करण्यात आली. यात पीक, फळपीक या मूलभूत घटकांच्या उत्पादनापासून ते मूल्यवर्धनापर्यंतची प्रक्रिया तसेच तालुका, जिल्हानिहाय शेतकरी गट, समूहांसाठी एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार केला आहे. यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. या योजनेसाठी राज्य शासनाने ३ हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत.

## मागेल त्याला फळबाग

मागेल त्याला शेततळे योजनेचा विस्तार करण्यात येत असून, आता मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणीयंत्रे आणि कॉटन श्रेडर हे घटक उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या विविध योजनांकरिता सन २०२३-२४ मध्ये १ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

## सिट्रस इस्टेट योजनेस मोठ्या प्रमाणात निधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तालुका फळरोपवाटिका-पैठण प्रक्षेत्रावर मोसंबी फळपिकासाठी सिट्रस इस्टेट ही योजना राबवण्यास तसेच सिट्रस इस्टेटची स्थापना करण्यात आली आहे.

मोसंबी फळपिकाची उच्च दर्जाची कलमे पुरेशा प्रमाणात निर्माण करण्यासाठी, उच्च तंत्रज्ञानावर आधारित फळरोपवाटिका स्थापन करणे, मोसंबीची जातिवंत मातृवृक्ष लागवड करणे, मोसंबी फळपिकाच्या शास्त्रोक्त लागवड पद्धतीच्या फळबागा विकसित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना कीड-रोगमुक्त उच्च दर्जाची कलमे पुरेशा प्रमाणात किफायतशीर दराने उपलब्ध करून देणे, यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे.

## कोकणासाठी काजू बोर्ड

सुमारे २०० कोटी रुपयांच्या भागभांडवलासह कोकणासाठी काजू बोर्डाची काजू बोंडूवर निर्मिती करण्यात





आली आहे. साध्या काजू बोंडूपेक्षा प्रक्रिया केलेल्या काजू प्रक्रिया केंद्र बोंडूची किंमत ७ पटीने अधिक आहे. उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. काजूच्या लागवडीपासून प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी 'काजू फळ विकास योजना' संपूर्ण कोकण, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा या तालुक्यांत राबवण्यात येईल. या योजनेकरिता १,३२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे

नागपूर, काटोल व कळमेश्वर, जि. नागपूर, मोर्शी, जि. अमरावती तथा केंद्र बुलडाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येणार आहे. यासाठी २० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकंदरीत फलोत्पादन विभागास ६४८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना 'प्रति थेंब अधिक पीक'अंतर्गत लाभ घेतलेल्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनास पूरक अनुदान देऊन आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने सूक्ष्म सिंचन संच बसवणाऱ्या राज्यातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत पूरक अनुदान देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. याकरिता लागणारा आर्थिक भार राज्य शासन उचलत आहे. यामध्ये अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देऊन सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे ८० टक्के व ७५ टक्के एकूण अनुदान देय आहे. मुख्यमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सन २०२२-२३ वर्षाकरिता २०४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना

ही योजना २०१८-१९ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे लाभार्थी फळबाग लागवड बाबीचा लाभ घेऊ शकत नाही, त्यांना लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेत लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना मंजूर अनुदान पहिल्या वर्षी ५० टक्के, दुसऱ्या वर्षी ३० टक्के आणि तिसऱ्या वर्षी २० टक्के अशा तीन वर्षांत देण्यात येणार असून लाभार्थी शेतकऱ्याने दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीच्या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी लागवड केलेल्या झाडांचे जीविताचे प्रमाण बागायती झाडांसाठी ९० टक्के, तर कोरडवाहू झाडांसाठी ८० टक्के असणे गरजेचे आहे. हे प्रमाण कमी झाल्यास शेतकऱ्याने स्वखर्चाने झाडे आणून पुन्हा जिवंत झाडांचे प्रमाण विहित केल्याप्रमाणे राखणे गरजेचे आहे. अशा प्रकारे शेतकऱ्याला १०० टक्के अनुदान ३ वर्षांत फळबाग लागवडीवर मिळणार आहे. या योजनेसाठी अर्ज करून लाभ घेण्यासाठी शेतकरी कोकण विभागात कमीत कमी १० गुंठे, तर जास्तीच जास्त १० हेक्टर, तर इतर विभागात कमीत कमी २० गुंठे, तर जास्तीच जास्त ६ हेक्टर क्षेत्र मर्यादित लाभ घेऊ शकतो. या योजनेसाठी सन २०२२ - २३ करिता रक्कम १०,४५० लाख अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे.

## मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन

महाराष्ट्रात हळद लागवडीपासून प्रक्रिया व विक्रीपर्यंत शेतकरी, प्रक्रियादार, निर्यातदार यांना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्याचे दृष्टीने हिंगोली जिल्ह्यात मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला लागवड योजना

राज्यातील आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पौष्टिक आहार निर्माण करण्यासाठी आदिवासी कुटुंबांच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला लागवड योजना सुरू करण्यात आली आहे.

## कृषी निर्यात

देशातून होणाऱ्या कृषी मालाच्या निर्यातीमध्ये महाराष्ट्र राज्याचा मोठा वाटा आहे देशातून एकूण निर्यातीच्या ८१ टक्के द्राक्ष, ९२ टक्के आंबा, ८३ टक्के केळी, ४३ टक्के डाळींब, ५१ टक्के कांदा, ४६ टक्के भाजीपाला, ३५ टक्के आंबा पल्प, २८ टक्के प्रक्रिया केलेले फळे व भाजीपाला निर्यात होतात.

## विकेल ते पिकेल अभियान-कृषी व सलग्न विभागामार्फत राज्यात राबवणे

राज्याचे कृषी क्षेत्रातील बलस्थाने आणि पायाभूत सुविधा यांचा योग्य वापर करून बाजाराभिमुख कृषी विकासाच्या आधारे देशांतर्गत व जागतिक बाजारपेठेतील संधीचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी कृषी व कृषी संलग्न विभागांनी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यासाठी 'विकेल ते पिकेल' अभियान राबवण्यात येत आहे.

**शब्दांकन : राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी

पहिले वर्ष सुराज्याचे

# उद्योजकांची पसंती



राज्यात उद्योगासाठी पोषक वातावरण उपलब्ध आहे. शासन आणि उद्योजक यांनी एकत्र येऊन काम केल्यास महाराष्ट्रासह भारत देश ही अधिक सुजलाम्-सुफलाम् बनेल. राज्य आणि देश ही केंद्र शासनाकडून नुकत्याच जाहीर झालेल्या थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) सहभागात महाराष्ट्र हे देशातील प्रथम पसंतीचे राज्य ठरले आहे. देशातील एकूण थेट परकीय गुंतवणुकीच्या २९ टक्के गुंतवणूक राज्यात आली आहे.

## दावोसमधील सामंजस्य करार

जानेवारी २०२३ दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने १९ कंपन्यांशी १ लाख ३७ हजार ६६६ कोटी इतक्या रकमेचे सामंजस्य करार केले. त्यामधून १,०१,३८९ लोकांसाठी रोजगारनिर्मिती होणार आहे. या करारांपैकी ६६,२२४.४८ कोटी रुपये गुंतवणूक व ९४०२४ रोजगारनिर्मितीचे १८ करार हे देशांतर्गत होते, तर १४,३५९.९ कोटी रुपये गुंतवणूक व २,६८१ रोजगारनिर्मितीचे, तर ७ करार हे थेट परकीय गुंतवणुकीच्या माध्यमातील होते. गुंतवणूक सामंजस्य करारांव्यतिरिक्त माहिती व सहकार्याचे इतर ४ सामंजस्य करार करण्यात आले. मुंबई महानगर विकास प्राधिकरणामधील विकास केंद्राबाबत बर्कले युनिव्हर्सिटी, कॅलिफोर्निया यांचे समवेत सामंजस्य करार करण्यात आला.

जानेवारी २०२३ मध्ये दावोस येथील जागतिक गुंतवणूक परिषदेमध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे १.३७ लाख कोटी रुपये गुंतवणुकीच्या १९ उद्योग घटकांसोबत सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आले. त्यातील ३३,१७० कोटी रुपये गुंतवणुकीच्या ४ प्रकल्पांना मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

नुकताच महाराष्ट्र शासन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यामुळे ४० हजार रोजगारांची निर्मिती होणार आहे.

## नवीन माहिती तंत्रज्ञान धोरण

नव्या संकल्पना आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील नावीन्यतेला चालना देऊन महाराष्ट्र राज्याला 'ज्ञान नेतृत्व अर्थव्यवस्था' म्हणून स्थापित करण्यासाठी राज्याने नवे माहिती आणि तंत्रज्ञान धोरण जाहीर केले आहे. धोरणामुळे ९५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून साडेतीन लाख रोजगाराची संधी निर्माण होणार आहे. या धोरणात

**महाराष्ट्रात औद्योगिक धोरण राबविण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. उद्योजकांना अपेक्षित आणि आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा, लागणारे कुशल मनुष्यबळ, त्यांच्या मागण्या, विविध परवानग्या, तसेच नव्याने उद्योग सुरू करणाऱ्यांसाठी शासन सहकार्य करणार आहे. नवउद्योग, लघु उद्योग आणि उद्योगामध्ये नावीन्यता आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.**



**उदय सामंत**
मंत्री, उद्योग

मुद्रांक शुल्क माफी, विद्युत शुल्क माफी, वीज दर अनुदान, भांडवली अनुदान इत्यादी सवलती दिल्या आहेत. स्टार्टअप व कौशल्य विकासाकरिता एम-हबची निर्मिती करण्यात येणार आहे.

## नवीन धोरणांना मुदतवाढ

महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने या धोरणास २०२३ पासून सहा महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण - २०१८, रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ॲण्ड ज्वेलरी, सूक्ष्म, इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले (Parks) धोरण-२०१८ यांना सहा महिने मुदतवाढ देण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी पुरवून त्यांना आत्मनिर्भर बनवणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना राज्यामध्ये १ ऑगस्ट २०१९ पासून राबवण्यात येत आहे. या योजनेला मिळत असलेला उत्कृष्ट प्रतिसाद, लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी, प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमामध्ये झालेल्या सुधारणा तसेच चालू वर्षाचे वाढते लक्ष्यांक इत्यादी बाबी विचारात घेता, या योजनेमध्ये सुधारणा करण्याचा शासन घेण्यात आला आहे.

या योजनेच्या माध्यमातून चालू आर्थिक वर्षात राज्याने एकूण १२ हजार ३२६ कर्ज प्रकरणे मंजूर केली आहेत. मंजूर कर्ज प्रकरणांमध्ये ५ हजार ५९६ घटक हे उत्पादन क्षेत्रातील असून ६ हजार ७३१ घटक हे सेवा क्षेत्रातील आहेत.

## विशेष प्रवर्गातील घटकांना अनुदान

पात्र मालकी घटकामध्ये वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थानी मान्यता दिलेले बचतगट यांच्यासह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी) यांचा समावेश करण्यात आला आहे. विशेष प्रवर्गाखाली अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग व माजी सैनिक यांचा समावेश होता. त्यामध्ये आता त्यासोबतच इतर मागास प्रवर्ग, विमुक्त व भटक्या जमाती आणि अल्पसंख्याक या तीन घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे विशेष प्रवर्गाखाली समाविष्ट होणाऱ्या उक्त तीन नवीन घटकांना शहरी भागामध्ये २५ टक्के, तर ग्रामीण भागामध्ये ३५ टक्के देय अनुदानाचा फायदा होणार आहे.



पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी १० लाख रुपयांवरून २० लाख रुपये एवढी करण्यात आली आहे. वित्तीय संस्था (बँक) यामध्ये सरकारी बँका, तसेच खासगी क्षेत्रातील शेड्युलड बँका-येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. एकूण १४ बँकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना

राज्यातील राज्यातील क, ड व ड+ क्षेत्र, विनाउद्योग जिल्हे, नक्षलग्रस्त क्षेत्र या क्षेत्रातील सूक्ष्म व लघु उपक्रमांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने सन २०१३-२०१४ मध्ये राज्याची स्वतंत्र महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP) जाहीर केली आहे. याअंतर्गत अनुदान वितरण करण्यात येणार आहे. यात, क्षमतावृद्धी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी दोन टप्प्यामध्ये ६०:४० याप्रमाणात राज्य शासनाचे अनुदान वितरित करण्यात येते. सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी तीन टप्प्यांमध्ये २०:६०:२० या प्रमाणात राज्य शासनाचे अनुदान वितरित करण्यात येते.

MSICDP योजनेंतर्गत राज्यातील एकूण २१७ औद्योगिक समूह प्रकल्पांना क्षमतावृद्धी कार्यक्रमांतर्गत मंजुरी देण्यात आलेली आहे. एकूण ९८ औद्योगिक समूह प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्र उभारणींतर्गत अंतिम मंजुरी देण्यात आलेली आहे. अंतिम मंजुरीप्राप्त एकूण ९८ प्रकल्पांपैकी ६३ औद्योगिक समूह प्रकल्पांचे

### महत्त्वपूर्ण निर्णय

- उदयोन्मुख औद्योगिक क्षेत्रांना अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने क्षेत्र आधारित नवीन प्रगतिशील धोरणे बनविण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. यामध्ये प्रामुख्याने राज्य निर्यात धोरण, एमएसएमई धोरण, लॉजिस्टिक धोरण, किरकोळ व्यापार धोरण, अवकाश व संरक्षण धोरण, चक्रीय अर्थव्यवस्था धोरण इ. समावेश आहे.
- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले असून, उद्यम नोंदणी अंतर्गत राज्यात ३० लाखांहून अधिक (देशातील एकूण MSME च्या सुमारे २०%) नोंदणीकृत MSME घटक असून याद्वारे राज्यात सुमारे १० दशलक्ष रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत.
- जी टवेन्टी (G20) हा जगातील प्रमुख २० अर्थव्यवस्थांमधील परस्पर आर्थिक सहकार्य आणि विकासाकरिता एक प्रमुख बहुराष्ट्रीय मंच आहे. राज्याने मुंबई, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे G20 च्या विविध बैठका यशस्वीरीत्या आयोजित केल्या. सहभागी प्रतिनिधींकडून G20 कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळाला आहे.

सामायिक सुविधा केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत. मंजुरीप्राप्त २१७ प्रकल्पांपैकी एकूण २३ प्रकल्प हे १०० टक्के महिला उद्योग घटकांचे आहे. मंजुरीप्राप्त २१७ प्रकल्पांपैकी एकूण १६ प्रकल्प हे १०० टक्के अनुसूचित जाती प्रवर्गातील उद्योगघटकांचे आहेत. मंजुरीप्राप्त २१७ प्रकल्पांपैकी ५ प्रकल्प हे अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योग घटकांचे आहेत. महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत राज्य शासनाने ३१ मार्च २०२३ अखेर २७१.५३ कोटी रुपये रक्कम अनुदान स्वरूपात वितरित केलेली आहे.

### उद्योग समूह प्रकल्पांना अनुदान योजनेंतर्गत आर्थिक सहभाग

#### अनुदानाची मर्यादा सुधारित

केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु उपक्रम-समूह विकास योजनेंतर्गत (MSE-CDP) मंजूर औद्योगिक समूह प्रकल्पांना केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजुरीच्या अनुसार आर्थिक साहाय्य होणेसाठी तसेच प्रकल्पाच्या किफायतशीरपणामध्ये वाढ होण्यासाठी राज्याची सामायिक सुविधा निर्माण करण्याकरिता उद्योग समूह प्रकल्पांना अनुदान योजना या योजनेंतर्गत केंद्र शासनाचे अनुदान रुपये १५ कोटी प्रकल्प किमतीच्या मर्यादेत मंजूर करण्यात येत होते. त्यानुसार प्रकल्प किमतीच्या १० टक्के म्हणजेच रुपये १.५ कोटी इतकी राज्य शासनाची अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने राज्यातील सूक्ष्म व लघू उपक्रमांच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र शासनाच्या MSE-CDP योजनेची अंमलबजावणी उद्योग विभागाच्या आधिपत्याखालील उद्योग संचालनालयामार्फत सन २०१० पासून राज्यात व्यापक प्रमाणात करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून आलेल्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार सूक्ष्म, लघु उपक्रम-समूह विकास योजनेमध्ये (MSE-CDP) केलेल्या सुधारणांच्या धर्तीवर राज्याची सामायिक सुविधा निर्माण करण्याकरिता उद्योगसमूह प्रकल्पांना अनुदान योजना (२८५१ ५४०६) अंतर्गत राज्य शासनाच्या आर्थिक सहभाग सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### रॅम्प कार्यक्रम

केंद्र शासन व जागतिक बँकेच्या साहाय्याने राबवण्यात येणारा Raising and Accelerating MSME Performance (RAMP) हा कार्यक्रम राज्यात राबवण्यासाठी शासनाने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची नोडल संस्था म्हणून नेमणूक केली आहे. हा कार्यक्रम राज्यात राबवण्यासाठी महामंडळाने सल्लागार संस्थेची निवड केली आहे. या संस्थेमार्फत राज्याचा धोरणात्मक गुंतवणूक आराखडा तयार करण्यात येत असून हा आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या निधीएवढा अतिरिक्त निधी राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### व्यवसाय सुलभता

गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी व्यवसाय सुलभता (EoDB) आणि राहणीमान सुलभता (Ease of Living) याअनुषंगाने नियामक अनुपालनाचे ओझे कमी करणे, जाचक कायदे/नियम कमी करणे (Decriminalization of existing acts/rules) याबाबत प्राधान्याने कार्यवाही होत असून कामगार व गृह विभागाच्या १३७ तुरुंगवासाच्या कायदेविषयक तरतुदी कमी करण्यात आलेल्या आहेत. मागील वर्षात अतिरिक्त १५ नव्या सेवा ऑनलाइन पद्धतीने उद्योजकांना मैत्री या एकल व्यासपीठाद्वारे उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

### एक जिल्हा एक उत्पादन

महाराष्ट्राची निर्यातक्षमता आणखी उंचावण्यासाठी राज्य शासनाने विविध पावले उचलली असून प्रत्येक जिल्ह्याची निर्यातक्षमता वाढण्यासाठी जिल्ह्याचा निर्यात आराखडा तयार करून त्याच्या अंमलबजावणींतर्गत कामकाज करण्यात येत आहे. एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) अंतर्गत जिल्हानिहाय प्रमुख कृषी व औद्योगिक उत्पादने निश्चित करण्यात आली असून एकूण ७२ उत्पादनांवर निर्यात संदर्भाने लक्ष केंद्रित करण्यात आले आहेत.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# आरोग्यम् सुखसंपदा

**राज्यातील जनता निरोगी राहावी, तिचे आरोग्य सुदृढ राहावे, नवीन प्रणाली मूल्यावर आधारित सेवा मिळावी, साथीच्या आजारांपासून संरक्षण व्हावे, यासाठी आरोग्य विभाग काम करत आहे. कोविडच्या आव्हानात्मक काळात आरोग्य विभागाने दमदार कामगिरी केली आहे. शासनाच्या एक वर्षाच्या कालावधीत राज्यातील जनतेला सहज उपलब्ध होणारी आरोग्यसेवा अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देण्यासाठी आरोग्य विभागाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.**






**प्रा. डॉ. तानाजी सावंत**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

गाव, तालुका, जिल्हा व शहरी भागातील आरोग्य सेवांचा गुणात्मकरीत्या उपयोग करून नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी राज्य शासन विविध उपाययोजना करत आहे. राज्यातील जनतेचे आरोग्य सुदृढ ठेवून प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम सुखसंपदा' उपलब्ध करून देण्यासाठी शासन काम करत आहे.

### विमा संरक्षण रकमेत वाढ

महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेत विमा संरक्षण दीड लाखांहून ५ लाखापर्यंत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. गाव, तालुकास्तरावरील रुग्णालयेही या योजनेचा लाभ रुग्णांना देत आहे. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना या एकत्रित योजनेंतर्गत लाखो रुग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. कर्नाटक सीमा भागात ८६५ गावांमध्ये मराठी भाषिकांना ही योजना लागू करण्यात आली आहे. या भागातील गरजू रुग्णांना योजनेच्या माध्यमातून लाभ देण्यात येत आहे. दुसरीकडे मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेच्या लाभाची मर्यादा अडीच लाखांवरून ४ लाखांपर्यंत करण्यात आली आहे.

### माता सुरक्षित तर घर सुरक्षित मोहीम

या मोहिमेदरम्यान राज्यातील १८ वर्षांवरील महिलांना, मातांना, गरोदर स्त्रियांना प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट आहे. या मोहिमेतून स्तन कर्करोग, गर्भायशाचा कर्करोग आदीं आजारांविषयीचे निदान करण्यात येणार आहे.

या मोहिमेसाठी राज्य शासनातर्फे प्रति जिल्हा २ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. राज्यात ३० वर्षांवरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान, नाक, घसा व इतर आजारांचे निदान व आवश्यकतेनुसार उपचार व समुपदेशन

### मेळघाटसाठी ४४ कलमी कार्यक्रम

अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्याचा समावेश असलेल्या मेळघाट या दुर्गम भागातील आरोग्यव्यवस्था बळकट करण्यासाठी राज्यात ४४ कलमी कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

- मेळघाटसाठी १६ सामान्य रुग्णवाहिका व नवजात बालकांसाठी २ रुग्णवाहिका देण्यात आल्या आहे.
- अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांना नवीन कार्यालय व कर्मचारी उपलब्ध करून देणे.
- मेळघाटमध्ये तालुकास्तरावर विशेषतज्ज्ञांचा समावेश असलेल्या मोबाइल युनिटची व्यवस्था करणे, मेळघाटात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष भत्ता देणे, प्रसूतीसाठी येणाऱ्या रुग्णासोबत तीन लोकांना जेवण देण्याचा निर्णय,
- गट 'ब'मधील बीएएमएस असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने नियुक्तीची परवानगी देण्याचा निर्णय.
- मेळघाटमधील दुर्गम भागातील मातांना २४० दिवसांची बुडित मजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- अंगणवाडीच्या माध्यमातून माता व बालकांना देण्यात येणाऱ्या आहारावर स्थानिक प्रशासनाने नियंत्रण ठेवणे, सर्व कंत्राटी स्वरूपाची पदे तातडीने भरणे, मेळघाटातून माता व बालकांचे स्थलांतरण झाले असल्यास त्यांना ट्रॅक करून आरोग्य सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचवणे, कर्मचाऱ्यांना जलद संपर्कासाठी वॉकी टॉकी देणे आदी निर्णयांचा समावेशही या कार्यक्रमात आहे.
- भुमका व पडीयाल यांना प्रशिक्षण देणे, सर्व ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात आरओ पाण्याची व्यवस्था करणे, धारणी उपजिल्हा रुग्णालयात ब्लड बँक स्थापन करणे.
- सीटी स्कॅन मशीन कार्यान्वित ठेवणे, डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था करणे.
- हरीसाल प्राथमिक आरोग्य केंद्र ३० खाटांचे करणे, सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये शौचालय बांधकाम किंवा नूतनीकरण करणे.
- गावातील प्रत्येकाला वैद्यकीय सेवेसाठी रुग्णालयात आणण्यासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, ग्रामसेवक, आशा कार्यकर्ता यांचा समावेश असलेली गावपातळीवर समिती स्थापन करणे.
- सर्व शासकीय रुग्णालयांत सीसीटीव्ही लावणे, आशा कार्यकर्ता यांना रुग्णालयातच निवास व्यवस्था देणे, आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विशेष बस चालवणे.
- मेळघाटमधील माता मृत्यूदर व बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी गर्भवती मातांना ३०० रुपये भत्ता देण्यात येत आहे.
- जेनेरिक औषधे प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे. अशा प्रकारे मेळघाटमधील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

करण्यात आले आहे. अतिजोखमींच्या मातांचे / महिलांचे निदान करून त्यांना आवश्यकतेनुसार उपचारसेवा देण्यासाठी राज्य शासनाने व्यापक मोहीम हाती घेतली आहे.

पहिले वर्ष सुराज्याचे

### जागरूक पालक-सुदृढ बालक अभियान

राज्यभरात शून्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुलामुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरूक पालक, सुदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबवण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या अभियानाची सुरुवात करण्यात आली. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे १,८०० शाळांमधील १८ वर्षांखालील जवळपास २ कोटी ९२ लाख मुलांच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अभियानात ९ हजार तपासणी पथकांमार्फत ही अभिनव योजना राबवली जात आहे. काळाची गरज ओळखून बालकांना संदर्भसेवा, रोग निदान, औषधोपचार योग्य आहार याबद्दल जागृती व्हावी, यासाठी हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

किशोरवयीन मुलामुलींच्या आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, आदिवासी विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या समन्वयाने हे अभियान राज्यभर राबवण्यात येत आहे. ही तपासणी शासकीय निमशासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, खासगी शाळा, आश्रमशाळा, अंध शाळा, दिव्यांग शाळा, अंगणवाड्या, खासगी नर्सरी, बालवाड्या, बालगृहे, बालसुधारगृहे, अनाथ आश्रम, समाजकल्याण व आदिवासी विभाग वसतिगृहे (मुले/मुली), शाळाबाह्य (यांचे उपरोक्त दिलेल्या नजीकच्या शासकीय शाळा व अंगणवाडीच्या ठिकाणी) आरोग्य तपासणी करण्यात येते

### हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

राज्यातील ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रत्येक छोट्या आजारासाठी हॉस्पिटलमध्ये यावे लागते. यामुळे वैद्यकीय उपचाराला उशीर होतोच शिवाय प्रवासाचा खर्च होतो आणि अनेकदा तर राहण्याची गैरसोय सुद्धा होते. सर्दी, ताप, खोकला अशा साध्या आजारांसाठी मोठ्या रुग्णालयांमध्ये जाण्याची गरज लागू नये, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ७०० दवाखाने सुरू केले आहेत. शहरी भागातील दवाखाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाने स्मार्ट बनवण्यासाठी, सातत्यपूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी, विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण आणि नियंत्रण करण्यासाठी, तसेच सुलभ आणि परवडणारी जागतिक दर्जाची आरोग्यसेवा प्रदान करून आरोग्य निर्देशांक वाढवण्यासाठी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' राज्यात स्थापना करण्यात आला आहे. राज्यातील ३४२ तालुक्यांमध्ये

१ मे २०२३ पासून दवाखाने कार्यरत झाले आहेत.

## बदली प्रक्रियेत पारदर्शकता आणणे

बदली प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि शासनाला जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास वेळ मिळावा, याकरिता शासनाने ऑनलाइन कामांची व्यवस्था केली आहे. त्यामुळे विभागांतर्गत ऑनलाइन बदल्या करण्याचा निर्णय घेतला आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी https:// transfer.maha-arogya.com व अधिकाऱ्यांसाठी https:// officertransfer.maha-arogya.com ही ऑनलाइन यंत्रणा विकसित केली आहे.

## महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण

राज्य शासनाच्या विविध विभागांसह महापालिका, जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी राज्यात महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्याच आला आहे.

राज्यातील शासकीय, निमशासकीय आरोग्य संस्थांसाठी औषधे, वैद्यकीय उपकरणे, यांच्या खरेदीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण स्थापन केले आहे. या प्राधिकरणात एक आयएएस दर्जाचा अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी असणार आहे. याशिवाय आरोग्य सहसंचालक दर्जाचा जनरल मॅनेजर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य प्रशासकीय अधिकारी अशी एकूण १४ पदे आहेत.




## आरोग्याची वारी – पंढरीच्या दारी

दिंडीमधील वारकऱ्यांना आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, प्रत्येक वारकऱ्याची आरोग्य तपासणी व्हावी, वैद्यकीय सेवा तत्काळ मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

दिंडीमध्ये सुरुवातीलाच एक हजार आरोग्य कीटचे वाटप करण्यात आले आहे. दिंडीसोबत एकूण १२७ आरोग्यपथके आहेत. प्रत्येकी दोन किलोमीटर अंतरावर एक आरोग्यपथक असणार आहे. पालखी मार्गावर व मुक्कामाच्या ठिकाणी २४ तास फिरती वैद्यकीय आरोग्यपथके कार्यान्वित करण्यात आलेली आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीसोबत ३ रुग्णवाहिका पथके, तर श्री संत तुकाराम महाराज पालखीसोबत ४ रुग्णवाहिका पथके असणार आहेत. अत्यावश्यक सेवेसाठी ७५ शासकीय रुग्णवाहिका पालखीसोबत कार्यरत असणार आहे. पालखी मार्गावर असणाऱ्या हॉटेलमधील पाण्याची तपासणी करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पालखी मुक्कामाच्या ठिकाणी तीन दिवसांपूर्वी व एक दिवस आधी धूर फवारणी करण्यात येणार आहे. पालखी मार्गावरील आरोग्य संस्थेमार्फत जैव कचरा विल्हेवाटीचे नियोजन करण्यात आले आहे. पालखी मार्गावर व मुक्कामाच्या ठिकाणी आरोग्य संदेश देणारे तीन चित्ररथ, तीन पथनाट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. अशा पद्धतीने पहिल्यांदाच एवढ्या सूक्ष्म नियोजन पद्धतीने आरोग्याच्या वारीचा उपक्रम राबवण्यात येत आहे. पालखीसोबत ३० बाईक ॲम्बुलन्सही आहेत.

## 'बाळासाहेब ठाकरे सुंदर माझा दवाखाना' मोहीम

राज्यातील उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालय व जिल्हा सामान्य रुग्णालये त्याचप्रमाणे अन्य शासकीय रुग्णालयांमध्ये 'बाळासाहेब ठाकरे सुंदर माझा दवाखाना' मोहीम राबवण्यात येत आहे. शासकीय रुग्णालये आरोग्य संस्थांमध्ये सर्वांना समान सुविधा उपलब्ध करून जास्तीत जास्त रुग्णांनी शासकीय रुग्णालयांच्या सुविधांचा वापर करावा, यासाठी राज्यातील सर्व आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत.

## आरोग्यविषयक जनजागृती मोहिमा

जनतेला चांगले आरोग्य, निरोगी जीवन देण्यासाठी तसेच उपेक्षित व गरजवंतांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. गावागावांत आरोग्य शिबिरे, अवयवदानाबद्दल जनजागृती, मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.

**शब्दांकन : निलेश तायडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# पायाभूत सुविधांची उभारणी

**पहिले वर्ष सुराज्याचे**

केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत 'सेतूबंधन' या उपक्रमाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रेल्वे फाटकमुक्त करणे, या उद्देशाने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी 'सेतूबंधन' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाद्वारे केंद्रीय मार्ग निधी या योजनेंतर्गत उपलब्ध नियतव्ययातून रेल्वे उड्डाणपूल / भूयारी मार्ग यांचे बांधकाम करावयाचे प्रयोजन आहे. यासाठी बांधकामाचा संपूर्ण खर्च हा केंद्र शासनामार्फत केला जाणार असून राज्य शासनाने भूसंपादन व सेवावाहिन्यांचे स्थलांतर यासाठी लागणारा खर्च करावयाचा आहे. त्यामुळे राज्य शासनाची मोठ्या प्रमाणात आर्थिक बचत होणार आहे. सेतूबंधन उपक्रमांतर्गत टप्प्याटप्प्याने समाविष्ट करावयाच्या एकूण ४,२१८.०१ कोटी रुपये किमतीच्या ९१ कामांना केंद्रीय मंत्रालयाद्वारे तत्त्वत: मंजुरी देण्यात आली असून पहिल्या टप्प्यात २५ रेल्वे उड्डाणपूल/भुयारी मार्गांची कामे करण्यात येणार आहेत.

## विकास महामंडळाची स्थापना

रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इत्यादी पायाभूत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ या नावाने महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावरील कामे या महामंडळाद्वारे करण्यात येतील. राज्याबाहेरील कामांमधून मिळालेला नफा हा राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांच्या देखभाल आणि पुनर्बांधणीसाठी वापरला जाऊ शकतो.

## हायब्रीड ॲन्युईटी योजना टप्पा-२

हायब्रीड ॲन्युईटी टप्पा-१ अंतर्गत एकूण ९,६५५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा हाती घेण्यात आली आहे. या योजनेंतर्गत २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये ४,०५० कोटी रुपये एवढा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये जवळपास ३,७०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा पूर्ण करण्यात आली आहे. हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत (टप्पा-२) मध्ये एकूण ७,५४४ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पामध्ये हायब्रीड ॲन्युईटी टप्पा-२ अंतर्गत २१८ कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याविषयक



कामे अर्थसंकल्पित करण्यात आली आहेत. आशियाई विकास बँक अर्थसाहाय्य योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये (भाग-१) १५० दशलक्ष अमेरिकन डॉलर किमतीची (१,७५० कोटी रुपये) ४५१ कि.मी. लांबीची १३ कामे (९ पॅकेज) प्रगतिपथावर आहेत.

## प्रकल्प टप्पा – २

पहिल्या टप्प्याच्या भाग-२ मध्ये ३५० दशलक्ष अमेरिकन डॉलर किमतीच्या (३,९३९ कोटी रुपये) ४६८ कि.मी. लांबीच्या १६ कामांना (१७ पॅकेज) कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. ही कामे प्रगतिपथावर आहेत. या योजनेंतर्गत २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये ५२० कोटी रुपये एवढा निधी खर्च झाला आहे. तसेच या योजनेंतर्गत मागील एका वर्षामध्ये १७० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यात आली आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी ५,००० कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मंत्रिमंडळाने मान्यता

**राज्यातील दर्जेदार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी तसेच रस्ते बांधणीसह दळणवळणाच्या सोयींमध्ये वाढ करण्याच्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून विविध नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात येत आहेत. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातूनही उत्तम प्रतीचा शिधा वितरण करण्यासह अन्न नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत जनसामान्यांसाठी विविध लोकोपयुक्त उपक्रम यशस्वीरीत्या राबवले जात आहेत. या दोन्ही विभागांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला दर्जेदार सोयी-सुविधा, विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा भरीव प्रयत्न सुरू आहे.**



**रवींद्र चव्हाण**

मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

दिली असून त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाने आशियाई विकास बँकेकडे सादर केला आहे. त्यानुषंगाने आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत हाती घ्यावयाच्या सुमारे १,०७७ कि.मी. लांबीच्या ३१ रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी २०२३ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

## महत्त्वपूर्ण निर्णय

- राज्यातील प्रशासकीय व निवासी इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते. या योजनेंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण इमारतींचे बांधकाम मागील ११ महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये नागपूर येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीची इमारत, नागपूर जिल्हा न्यायालयाची विस्तारित इमारत, मुंबई येथील माझगाव न्यायालयाची इमारत, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत, जलभूषण बंगला, राजभवन आदी इमारतींच्या बांधकामांचा समावेश.
- नाबार्ड-२८ अंतर्गत १,०३०.५२ कोटी रुपयांच्या ३८५ कामांना नाबार्डकडून मंजुरी प्राप्त झाली असून या कामांना शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये या योजनेवर ९५३ कोटी रुपये एवढा निधी खर्च झाला आहे. तसेच जुलै २०२२ ते मे २०२३ या कालावधीत ३०८ पुलांची कामे पूर्ण करण्यात आली असून, १८२ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा.
- केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये १,५०५ कोटी रुपये एवढा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच या योजनेंतर्गत मागील १ वर्षामध्ये ९०६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यात आली असून, ५३ पुलांचे बांधकाम पूर्ण.
- राज्यातील रस्त्यांच्या विकासासाठी जुलै २०२२ ते मे २०२३ या कालावधीत २५,७८२ कोटी रुपये एवढ्या अंदाजित किमतीच्या एकूण ९,०८८ कामांना मंजुरी.
- केंद्र शासनाच्या साहाय्याने नक्षलग्रस्त चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील रस्ते व पुलांचे मागील एक वर्षामध्ये १५३ कि.मी. लांबीचे रस्ते आणि ५७ पुलांचे बांधकाम पूर्ण.
- वाळणे, ता. महाबळेश्वर, जि. सातारा येथील श्री उत्तेश्वर मंदिरासाठी १३८.२४ कोटी रुपयांची मान्यता, तर कार्ले, ता. मावळ, जि. पुणे येथील श्री एकवीरा आई मंदिरासाठी ३९.४३ कोटी आणि जि. कोल्हापूर, ता. शिरोळ, खिद्रापुर येथील श्री कोपेश्वर मंदिराकरिता ४४.९० कोटी रुपयांच्या निधीस मान्यता.
- आंगणेवाडी हे राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असणारे प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. येथील मंदिराला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली असून यासाठी ३३ कोटी रुपये इतकी तरतूद.
- कोकणातील पर्यटनवृद्धी व्हावी व पर्यटकांचा प्रवास सुलभ व सुखकर व्हावा, यासाठी कोकणातील १७ रेल्वे स्थानकांना प्रमुख राष्ट्रीय/राज्य मार्गाशी जोडण्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हाती घेण्यात आली आहे. यासाठी ६६.३५ कोटी रुपये किमतीची तरतूद.
- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व योजनांचे संनियंत्रण करणे या प्रयोजनासाठी PMIS - Project Management Information system ही संगणकीय प्रणाली विकसित.
- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी आवश्यक असणारा ५,६४० कोटी रुपयांचा निधी हुडको व इतर वित्तीय संस्थांमार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या मंजूर वित्तीय आराखड्यातील बदलास (शिल्लक व्याजाची व इक्विटीची रक्कम इ.) मान्यता.
- भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करणे. या कामासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता.
- राज्यातील खड्ड्यांचे तक्रार निवारण तत्काळ व्हावे, यासाठी खड्डे तक्रार निवारण प्रणाली विकसित.

## समृद्धी महामार्ग

महाराष्ट्राच्या दळणवळण, कृषी, व्यापार, पर्यटन, उद्योग, रोजगारनिर्मिती या क्षेत्रातील गतिमान प्रगतीसाठी सहायक ठरणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात येत आहे. राज्याच्या गतिशील समृद्धीसाठी या महामार्गामुळे मोठी मदत होणार आहे. या पार्श्वभूमीवर समृद्धी महामार्गाच्या कामास गती देऊन त्याचा नागपूर ते शिर्डी दरम्यानचा ५२० कि.मी.चा पहिला टप्पा-११, डिसेंबर २०२२ पासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. त्यामुळे आता नागपूर ते शिर्डी प्रवास ५ तासात करणे शक्य झाले आहे. ५०० कि.मी.पेक्षा सलग पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला हा देशातील पहिला प्रकल्प आहे. तसेच शिर्डी ते भरवीर दरम्यानचा ८० कि.मी.चा दुसरा टप्पा २६ मे २०२३ पासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. मागील वर्षात जनतेसाठी समृद्धी महामार्गातील एकूण ६०० कि.मी.चा महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे.

## महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग

महाराष्ट्र राज्यतील प्रस्तावित पवनार-पात्रादेवी (नागपूर-गोवा) महाराष्ट्र शक्तिपीठ द्रुतगती महामार्गासाठी तसेच नागपूर गोंदिया द्रुतगती महामार्ग, गोंदिया गडचिरोली द्रुतगती महामार्ग, नागपूर गडचिरोली द्रुतगती महामार्ग, नागपूर चंद्रपूर द्रुतगती महामार्ग यांचे व्यवहार्यता अभ्यास अहवाल, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी आवश्यक असणारा १७,५०० कोटी रुपयांचा निधी REC Limited मार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे.

पहिले वर्ष सुराज्याचे

## सार्वजनिक वितरण व्यवस्था

सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून जनसामान्यांना योग्य दरात अन्नधान्याचा शिधापुरवठा केल्या जातो. रास्त भाव दुकानांमधून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या या सेवांमध्ये बदलत्या काळानुसार अद्ययावत सुविधांचा समावेश करण्यात येणार आहे. राज्यातील रास्त भाव दुकानांच्या माध्यमातून आता पीएम-वाणी योजनेची (PM-Wi-Fi Accss Network Interface) अंमलबजावणी होणार आहे. दूरसंचार विभाग, संचार मंत्रालय, भारत सरकार यांनी सार्वजनिक वाय-फाय नेटवर्कद्वारे ब्रॉडबँडचा प्रसार करण्यासाठी सुरू केलेल्या पीएम-वाणी या योजनेची राज्यातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पालघर व सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांमधील रास्त भाव दुकानांमधून अंमलबजावणी, जागरूकता निर्माण करणे, रास्त भाव दुकानांची सार्वजनिक डेटा कार्यालय म्हणून कार्यरत करण्यास शासनस्तरावरून मान्यता देण्यात आली.

## अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम

राज्यातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, उस्मानाबाद, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना जानेवारी २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी १५०/- रुपये इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरण योजना कार्यान्वित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवर्षी किमान आधारभूत किमतीत होणाऱ्या वाढीनुसार केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या Cash Transfer of Food Subsidy Rules, २०१५ मधील तरतुदीनुसार प्रतिमाह प्रतिलाभार्थी सुधारित वाढीव रोख रक्कम (पुढील दशकाच्या पूर्णांकात) थेट हस्तांतरित करण्यात येणार आहे.

## शिधाजिन्नस संचांचे वितरण

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शेतकरी शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस प्रणालीद्वारे १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर पामतेल या चार शिधाजिन्नसांचा समावेश असलेल्या विशेष शिधाजिन्नस संचांचे वितरण करण्यात येत आहे. हा शिधाजिन्नस संच १००/- रुपये प्रति संच या दराने वितरित करण्यात येत आहे. तसेच दिवाळीनिमित्त शिधाजिन्नस संचांचे वितरण करण्यात आले.

## सर्वसामान्यांसाठी

- सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या (अंत्योदय अन्न योजना) व प्राधान्य कुटुंब योजना व राज्य योजनेच्या (आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील एपीएल शेतकरी) अशा सर्व शिधापत्रिकाधारकांना ऑनलाइन सेवेद्वारे ई-शिधापत्रिका सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय.
- राज्यातील तृतीयपंथीयांना नवीन शिधापत्रिका मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी सुलभ कार्यपद्धती अनुसरून त्यांना पात्रतेनुसार योग्य ती शिधापत्रिका देऊन त्यावरील अनुज्ञेय लाभ देण्याचा निर्णय.
- राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत फोर्टिफाईड तांदूळ एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ (दुसरा टप्पा) या कालावधीत राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये तसेच एप्रिल २०२३ ते मार्च, २०२४ या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यात वितरित करण्याचा निर्णय. या योजनेंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील १४ जिल्ह्यांमध्ये एकूण ५,४३,५३४.७९ मे.टन, तर तिसऱ्या टप्प्यात आजअखेर १,३४,२२५.६८ मे.टन फोर्टिफाईड तांदूळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वाटप.
- राज्य शासनाच्या 'शासन आपल्या दारी' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या धर्तीवर 'रेशन आपल्या दारी' ही योजना लवकरच सुरू करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना फिरत्या शिधावाटप दुकानाद्वारे (मोबाईल रेशन शॉप) अन्नधान्य वितरण करण्यात येणार आहे.
- किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत, खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांना (नोंदणीकृत शेतकऱ्यांनी धानाची विक्री केली असो वा नसो) धान उत्पादनाकरिता त्यांच्या धान लागवडीखालील जमीन धारणेनुसार प्रती हेक्टरी रु. १५,०००/- याप्रमाणे (दोन हेक्टरच्या मर्यादित) प्रोत्साहनपर राशी देण्याचा निर्णय. त्यानुसार आजअखेर पात्र ४,८१,९७० शेतकऱ्यांपैकी ४,७९,०६० शेतकऱ्यांना ८१८.४६ कोटी रुपये इतक्या रकमेचे वाटप.
- नाबार्ड व ग्रामीण पायाभूत विकास निधीअंतर्गत नवीन गोदामांचे, नाबार्ड व्यतिरिक्त इतर नवीन गोदामांसाठी आवश्यक अतिरिक्त बांधकाम व गोदाम दुरुस्ती या कामांचे बांधकाम यापुढे सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून करून घेण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता.
- राज्यातील शासकीय धान्य गोदामातील अन्नधान्य हाताळणुकीसाठी हमाल कंत्राट निश्चित करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

**शब्दांकन : वंदना थोरात-वारेगावकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

गेल्या वर्षभरात पायाभूत सुविधा, कृषी, उद्योग, आरोग्य, महिला व बालविकास या विविध विभागातील लोककल्याणकारी निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे. शेतकरी, कष्टकरी, दुर्बल, महिला या सर्व घटकांना आधार देणारे सरकार म्हणून आमच्या सरकारची निर्माण झालेली ओळख ही अतिशय भूषणावह बाब आहे. राज्यातील जनतेचा आमच्यावरील विश्वास ही आमच्या कामाची पावती आहे. या सरकारमध्ये राज्याच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख घटक असलेल्या कृषी विभागाची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडताना गेल्या वर्षभरात बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.



**अब्दुल सत्तार**

मंत्री, कृषी

# कृषी क्षेत्रात अग्रेसर



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाची प्रभावीपणे वाटचाल सुरू आहे. या एक वर्षाच्या कालावधीत केवळ कृषी विभागाच्याच नव्हे तर मदत व पुनर्वसन, पशुसंवर्धन, सहकार, जलसंपदा, जलसंधारण अशा विविध विभागांच्या निर्णयांच्या माध्यमातून बळीराजाला ताकद देण्यात आली आहे. या निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला आहे.

या वर्षपूर्तीच्या निमित्ताने मी राज्यातील शेतकरी बांधवांना विश्वास देऊ इच्छितो की, त्यांच्या हितासाठी, प्रगतीसाठी आणि विकासासाठी राज्य शासन सदैव कटिबद्ध आहे.

## अर्थसंकल्पात विशेष महत्त्व

शेतकऱ्यांना आपत्तीच्या काळात मदत आणि त्यासोबत शेतीसाठी आवश्यक तंत्रकुशलतेची जोड देण्याचा संकल्प राज्य शासनाने केला आहे. शेती, सहकार आणि सिंचनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कष्टाला राज्य शासनाची साथ या माध्यमातून मिळणार आहे. अर्थसंकल्पात कृषी या घटकाला अधिक महत्व देत शेतकऱ्यांप्रति असणारी बांधिलकीच व्यक्त केली आहे. विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची उन्नती व्हावी, यावर अर्थसंकल्पात दिलेला भर स्पष्टपणे दिसून येत आहे. बळीराजाच्या समृद्धीसाठी राज्य शासन सदैव पाठीशी असल्याचा विश्वास या माध्यमातून राज्यातील शेतकरी वर्गाला दिला आहे. नुकताच सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती असा निर्णय आपण घेतला आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना मदत करणे शक्य होणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात आमच्या सरकारने 'विकासाचे पंचामृत' जाहीर केले. 'शाश्वत शेती समृद्ध शेतकरी' या अमृतातून अन्नदाता बळीराजाच्या पाठीशी हे शासन भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही देणारे आहे. शेतकऱ्याला हक्काच्या मदतीची हमी आपण दिली आहे. आपण शेतकऱ्यांसाठी आणि कृषी विकासासाठी विविध योजना जाहीर केल्या आहेत.

## पीक विमा योजना

राज्यात सर्वसमावेशक पीक विमा योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पीक विमा योजनेचा लाभ देण्यात येईल. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत नुकसानभरपाई निश्चितीसाठी पिकांचे सरासरी नुकसान काढताना किमान ३० टक्के तंत्रज्ञान आधारित उत्पादन व पीककापणी प्रयोगांतर्गत प्राप्त होणाऱ्या उत्पादनाचा मेळ घालून उत्पादन निश्चित करण्यात येईल. ही योजना खरीप व रब्बी हंगाम २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी निविदा प्रक्रियेने राबवण्यात येईल. विमा हप्ता दरांच्या तुलनात्मक माहितीच्या आधारे नफा आणि तोटा शेअरिंग मॉडेल किंवा कप ॲण्ड कॅप मॉडेल (८०:११०) नुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या मान्यतेने उचित पर्यायासह राबवण्यात येईल.

योजनेसाठी अंमलबजावणी यंत्रणांची निवड झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देते वेळी मागील हंगामातील राज्य हिस्सा विमा हप्ता रकमेच्या ५० टक्के रक्कम केंद्र व राज्य शासनाच्या एस्क्रो अकाऊंटमध्ये जमा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी

सुलभ आणि प्रभावी कृषीविषयक धोरणे तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी आणि प्रश्न प्रशासनाने समजून घेणे, त्यावर उपाययोजना करून धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी प्रशासनातील अधिकारी, पदाधिकारी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत व्यतीत करून शेतकऱ्यांच्या समस्यांच्या मुळापर्यंत जाणार आहोत. यासाठी राज्याचा कृषिमंत्री या नात्याने 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राज्यभर माझ्या संकल्पनेतून राबवण्यात आला. १ सप्टेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत हा उपक्रम संपूर्ण राज्यभर राबवण्यात आला. या उपक्रमातून शेतकरी बांधवांच्या मनातील निराशा दूर व्हावी व शासन आपल्या पाठीशी असल्याचा विश्वास निर्माण व्हावा, हा उद्देश होता. मी स्वतः दुर्गम भागातील शेतकऱ्यांना भेटी देऊन त्यांच्या अडचणी, समस्या, प्रथा, परंपरा समजावून घेतल्या.

## नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

२०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषित केल्याप्रमाणे अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना राबवण्यात येईल. या योजनेतून प्रतिवर्ष रक्कम ६ हजार रुपये लाभ (दर चार महिन्यांनी रु. २,०००/- अशी वार्षिक समान तीन हप्त्यात) पात्र लाभार्थींच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात येतील. पहिला हप्ता एप्रिल ते जुलै २ हजार रुपये, दुसरा हप्ता ऑगस्ट ते नोव्हेंबर २ हजार रुपये, तिसरा हप्ता डिसेंबर ते मार्च २ हजार रुपये असे असणार आहे.



## किसान योजनेच्या कार्यपद्धतीत सुधारणा

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेमध्ये राज्याने अतिशय उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. या योजनेच्या कार्यपद्धतीत येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्यासाठी कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे या योजनेत प्राप्त होणाऱ्या लाभापासून एकही शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता शासन घेत आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत पी.एम.किसान पोर्टलवर नोंदणी करणे व पात्र लाभार्थींना मान्यता देण्यासंदर्भात कार्यपद्धतीत सुधारणा करण्यात आली. संनियंत्रणासाठी ग्रामस्तरीय, तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय समित्यादेखील गठित करण्यात येतील.

पहिले वर्ष सुराज्याचे

## नैसर्गिक शेती मिशनची व्याप्ती

राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनला मुदतवाढ देण्याचा तसेच राज्यभर व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेस २०२७-२८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येईल. या मिशनअंतर्गत १ हजार ८३ कोटी २९ लाख रुपये आर्थिक तरतुदीस; तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान व मोठ्या क्षेत्राचे प्रमाणीकरण योजनेंतर्गत केंद्र आणि राज्य शासनाचे मिळून ८३७ कोटी ७० लाख रुपये आर्थिक तरतुदीसही मान्यता देण्यात आली. यापूर्वी मिशनच्या पहिल्या टप्प्यात अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यांत हे मिशन राबवण्यात येत होते. आता याची व्याप्ती वाढवण्यात आल्यामुळे येत्या ३ वर्षांत राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्यात येईल. तसेच १००० जैवनिविष्ठा स्रोत केंद्रे स्थापन करण्यात येतील. मिशनच्या पहिल्या टप्प्यात ४१६ गट स्थापन झाले असून त्यातून त्यात ७,८५५ शेतकरी आहेत. या गटांचे भागभांडवल २ कोटी ४७ लाख इतके आहे. याशिवाय ३६ शेतकरी उत्पादक कंपन्यांचीदेखील स्थापना झाली आहे. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिलहोड तालुक्यातील मौजे कोटनांद्रा व डोईफोडा येथील शासकीय जागेवर मका संशोधन केंद्र सुरू करण्यात येईल. या मका संशोधन केंद्रासाठी २२.१८ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

## महा कृषीविकास योजना

शेतीच्या शाश्वत विकासासाठी सर्वसमावेशकता अत्यंत गरजेची आहे.

अभियानाच्या माध्यमातून पीक, फळपीक या मूलभूत घटकांच्या सर्व उत्पादनांपासून मूल्यवर्धनापर्यंतची प्रक्रिया, तसेच तालुका, जिल्हानिहाय शेतकरी गट समूहासाठी एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला आहे. यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. पुढील ५ वर्षांसाठी या योजनेकरिता ३ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

## मागेल त्याला शेततळे

'मागेल त्याला शेततळे' या योजनेला शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने उदंड प्रतिसाद लाभला आहे. शेतकऱ्यांची ही गरज ओळखून त्यात फळबागा, ठिबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर याचा समावेश करण्यात आला आहे. या वर्षी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## सानुग्रह अनुदान योजना

शेती व्यवसाय करताना होणाऱ्या अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबास अथवा शेतकऱ्यांना आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व वाहितीधारक शेतकरी आणि वाहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेल्या शेतकरी कुटुंबातील कोणताही एक सदस्य असे १० ते ७५ वर्ष वयोगटातील एकूण २ जणांकरिता ही योजना लागू करण्यात आली आहे. वाहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेल्या एक सदस्यामध्ये आई, वडील, शेतकऱ्याची पती-पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यांचा समावेश आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समिती याबाबत निर्णय घेऊन तालुका कृषी अधिकाऱ्यांमार्फत पुढील कार्यवाही होणार आहे. यंदाच्या अर्थसंकलपात यासाठी १२० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## स्मार्ट प्रकल्प

कृषी विभागाच्या माध्यमातून कृषिविषयक तंत्रज्ञान थेटपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आपण करत आहोत. कृषी यांत्रिकीकरण, अन्नप्रक्रिया उद्योग अशा माध्यमातून शेतकऱ्यांना प्रगतीकडे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेतकरी वर्गाचा आर्थिक आधार बळकट करण्याची गरज आहे. ही गरज ओळखूनच राज्य शासनाच्या कृषी विभागाने मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

## कृषी नवउद्योजक केंद्रस्थानी

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने विविध प्रयत्न केले जात आहेत. शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्यसाखळी विकसित करणे यास या प्रकल्पात महत्त्व दिले आहे. विशेषत: लहान आणि सीमांत शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या लहान, सीमांत शेतकरी आणि कृषी नवउद्योजकांच्या शेतमालाच्या सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी मदत करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट्य आहे. सध्या राज्यात एकूण ५७३ उपप्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून या उपप्रकल्पांची किंमत ११४९ कोटी २९ लाख इतकी असणार आहे.

शेतीशी संबंधित सर्व समस्यातून आपल्याला बळीराजाला पुढे न्यायचे आहे. यासाठी शाश्वत तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे खूप आग्रही आहेत. त्यादृष्टीने आपण नियोजन करीत आहोत. तसेच कृषी शिक्षण संशोधन आणि विद्यापीठांची संरचना आणि कार्यपद्धती अभ्यास करण्यासाठी माजी कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे.

## आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष

संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष आनंदाची बाब ही की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्रसंघाने हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा पौष्टिक तृणधान्य उत्पादक देश आहे. त्यामुळे हा उपक्रम यशस्वी करण्याची जबाबदारी आपल्या भारतीय लोकांच्या खांद्यावर आहे. हा केवळ उपक्रम न राहता ती जनचळवळ बनली पाहिजे. आपल्या राज्याने महाराष्ट्र मिलेट मिशनचा प्रारंभ करून त्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने राज्याने महाराष्ट्र श्री अन्न अभियान सुरू केले आहे. त्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

### शेती विकासासाठी...

- शेतकऱ्यांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाअंतर्गत येणाऱ्या नागपूर कृषी महाविद्यालयाच्या जागेवर सर्व सुविधांनी परिपूर्ण अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी कन्व्हेंशन केंद्राची स्थापना केली जाणार आहे. त्यासाठी २२७ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद प्रस्तावित.
- संत्री पिकावर प्रक्रिया करण्यासाठी नागपूर, काटोल, कळमेश्वर (जि. नागपूर), मोर्शी (जि. अमरावती) आणि बुलडाणा येथे संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारली जाणार.
- काजूच्या लागवडीपासून प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी काजू फळपीक विकास योजना राबवण्यात येणार आहे. पुढील ५ वर्षांसाठी या योजनेकरिता १,३२५ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित.
- औरंगाबाद जिल्ह्यात सिल्लोड तालुक्यात कोटनांद्रा व डोईफोडा येथे मका संशोधन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. तसेच हिंगोली जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे.
- राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन, आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकासासाठी विशेष कृती योजना राबवण्याचा निर्णय. येत्या खरीप हंगामापासून या कृती योजनेची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश.

# पारदर्शक आणि गतिमान

पहिले वर्ष सुराज्याचे



मातृभाषेतून दिलेले शिक्षण हे अधिक परिणामकारक ठरते हे सिद्ध झालेले आहे. भारतातही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात यावर भर देण्यात आला आहे. राज्यात देखील याची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागामार्फत पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने काम केले जात आहे. पुस्तकांमध्येच सरावासाठी कोरी पाने दिल्याने विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी केल्याचे मोठे समाधान आहे. याचबरोबरच शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आठवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना गणवेश, बूट आणि मोजे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन डिझाईनचा गणवेश स्काऊट गाईडच्या गणवेशाशी साधर्म्य साधणारा असल्याने तो त्यासाठीही वापरता येणार आहे.

## मातृभाषेतून शिक्षण

शालेय शिक्षण हा राज्य शासनाचा प्राधान्याचा विषय आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समिती गठित करण्यात आली असून मातृभाषेतून शिक्षणाबरोबरच बोलीभाषा संवर्धन तसेच इंग्रजी, विज्ञान, गणित या विषयांची आवड निर्माण करण्याचाही प्रयत्न केला जात आहे. इंजिनीअरिंग व मेडिकलचे विषयदेखील मातृभाषेतून शिकवले जाणार आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांमध्ये शिक्षण सुलभ होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला जात आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्य प्रशिक्षण दिले जात असून याच बळावर आपण जगाला कुशल मनुष्यबळ पुरवणारे राज्य बनू, असा मला विश्वास आहे.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून शासनामार्फत विविध सकारात्मक निर्णय घेतले जात आहेत. शाळेत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या मुलांच्या स्वागतासाठी 'पहिले पाऊल' उपक्रम राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत पाचपट वाढ करण्यात येऊन आता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना ५ हजार, तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना ७,५०० रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या वर्तन व जबाबदारीबाबत जागरूकता निर्माण व्हावी, चांगल्या सवयी, सहकार्यवृत्ती, नेतृत्वगुणांचा विकास व्हावा, या हेतूने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व खासगी अनुदानित संस्थांच्या मराठी माध्यमाच्या सर्व शाळांमध्ये शालेय परिपाठात आनंददायी अभ्यासक्रमाचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. राज्यात याची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शालेय शिक्षण विभाग पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने कार्यरत आहे. यावर्षी विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी केले, याचे मोठे समाधान आहे. मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर आणि संवर्धन व्हावे, यासाठी मराठी भाषा विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.**



**दीपक केसरकर**
मंत्री, शालेय शिक्षण, मराठी भाषा

विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्ससोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय लागण्याच्या उद्देशाने 'लेटस् चेंज' हा उपक्रम हाती घेण्यात आला. याद्वारे विद्यार्थ्यांना 'स्वच्छता मॉनिटर्स' बनण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नामांकित शिक्षण संस्थांसोबत करार करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र आणि सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क मॅनहटन कम्युनिटी कॉलेज ब्युरो यांच्यादरम्यान परस्पर शैक्षणिक सहकार्यासाठी करार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना शेतीचे ज्ञान मिळावे आणि शेतीचे महत्त्व समजावे, यासाठी शेती हा विषय शिकविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे गायन, नाट्य, वक्तृत्व यामध्ये आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी सेलिब्रिटी स्कुलसोबत टायअप करून सेलिब्रिटी स्कूलची संकल्पना राबवली जाणार आहे. सर्वांगीण विकासासाठी खेळ अत्यावश्यक असल्याने यास प्रोत्साहन देऊन आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडण्यासाठी पाठबळ दिले जात आहे. मानसिक विकासासाठी वाचन गरजेचे असते, यासाठी 'रिड महाराष्ट्र' उपक्रमाबरोबरच ग्रंथालयांची संख्या वाढवण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ५०० विद्यार्थीक्षमता असलेली नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा स्थापन केली जात आहे. भारतीय संस्कृतीतील आधारस्तंभाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने १० सप्टेंबर रोजी सर्व शाळांमध्ये 'आजी आजोबा दिवस' साजरा करण्यात येणार आहे.

## कॉपीमुक्त अभियान

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन पातळीत वाढ करण्यासाठी 'स्टार्स' प्रकल्पांतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण केंद्र येथे राज्य मूल्यमापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना उन्हाळी सुटीबाबत स्पष्टता असावी, या उद्देशाने यावर्षीपासून राज्यातील शाळा १५ जून, तर विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये पुढील तीन वर्षापर्यंत आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचे मराठी विषयाचे मूल्यांकन 'श्रेणी' स्वरूपात करण्यात येणार आहे. परीक्षांमध्ये कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना शाळेत सुलभरितीने प्रवेश मिळण्यासाठी अन्य शाळेतून विद्यार्थी प्रवेशासाठी मागणी करत असेल अशा विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याच्या दाखल्याअभावी प्रवेश नाकारण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. शाळाबाह्य विद्यार्थ्यांशी संबंधित विषयावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आहे आहे.

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ

खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वाढीव मानधन लागू करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. अंशतः अनुदानित रिक्त पदावर वैयक्तिक मान्यताप्राप्त अंशतः अनुदानित शिक्षकांचे सेवा ज्येष्ठतेनुसार अनुदानाच्या समान टप्प्यांवर समायोजन करण्यात येणार आहे. शिक्षण सेवकांच्या मानधनात दोन, चार व सहा हजारांऐवजी भरघोस वाढ केली आहे. आता प्राथमिक विद्यालयातील शिक्षण सेवकांना १६ हजार रुपये, माध्यमिकसाठी १८ हजार रुपये, तर उच्च माध्यमिकसाठी ते २० हजार रुपये इतके करण्यात आले आहे. खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये पहिल्या तीन वर्षांसाठी ग्रंथपालांना १४ हजार रुपये, प्रयोगशाळा सहायकांना १२ हजार रुपये, कनिष्ठ लिपिकांना १० हजार रुपये, तर केवळ अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती असलेल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना आठ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावरील कार्यरत कनिष्ठ महाविद्यालये वगळता अन्य कनिष्ठ महाविद्यालयांमधील पटसंख्या निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला, तर त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजूर करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

नुकताच ६१ हजार शिक्षकांच्या अनुदानाचा प्रश्न सोडवण्यात आला आहे. शिक्षकांचे समायोजन, शिक्षक पदभरतीत दिव्यांगांसाठी पदे सुनिश्चित करणे आदी निर्णयही घेण्यात आले आहेत. 'पवित्र' या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येणाऱ्या शिक्षक पदभरतीच्या अनुषंगाने विद्यमान तरतुदी सुधारित करण्याचा निर्णय घेण्यात आला. खासगी शाळांतील कर्मचाऱ्यांच्या पदांमध्ये दिव्यांगांसाठी पदे सुनिश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील कार्यरत अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन (रूपांतरण) करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## शाळांना भरघोस निधी

केंद्रपुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रम २०२२-२७ ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात येऊन यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली. राज्यातील आदर्श शाळा म्हणून विकसित करावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना मोठ्या बांधकामांसाठी निधी वितरित करण्यात आला आहे.



पुढील पिढीला रोजगार आणि स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा तसेच कौशल्य विकास विद्यापीठ सुरू करण्यात येत आहे. मुंबईत 'सेंटर फॉर एक्सलन्स' सुरू करण्यात येणार आहे. व्यावसायिक शिक्षणासाठी एचसीएल, टीसीएस, टीआयएसएस, ॲमेझॉन आदींसारख्या संस्थांशी करार झाले आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

जर्मनीसह युरोपियन देशांना विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. विविध क्षेत्रातील परस्पर सहकार्यासाठी जर्मनीचे शिष्टमंडळ नुकतेच मुंबईत येऊन गेले. मी स्वत: अधिकाऱ्यांसह जर्मनीच्या बाडेन वुर्टेमबर्ग येथे जाऊन आलो. यानंतर सामंजस्य कराराबाबतची प्रक्रिया सुरू झाली आहे. मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळण्यासाठी याचा निश्चित लाभ होईल.

राज्यातील घोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील त्रुटीत असलेल्या शाळांना अनुदानासाठी निधीसह पात्र करणे, यापूर्वी अनुदान घेत असलेल्या

शाळांना अनुदानाचा पुढील वाढीव टप्पा मंजूर करणे; तसेच अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्यासाठी ११६० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. उत्कृष्ट शाळा म्हणून 'पीएम श्री' योजनेंतर्गत शाळा विकसित करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ५१६ शाळांना केंद्राने मान्यता दिली असून या प्रत्येक शाळेवर १.५ कोटींपेक्षा अधिक खर्च करण्यात येईल. खासगी अनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. नवीन शाळांच्या मान्यतेसाठी ऑनलाइन प्रक्रिया राबवली जात असून स्वयंअर्थसाहाय्यित शाळांनाही मान्यता देण्यात येत आहे.

## मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न

मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर आणि भाषेचे संवर्धन व्हावे, यासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवत आहे. मराठी भाषा धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे. भाषेच्या प्रसार प्रचारासाठी दरवर्षी जानेवारी महिन्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत असून, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मराठी भाषा धोरण तयार करण्यात येत आहे. यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून हे धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि कला या परंपरांचा उत्सव साजरा व्हावा, मराठी संस्कृतीला उजाळा मिळावा, यासाठी भारतातील आणि भारताबाहेरील मराठी भाषकांचे 'मराठी तितुका मेळवावा' (विश्वसंमेलन) या वर्षी मुंबईत जानेवारीमध्ये आयोजित करण्यात आले. यास जगभरातून मोठा प्रतिसाद लाभला.

## मराठी भाषेची व्यापकता वाढीसाठी प्रयत्न

मराठी भाषा भवन उभारणीच्या कामास गती देण्यात येत असून मराठी भाषा विभागाच्या आधिपत्याखालील विविध कार्यालयांच्या उपक्रमांमध्ये व कामामध्ये समन्वय साधण्यासाठी ही कार्यालये एकाच इमारतीत आणण्याचा मानस आहे. 'पुस्तकाचे गाव विस्तार' ही योजना व्यापक करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'पुस्तकांचे गाव' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात पुस्तकाचे गाव सहा विभागीय स्तरावर सुरू करण्यात येणार आहे. वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्याने महानगरपालिका स्तरावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.




अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषकांसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी २५ लाख इतका निधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे, तर वारकरी साहित्य परिषदेमार्फत एक वेळची विशेष बाब म्हणून अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी २५ लाख रुपये इतके अर्थसाहाय्य मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली.

राज्य मराठी विकास संस्थेने नोंदणी केलेली मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्यास व त्यांना अनुदान देण्यास मान्यता देण्याचे विचाराधीन आहे. या मंडळांची व्याप्ती महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील; परंतु देशांतर्गत असेल. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि घटक संस्थांव्यतिरिक्त राज्यात होणाऱ्या अन्य साहित्य संमेलनांना देखील शासनामार्फत दिले जाणारे अनुदान यापुढे वाढवून देण्याचेही विचाराधीन आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकासासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, या हेतूने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालवधीमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. शासकीय कार्यालयांसह ज्या ठिकाणी मराठी भाषेचा वापर होतो अशा सर्व ठिकाणी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्णमालेचा, अक्षरमालेचा व अंकांचा शासनाने स्वीकार केला आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध असून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आश्वासक पावले उचलली जात आहेत.

## विज्ञान–तंत्रज्ञान वाढीवर भर

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान अवगत व्हावे म्हणून कॉम्प्युटर लॅब, टींकरिंग लॅब, रोबोटिक्स, आर्टिफिशिअल इंटलिजन्स, कोडींग-डिकोडींग अशा तंत्रज्ञानाशी संबंधित विविध सुविधा शाळांमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शासकीय प्राथमिक शाळांत लवकरच शिशुवाटिका-१ व शिशूवाटिका-२ टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र विविध क्षेत्रात अग्रस्थानी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात शिक्षण विभागातील विविध योजनांसाठी भरीव निधी मंजूर केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील बलवान भारत घडवण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी केली जाईल. त्यांच्या आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या विविध योजना, उपक्रमांच्या माध्यमातून आणि राज्य शासनाच्या भक्कम पाठबळाच्या आधारावर शिक्षणक्षेत्रातही अग्रस्थानी राहण्यासाठी आपण सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न करू या, असे आवाहन मी यानिमित्ताने करतो.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

सहकारी संस्थांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्मिती करून ग्रामीण वित्त, कृषी, पणन, औद्योगिक, सहकार, बाजार नियामक आणि कर्ज देण्यासारख्या बाबींशी संबंधित ग्रामीण पतपुरवठा क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सहकार विभागाकडून अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच सर्व वित्तीय संस्था, सेवा आणि भागीदार यांचा समावेश असलेल्या वित्तीय प्रणालीवर राज्य शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

# सहकारातून समृद्धी






**अतुल सावे**
मंत्री, सहकार, इतर मागास बहुजन कल्याण


'सहकारातून समृद्धी' हा विकासात्मक दृष्टिकोन वास्तवात उतरवण्यासाठी केंद्र सरकारने 'सहकार मंत्रालयाची' स्थापना करण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील शेतकऱ्यांना शेती कर्जपुरवठा करण्यात त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेची महत्त्वाची भूमिका आहे. यामध्ये राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हास्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व गावपातळीवर प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचा समावेश आहे.

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना

या योजनेंतर्गत अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपये प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आतापर्यंत जवळपास १४.०६ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर ५ हजार १०८ कोटी रुपये इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. आतापर्यंत जवळपास १४.०६ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर ५ हजार १०८ कोटी रुपये इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.

## भूविकास बँक कर्जमाफी

भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या ३४ हजार ७८८ शेतकऱ्यांनी, भूविकास बँकाकडून घेतलेल्या ९६४ कोटी १५ लाख रुपये इतक्या थकित रकमेची कर्जमाफी केली आहे. सुमारे ६९ हजार हेक्टर शेत जमिनीवरील भूविकास बँकांच्या कर्जाचा बोजा कमी केला आहे. तसेच भूविकास बँक कर्मचाऱ्यांची सुमारे २७५.४० कोटींची थकीत देणी अदा करून त्यापोटी या बँकांच्या ४० मालमत्ता शासनाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## सहकारी संस्थांचे संगणकीकरण

केंद्रपुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण या योजनेची अंमलबजावणी ५ वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील सुमारे १२ हजार प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण ३ वर्षांच्या कालावधीत करण्यात येणार आहे.

या योजनेंतर्गत राज्याचा हिस्सा ४० टक्के असून त्यानुसार राज्य हिश्श्याची एकूण रक्कम १५३.२५ कोटी रुपये इतकी होत आहे. त्यापैकी सन २०२२-२३ या वर्षात ५१.०८ कोटी रुपये उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## अटल अर्थसाहाय्य योजना

राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या व्यवसाय वृद्धीसाठी अटल अर्थसाहाय्य योजनेस मुदतवाढ दिली आहे. सहकार विकास महामंडळामार्फत कर्ज व अनुदानासाठी प्राप्त झालेल्या ५२९ प्रस्तावांपैकी स्थळपाहाणी पूर्ण झालेल्या ४२८ प्रस्तावांना कर्ज व अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मूल्यमापन अहवाल प्राप्त करून पुढील ५ वर्षांसाठी अमंलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## मानवी अभिहस्तांतरण

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कामकाजामध्ये गतिमानता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण महत्त्वाचे आहे. स्वयंपुनर्विकास करण्याचा निर्णय घेणाऱ्या संस्थांनी मानीव अभिहस्तांतरणाचा प्रस्ताव सादर केल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने या प्रस्तावांवर नोटीस दिल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या कालावधीमध्ये सक्षम अधिकाऱ्याने निर्णय देणे बंधनकारक आहे.

राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्वयंपुनर्विकास करताना येणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर एक तक्रार निवारण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये शासन निर्णय इतर प्रतिनिधी त्या जिल्ह्यातील को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशनच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ प्रतिनिधींचा सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्वयंपुनर्विकास करताना येणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणी तक्रारी आक्षेप सोडवण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर एक तक्रार निवारण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये शासन निर्णय इतर प्रतिनिधींसोबतच त्या जिल्ह्यातील को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशनच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ एका सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

## ऊस तोडणी यंत्रांना अनुदान

ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी ३२व्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीच्या झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत दोन वर्षाच्या कालावधीत ९०० ऊस तोडणी यंत्र खरेदीवर खरेदी किमतीच्या ४० टक्के अथवा ३५ लाख यापैकी जे कमी असेल ती रक्कम अनुदान स्वरूपात देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. या योजनेसाठी केंद्र शासनाच्या ६० टक्के म्हणजेच १९२.६७ कोटी रुपये व राज्य शासनाच्या ४० टक्के सामान्य १२८.५२ कोटी रुपये असे एकूण ३२१.३० कोटी रुपये इतक्या निधीची आवश्यकता आहे.

राज्यातील १२५० मॅटिक टन प्रतिदिन गाळप क्षमता असलेल्या कारखान्यांचे आधुनिकीकरण व विस्तारीकरण करून कमीत कमी २ हजार ५०० मॅट्रिक टन प्रतिदिन गाळप क्षमतेत वाढ.



## ऑईल कंपन्यांना इथेनॉल पुरवठा

सन २०२२-२३ मध्ये केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी १३२ कोटी लिटर इथेनॉल पुरवठा करण्याचे उद्दिष्टे दिले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातून पहिल्या तिमाहीमध्ये एप्रिल २०२३ अखेर सहकारी व खासगी कारखान्यांमार्फत ६२.९३ कोटी लिटर( ४७.६७) इथेनॉल पुरवठा ऑईल मार्केटिंग कंपन्यांना करण्यात आला आहे.

पहिले वर्ष सुराज्याचे

२०२१-२२ वर्षअखेर सहकारी व खासगी साखर कारखान्यांमार्फत ९८.९३ कोटी लिटर इथेनॉल पुरवठा करण्यात आलेला आहे.

## मार्जिन मनी लोन

साखर कारखान्यांना आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने व त्याद्वारे राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून महाराष्ट्र शासनामार्फत खेळत्या भागभांडवलसाठी मार्जिन मनी लोन उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सहकाराची पाळेमुळे महाराष्ट्रात खोलवर रुजल्यामुळे देशासाठी महाराष्ट्र राज्य सहकार क्षेत्रात पथदर्शी राज्य म्हणून भूमिका बजावत आहे.

## बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गातील लोकांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक ऊन्नतीसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे.

## व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांसाठी वसतिगृह

इतर मागास प्रवर्ग विमुक्त जाती, जमाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थीक्षमतेचे मुलांसाठी १ आणि मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्ह्यांच्या ७२ शासकीय वसतिगृह सुरू

करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वसतिगृहामुळे ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेणे सुलभ होणार आहे.

## निपुण भारत

विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळामधील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होणे तसेच विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या 'निपुण भारत' (National Initiative For Proficiency In Reading With (Understanding and Numeracy) या योजनेच्या धर्तीवर विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेतील मुख्याध्यापक/ शिक्षक / वसतिगृह अधिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

केंद्र सरकारच्या निपुण भारत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार प्राथमिक स्तरावर २०२६-२७ पर्यंत मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. सदरचे उद्दिष्ट विजाभज आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये पूर्ण करण्याचे या विभागाचे लक्ष्य आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक मुलांना जागतिक पातळीचे शिक्षण मिळावे, हे उद्दिष्ट ठेवून राज्य शासन काम करत आहे. त्याचा पहिला टप्पा निपुण भारत अंतर्गत FIN (fundamental literacy and numeracy) वर काम करण्यात आले आहे. इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या विजाभज आश्रमशाळेतील मुलांसोबत या सर्व बाबींवर विशेषत्त्वाने काम करण्याची गरज ओळखून जागतिक दर्जाचे भविष्य वेधी शिक्षण ही संकल्पना मांडली आहे.

## शिष्यवृत्ती संख्येत वाढ

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्ती संख्येत वाढ करून ही विद्यार्थी संख्या १० वरून ५० विद्यार्थी इतकी करण्यात आली आहे.

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

इयत्ता पाचवी ते सातवीमध्ये शिकत असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वाढ करून आता २५० रुपये केले आहे. तसेच आठवी ते दहावीमध्ये शिकत असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना या योजनेंतर्गत यापूर्वी १०० रुपये देण्यात येत होते सध्या ३०० रुपये करण्यात आली आहे, तर आठवी ते दहावीमध्ये शिकत असणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींना १०० रुपयांवरून ३०० रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील कुटुंबांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच त्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने

### महत्त्वाच्या घोषणा

- राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित अंतर्गत लिंगायत समाजासाठी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ.
- गुरव समाजासाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ.
- वसंतराव नाईक भटक्या जाती व विमुक्त जमाती महामंडळ मर्यादित अंतर्गत रामोशी समाजासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ.
- वडार समाजासाठी पैलवान के. मारुती चव्हाण वहार आर्थिक विकास महामंडळ या उपकंपन्या स्थापन करण्याची घोषणा केली आहे.
- वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाचे भागभांडवल २०० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये करण्यात आले आहे.
- महाराष्ट्र राज्य इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे भागभांडवल २५० कोटी रुपयांवरून २००० कोटी रुपये वाढवण्याची घोषणा केली आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग व नियोजन (मनरेगा) या दोन विभागांच्या योजनांचे अभिसरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील समाजास विकासाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे राहणीमान उंचावे, त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी. तसेच त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने त्यांना वैयक्तिक तसेच सामूहिकरीत्या घरकुलांचा लाभ देण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबवण्यात येते. या योजनेंतर्गत निधी अभावी घरकुल लाभार्थी वंचित राहू नयेत, या उद्देशाने सन २०२३-२४ करिता या योजनेच्या अर्थसंकल्पीय तरतूदीत १८० कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे.

## तांडा वस्त्यांना पायाभूत सुविधा

राज्यातील भटक्या लमाण, बंजारा, धनगर, पारधी या प्रवर्गातील समाजास स्थिर जीवन जगता यावे, याकरिता या समाजाचे वास्तव्य असलेल्या तांडे / वस्त्या यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार यांच्यासाठी ही योजना राबवण्यात येते. या योजनेंतर्गत जास्तीत जास्त तांडा/वस्त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सन २०२३-२४ करिता या योजनेसाठी अर्थसंकल्पात ३८० कोटी रुपये भरीव वाढ करण्यात आली आहे.

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याकरिता कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने वेबपोर्टल www.msobcfdc.org सुरू केलेले आहे. तसेच विभागाचे संकेतस्थळही सुरू आहे. हे संकेतस्थळ मराठी व इंग्रजी दोन्ही भाषातून आहे. https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in/en आहे. या संकेतस्थळावरील माहिती विद्यार्थी तसेच जनतेला अत्यंत उपयुक्त अशी आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

पहिले वर्ष सुराज्याचे

# विकासासाठी भरीव कामगिरी




शासनाला महसूल मिळवून देणाऱ्या विभागांपैकी राज्य उत्पादन शुल्क हा विभाग महत्त्वाच्या आहे. राज्यात मद्यनिर्मिती, घाऊक विक्री, किरकोळ विक्री इ. अनुज्ञप्त्या देणे व त्यांची तपासणी करून नियमन करणे, मद्यावरील कर गोळा करणे इ. कार्ये विभागामार्फत करण्यात येतात. तसेच राज्यातील अवैध मद्यनिर्मिती विक्री, वाहतूक, बनावट मद्य, परराज्यातून होणारी अवैध मद्याची तस्करी इ. विरुद्ध सज्ज राहून महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अन्वये फौजदारी गुन्हे दाखल करून त्याचे उच्चाटन व नियंत्रणाचे कामकाज या विभागामार्फत केले जाते.

मुंबई दारूबंदी कायदा, विष द्रव्य कायदा, १९१९, मुंबई औषधी द्रव्य (नियंत्रण) कायदा, १९५९, अंमली द्रव्य व मनोवैज्ञानिक पदार्थ अधिनियम १९८५ कायद्यांची अंमलबजावणी केली जाते. मुंबई दारूबंदी कायद्यांतर्गत केलेल्या नियमांतर्गत मद्य/मद्यार्क/ताडी इत्यादी बाबतच्या वेगवेगळ्या अनुज्ञप्ती विभागाकडून मंजूर केल्या जातात. तसेच मुंबई दारूबंदी कायदा १९४९ मधील तरतुदी व त्या अंतर्गत वेगवेगळे नियम, आदेश, निर्देश, सूचना यांच्या अधीन राहून केलेल्या तरतुदींप्रमाणे विशिष्ट कालावधीसाठी परवाना दिला जातो.

### महसुलात २५ टक्क्यांनी वाढ

गतवर्षीच्या तुलनेत २०२१-२२ या आर्थिक वर्षात १७,२२८ कोटी रुपये, तर २०२२-२३ वर्षात २१,५५० कोटी रुपये इतका महसूल या विभागाने मिळवला होता.

### विभागाचे सक्षमीकरण

परराज्यातील मद्य तस्करी रोखणे; तसेच थेट वाहतूक पास मंजूर करण्याकरिता एकूण १२ ठिकाणी सीमा तपासणी नाके आहेत. ही संख्या वाढवून २५ तपासणी नाके कार्यान्वित करण्यात येणार आहे. सध्या ४७ भरारी पथके कार्यरत असून आणखी दहा भरारी पथके नव्याने निर्माण करण्यात येणार आहेत. मागील वर्षी विभागाने गुन्हा अन्वेषणांतर्गत एकूण ५१,८०० इतके गुन्हे नोंदवले असून एकूण १६५.६० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विभागांमध्ये सध्या २७६ वाहने असून आणखी ८१ वाहने उपलब्ध होणार आहेत. मळी, मद्यार्क, मद्यनिर्मिती घटकांच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात येऊन त्याचे नियंत्रण आयुक्त कार्यालयाच्या ठिकाणी करण्यात येणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर धुळे व नंदुरबार जिल्ह्यात पोलीस विभागाच्या सहकार्याने वायरलेस यंत्रणा बसवण्याचा विभागाचा मानस आहे. मद्यार्क

**राज्याला सर्वांत जास्त महसूल मिळवून देणारा विभाग म्हणून या विभागाकडे पाहिले जाते. या विभागाच्या महसुलात गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी २५ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. राज्याला विकासाच्या वाटेवर कायम ठेवण्यासाठी या विभागाचा महसूल वाढवण्याबरोबरच अवैध मद्यविक्री निर्मिती व वाहतूक आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने थांबवण्याचा प्रयत्न या विभागाकडून केला जात आहे.**



**शंभूराज देसाई**
मंत्री, राज्य उत्पादन शुल्क



वाहतुकीचे टँकर डिजिटल लॉकने सीलबंद केले जातील. तसेच व्हेईकल ट्रॅकिंग यंत्रणा बसवून त्याचे नियंत्रण मुख्यालयात केले जाईल. नदी, नाले, खाडी किनारी नियमित होणाऱ्या हातभट्टी केंद्रांवर प्रभावीपणे छापे टाकण्याकरिता ड्रोनचा वापर करण्यात येईल.

## ऑनलाइन सेवा

सर्वसामान्यांची सरकारी दरबारातील कामे वेळेत पूर्ण व्हावीत व सरकार गतिमान व्हावे, या उद्देशाने २ ऑक्टोबर २०१५ पासून राज्यात सेवा हमी कायदा लागू झाला. महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतिकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५. या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्यांतर्गत विभागातील एकूण ५२ सेवा पुरवल्या जात आहेत. यापैकी ३८ सेवा ऑनलाइन पद्धतीने दिल्या जातात. उर्वरित १४ सेवा ऑनलाइन करण्याचे काम सुरू आहे. (अनुज्ञप्ती मंजुरी व नूतनीकरणाच्या संबंधी आहेत) मळी, मद्यार्क, मद्यनिर्मिती घटकांच्या ठिकाणचे सर्व व्यवहार संगणकीकरणाद्वारे करण्यात येणार आहेत. तसेच घाऊक विक्रेते यांचे व्यवहार सप्लाय चेन मॅनेजमेंट या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येणार आहेत.

## अनुज्ञप्तीचे सुलभीकरण

विभागांतर्गत शासनाने पारित केलेले महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ आणि त्याखालील वेगवेगळे नियम, आदेश, निर्देश, अटी व शर्ती इ. अंतर्गत मद्य/मद्यार्क/ताडी इत्यादींचे रीतसर व्यवहार करण्यासाठी वेगवेगळ्या अबकारी अनुज्ञप्ती मंजूर केल्या जातात. या अनुज्ञप्तींचे बदलत्या काळात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कक्षेत राहून सुलभीकरण केले जाते. यामुळे राज्य शासनाचा महसूल वाढीस हातभार लागेल; शिवाय शासनाचे मर्यादित व लोकाभिमुख दारूबंदीचे धोरण अबाधित राहील.

## स्वतंत्र तक्रार नियंत्रण कक्ष

नागरिकांना अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक व विक्रीबाबत तक्रार करण्यासाठी आयुक्त कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. याद्वारे तक्रारदार आपली तक्रार सहज नोंदवू शकतात. तक्रार करणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. तक्रार नोंदवण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९, दूरध्वनी क्रमांक ०२२२२६६०१५२ व व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

## हातभट्टी दारू निर्मुलनासाठी मोहीम

राज्यात हातभट्टी दारू निर्मूलनासाठी विशेष मोहीम मे २०२३ पासून राबवण्यात येत आहे. त्यामध्ये हातभट्टी दारू निर्मितीच्या मोठ्या केंद्रावर अचानक धाडी घालणे, ज्या ठिकाणी देशी दारू दुकान कार्यरत आहेत त्या ठिकाणापासून एक कि.मी. परिसरात हातभट्टी दारूविक्री होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली. हातभट्टी दारूनिर्मिती व्यवसाय करणाऱ्या गावात स्थानिक लोकप्रतिनिधी व पोलीस विभाग यांच्या समन्वयाने जनजागृती करून हातभट्टी दारूमुक्त गाव करण्याचा संकल्प पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न आहे. हातभट्टी विरुद्ध एकूण २५,०७७ गुन्हे नोंदवण्यात आलेले असून १३,९९६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

## गणवेश भत्ता वाढ

राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान ते उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना गणवेश विहित केलेला असून त्यासाठी २००४ पासून गणवेश भत्ता दिला जात आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गणवेश भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय लवकरच शासन घेणार आहे.

भत्ता वाढ करण्याचा निर्णय घेतला असून आता राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान ते उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुधारित दराने गणवेश भत्ता देण्यात येणार आहे. याअंतर्गत गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांना दर चार वर्षांनी ५,००० रुपये भत्ता वाढ, तर गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना दर चार वर्षांनी आणि गट-क मधील कर्मचाऱ्यांना दर दोन वर्षांनी ५,१६७ रुपये भत्ता वाढ देण्यात येणार आहे.

परराज्यातील मद्यावर एकूण १,२९४ गुन्हे नोंदवलेले आहेत, तर १,३८० आरोपींना अटक करण्यात आली असून त्यात जप्त मुद्देमालाची किंमत रु. ६७.६० कोटी इतकी आहे. अवैध मद्य व्यवसायात गुंतलेल्या सर्व व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत असून चांगल्या वर्तणुकीच्या बंधपत्रांबाबत एकूण ३,०९७ व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. सराईत गुन्हेगारांविरुद्ध एकूण ५६ प्रकरणांत एम.पी.डी.ए. अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. मोक्का अंतर्गत ४ प्रकरणे दाखल केलेली असून अशी कारवाई यापूर्वी विभागात झालेली नव्हती.

महामार्गांवरील अवैध ढाब्यांवरील अवैध मद्यविक्रीसंबंधी विभागाने ठोस कारवाई करून सदरची प्रकरणे मा. न्यायालयात तत्काळ दाखल करण्याची कार्यपद्धती अवलंबवण्यात येऊन त्यामधील गुन्हेगारांना ठोठावण्यात आलेल्या शिक्षेचे प्रमाण वाढवले आहे. त्यामुळे दोषसिद्धीचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा जास्त झाले.

**शब्दांकन : शैलजा पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी

# कुशल आणि रोजगारयुक्त






स्थानिक संस्कृतीचे जतन करून, समृद्ध व जबाबदार पर्यावरणपूरक पर्यटनावर भर देणे, राज्यातील प्रत्येक नोकरीइच्छुक उमेदवाराला रोजगार मिळवून देणे आणि महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी, या घटकांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबवत आहोत. गेल्या वर्षभरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली माझ्या अंतर्गत येणाऱ्या तिन्ही विभागांत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत.



**मंगल प्रभात लोढा**
मंत्री, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास

पर्यटन क्षेत्रात झालेल्या बदलांमुळे सध्याच्या धोरणात कालानुरूप बदल करून गुंतवणूक, रोजगार आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी राज्याचे नवीन पर्यटन धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. पर्यटन क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी 'आई' महिला पर्यटन धोरणास मान्यता देण्यात आली आहे.

## पर्यटन वाढीसाठी...

राज्यात पर्यटन वृद्धी व्हावी, स्थानिकांचा जास्तीत जास्त सहभाग, बेरोजगारांना स्वयंरोजगार मिळावा, या उद्देशाने 'व्हेकेशनल रेन्टल होम' तसेच 'होम स्टे योजना' तयार करण्यात आली आहे. पर्यटन क्षेत्रात नावीन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या सहभागीदारांना सन्मानित करण्यासाठी राज्य पर्यटन पुरस्कार योजना तयार करण्यात आली आहे. नवीन पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत जुन्नर तालुक्याला विशेष पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्यातील ३२ पर्यटन तालुक्यांना विशेष पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्याचे कामदेखील सुरू आहे. पर्यटकांच्या दृष्टीने आकर्षण ठरलेली डेक्कन ओडिसी ट्रेन पुन्हा चालू करण्यात येणार आहे. पर्यटकांना मुंबई दर्शन सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी उच्च प्रतीच्या हो हो बसेस सुरू करण्याचे नियोजन आहे. पर्यटक निवास, ग्रेप पार्क, नाशिक येथे कैरावान पार्कची निर्मिती करण्यात येणार आहे.

## पर्यटन महोत्सवांचे आयोजन

पर्यटक निवासांमध्ये विविध महोत्सव आयोजित करणे, पर्यटकांच्या सोयीसाठी आणि त्यांना माहिती मिळण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे मोबाइल ॲप तयार करणे, दिल्ली हाट येथे महाराष्ट्र खाद्य महोत्सव आयोजित करणे ही कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत. गणेश फेस्टिवल आणि स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत ६० वर्षे व त्याहून अधिक वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर येथे गणेश दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले होते. पर्यटकांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जैन टूर सर्किट सुरू करण्यात आले आहे. पर्यटन स्थळांवर होम स्टे, निवास व न्याहारी, हॉटेल्स व इतर पर्यटन भागधारक यांना रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध होण्यासाठी व स्थानिकांचा सहभाग वाढवण्यासाठी गुरु गोविंद महोत्सव, बिरसा मुंडा आदिवासी महोत्सव, महाबळेश्वर महोत्सव, काजवा महोत्सव इ. विविध ८ पर्यटन महोत्सवांचे आयोजन करण्यात आले होते. शिवनेरी, ता. जुन्नर येथे छत्रपती

## महिला व बालविकासाला प्राधान्य

महिला व बालविकास हा राज्याच्या विकासाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा घटक असून महिलांच्या सक्षमीकरणाकडे अधिक लक्ष देण्याचे महिला व बालविकास विभागाने ठरवले आहे. विशेषत: बालकांच्या सुरक्षित व सुदृढ आरोग्याकडे लक्ष देण्यास प्रथम प्राधान्य देण्यात येत आहे.

केंद्र पुरस्कृत उज्ज्वला व स्वाधार योजना विलीन करून केंद्र पुरस्कृत शक्तिसदन योजना सुरू करण्यात आली आहे. केंद्र शासनाने सद्य:स्थितीत एकूण ३३ शक्तिसदनांकरिता मान्यता दिली आहे. अनाथ आरक्षण धोरणासंबंधित अनाथ मुलांचे 'अ' आणि 'ब' प्रवर्ग एकत्र करून संस्थात्मक आणि 'क' प्रवर्गाचा संस्थाबाह्य असे दोन प्रवर्ग करून दोन्ही प्रवर्गातील अनाथांना शिक्षण व नोकरीमध्ये ३१ ऑक्टोबर २०२२ नंतर होणाऱ्या नवीन परीक्षांना १ टक्का आरक्षण लागू करण्यात आला आहे. महिला व बालविकास विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाचे राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीत निवड करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील घायपतवाडी येथे ३८ एकर जागेत भिक्षेकरी गृह होणार आहे. राज्यातील महिलांवरील अत्याचार व फसवणुकीबाबत सखोल चौकशी करून त्यामधील समस्या व त्यावरील उपाययोजनांसाठी महिला विकास सल्लागार समिती गठित करण्यात आली आहे.

नोंदणीकृत, अनोंदणीकृत विवाह, धार्मिक स्थळी करण्यात आलेले विवाह, पळून जाऊन केलेले विवाह अशा प्रकारे आंतरधर्मीय विवाह केलेल्या व्यक्तींची माहिती प्राप्त करणे. यासाठी आंतरधर्मीय विवाह-परिवार समन्वय समिती (राज्यस्तरीय) गठित करण्यात आली आहे.

केंद्रपुरस्कृत मिशन शक्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यात आल्या आहेत. या योजनेंतर्गत केंद्र हिस्सा १०० टक्के प्रमाणात संबल उपयोजना व केंद्र : राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात सामर्थ्य उपयोजना राबवण्यात येत आहे. संबल या उपयोजनेतील राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व साहाय्य मिळण्यासाठी १८१ या क्रमांकाची स्वतंत्र टोल फ्री १८१ महिला हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

शिवाजी महाराज यांचा ३९३ वा जन्मोत्सव-हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२३ उत्साहात पार पडला. येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## पर्यटन स्थळांचा विकास

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जागेत एकूण ८ ठिकाणी टेन्ट सिटी उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. गोसीखुर्द धरणालगत आंतरराष्ट्रीय दर्जाचे जल पर्यटन केंद्र उभारणे, नागपूर येथील सोनेगाव तलाव सौंदर्यीकरण, गजबादेवी मंदिर परिसरात पर्यटन सेवा उपलब्ध करून देणे, मुनावळे ता. जावळी, जि. सातारा येथे कोयना धरण परिसरात जलपर्यटन विकास करणे, वाणगंगा तलाव, मुंबई परिसर व भिलार, सातारा या गावास 'ब' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला.

## सामंजस्य करार

केंद्रसरकार पुरस्कृत स्वदेश दर्शन २.० अंतर्गत मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली असून केंद्र राज्य शासन व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या दरम्यान, महाराष्ट्र पर्यटन गुंतवणूक सुलभीकरण कक्ष स्थापन करण्यासाठी सिकॉमसोबत, वाकायामा प्रांत जपान व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या दरम्यान, गोसीखुर्द जि. भंडारा येथे जल पर्यटन विकास करण्याकरिता जलसंपदा विभागासोबत सामंजस्य करार पार पडले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणादायी इतिहासाची माहिती सर्वांना व्हावी, यासाठी महाराष्ट्र शासन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत राज्यात शिवनेरी, गोराई, बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व रामटेक येथे सहा ठिकाणी शिवसृष्टी, उद्यान, संग्रहालय व शिवकालीन थिम पार्क उभारणार आहे. या सर्व कामांसाठी ४१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून एक वर्षभरात सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

## रोजगार मेळाव्यांचे आयोजन

कुशल आणि रोजगारयुक्त महाराष्ट्र घडवण्याच्या उद्देशाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थी, युवक-युवतींसाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांत जिल्हास्तरावर; तसेच राज्यातील सर्व २८८ मतदारसंघात ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरांचे आयोजन करण्यात आले. विभागामार्फत राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. एप्रिल २०२३ मध्ये १३ हजार ०८२ बेरोजगार उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला. विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरू केले आहे. नोकरीइच्छुक उमेदवारांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

राज्यातील युवक-युवतींना रोजगाराची उपलब्धता व्हावी, यासाठी राज्यातील ४४ नामांकित एजन्सिज् यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमार्फत राज्यातील १ लाख २१ हजार युवक, युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

## स्किल सेंटरची उभारणी

जागतिक बँकेच्या तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यातून विभागात विविध प्रकल्प, उपक्रम राबवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १ मॉडेल आयटीआय आणि राज्यात मुलींसाठी १७ मॉडेल आयटीआय असे एकूण ५३ मॉडेल आयटीआय निर्माण करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर सर्व सुविधांनी युक्त असे जागतिक स्किल सेंटर उभारण्यात येणार आहे. कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठात नवनवीन

पहिले वर्ष सुराज्याचे

अभ्यासक्रम सुरू होत आहेत. विद्यापीठासाठी पनवेल येथे इमारत उभारण्यात येणार असून नुकतेच त्याचे भूमीपूजन करण्यात आले आहे.

## रोजगार निर्मिती

युवकांमधील नवनवीन संकल्पनांवर आधारित स्टार्टअप्स, युनिकॉर्न्स यांना चालना देण्यात येत आहे. महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप कॅपिटल आहे. देशात नव्याने सुरू झालेल्या ४२ युनिकॉर्नपैकी ११ युनिकॉर्न महाराष्ट्रातील आहेत. देशातील एकूण ८८ हजार १३६ स्टार्टअप्सपैकी सर्वाधिक १६ हजार २५० स्टार्टअप (१८ टक्के) महाराष्ट्रातील आहेत.

कौशल्यवर्धनाद्वारे युवकांना रोजगारक्षम बनविण्याकरिता पुढील तीन वर्षात २ हजार ३०७ कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करून राज्यातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करण्यात येईल. तसेच ७५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण करण्यासाठी ६१० कोटी रुपयांचा प्रकल्प राबवण्यात येईल. राज्यातील पर्यटनाला चालना देताना प्रत्येक जिल्ह्यातील किमान ५०० युवकांना जलपर्यटन, कृषी पर्यटन, कॅराव्हॅन पर्यटन, साहसी पर्यटन, शाश्वत पर्यटन तसेच आदरातिथ्य क्षेत्रात प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करण्यात येणार आहे. अर्थसंकल्पात चतुर्थ अमृत ‘रोजगार निर्मिती : सक्षम, कुशल-रोजगारक्षम युवा’ यासाठी कार्यक्रम खर्चाकरिता एकूण ११ हजार ६५८ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

## वसतिगृहांना मान्यता

खुल्या प्रवर्गातील पदावरील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी ‘मिशन शक्ती’ या योजनेच्या सखी निवास या घटक योजनेंतर्गत ५० वसतिगृहांना मान्यता देण्यात आली आहे. या योजनेसाठी प्रशासकीय खर्च, इमारत भाडे, पाळणा व्यवस्थापन याकरिताचा खर्च केंद्र:राज्य यांच्या ६०:४० या हिश्श्याच्या प्रमाणात भागवण्यात येणार आहे.

राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये सुरू असलेले ३७ वन स्टॉप सेंटर्स आणि केंद्र शासनाच्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झालेल्या मुंबई उपनगर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर व ठाणे या पाच जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक, अशी एकूण ४२ वन स्टॉप सेंटर्स संबल या उपयोजनेचा वन स्टॉप सेंटर या घटक योजनेंतर्गत सुरू करण्यात येणार आहेत.

## महिलांचा सत्कार

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ मे रोजी प्रत्येक ग्रामपंचायत, गट ग्रामपंचायत क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करत असलेल्या दोन कर्तबगार महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्यातील सन २०२३ मध्ये २७,८९७ ग्रामपंचायतीमधील सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या ५५,७९४ महिलांचा सत्कार करण्यात आला.



बालसंगोपन योजनेंतर्गत प्रती बालक देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात रु.१,१००/- वरून रु.२,२५०/- इतकी तसेच या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना सहायक अनुदानात प्रति बालक दरमहा रु.१२५/- वरून रु.२५०/- इतकी वाढ आली आहे. बालसंगोपन योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून या योजनेचे नामांतर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना असे करण्यात आले आहे.

## अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ

एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील मिनी अंगणवाडी सेविका यांना उन्हाळी व दिवाळी सुट्टी लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. अंगणवाडी दत्तक धोरण राबवण्यात येत आहे. ४ ऑक्टोबर २०२२ पासून राज्यात विविध सामाजिक संस्थांमार्फत ४,१२८ अंगणवाड्या दत्तक घेण्यात आल्या आहेत. अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा रु. ८,३२५ वरून रु. १०,०००, मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा रु. ५,९७५ वरून रु. ७,२०० व अंगणवाडी मदतनीस यांचे मानधन दरमहा रु. ४,४२५ वरून रु. ५,५०० पर्यंत मानधनात वाढ करण्यात आली आहे.

महिला आणि मुलींना त्यांच्या जीवनातील सर्व क्षेत्रात आवश्यक त्या संधी व सुविधा उपलब्ध करून देणे आणि सामाजिक, आर्थिक व इतर क्षेत्रात विकास साधणे याबाबतचा राज्याचा चौथ्या महिला धोरणाचा मसुदा तयार करण्यात येत आहे. बालकांची काळजी व संरक्षणासाठी ‘राज्य बाल निधी’ स्थापन करण्यात आला आहे. या सर्व निर्णयातून सातत्यपूर्ण प्रयत्नातून महिलांच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे–खंडारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्य मंत्रिमंडळाच्या २८ जून २०२३ रोजीच्या बैठकीत सार्वजनिक बांधकाम, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, जलसंपदा, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, कामगार, कृषी, सामान्य प्रशासन, जलसंपदा, महसूल, विधि व न्याय, उच्च व तंत्रशिक्षण, वित्त, गृहनिर्माण, परिवहन, वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण, जलसंधारण, ग्रामविकास, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, गृह आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...**

# विकासाच्या दिशेने...

- वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूला 'स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू' असे नाव देण्यास मान्यता.
- शिवडी ते न्हावा-शेवा या मुंबई पारबंदर प्रकल्प एमटीएचएलचे 'अटलबिहारी वाजपेयी स्मृती शिवडी-न्हावा-शेवा अटल सेतू' असे नामकरण करण्यास मान्यता.
- राज्यात ७०० ठिकाणी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' योजना राबवण्यास मान्यता.
- भीमा नदीच्या भामा या उपनदीवरील भामा-आसखेड पाटबंधारे प्रकल्पाचा उजवा व डावा हे दोन्ही कालवे रद्द करण्याचा निर्णय.
- राज्यातील महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना आणि केंद्राची आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचे एकत्रीकरण करून, यात नागरिकांना आरोग्य संरक्षण ५ लाख रुपये एवढे करण्याचा निर्णय.
- संजय गांधी निराधार अनुदान योजनेत आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत दरमहा ५०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय.
- राज्यातील कोट्यवधी असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी असंघटित कामगार कल्याण महामंडळ आणि त्याच्या अंतर्गत व्यवसाय, उद्योग क्षेत्रनिहाय ३९ आभासी मंडळे स्थापन करण्याचा निर्णय.
- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा कार्यान्वित करून, त्यामध्ये विदर्भातील उर्वरित पाच जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबवण्यास मान्यता.
- औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे भव्य स्मारक उभारण्याच्या निर्णयास मान्यता.
- राज्यात पुरामुळे मोठे नुकसान टाळण्यासाठी नद्यांमधील गाळ व वाळू तसेच राडा-रोडा बाहेर काढण्याबाबत स्वतंत्र धोरणास मान्यता.
- मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाची मार्गिका धारावी येथून जाणार असून, त्याकरिता येथील ३,३०८ चौरस मीटर इतका भूखंड एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यास मान्यता.
- शासनाने दिलेल्या जमीन किंवा भूखंडाच्या हस्तांतरणाबाबत आकारावयाच्या अनर्जित रकमेसाठी एकत्रित सुधारित धोरण राबवण्यास मान्यता.
- राज्यात विविध सात ठिकाणी न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय.
- राज्यातील शासकीय, अशासकीय अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तंत्र निकेतनांमध्ये अद्ययावत उत्कृष्टता केंद्र - सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यास मान्यता.
- सीडबी क्लस्टर डेव्हलपमेंट फंड (एससीडीएफ) योजनेंतर्गत सूक्ष्म, लघु, व मध्यम उद्योगांकरिता पायाभूत सुविधांसाठी प्रकल्प राबवण्यास मान्यता.
- मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत बीडीडी चाळ परिसरातील अनिवासी झोपडीधारक, स्टॉलधारक यांची पात्रता निश्चित करण्यास मान्यता.
- जालना-जळगाव या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी ३,५५२ कोटी रुपये खर्चास मान्यता.
- राज्यात ९ जिल्ह्यांमध्ये नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व त्यांना संलग्न ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय सुरू करण्यास मान्यता.
- बुलडाणा येथे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय.
- केंद्र शासनाच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान १५३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राबवण्यास मान्यता.
- राज्यातील दारिद्र्यरेषेवरील पालकांच्या पहिली ते आठवीत शिकणाऱ्या मुलांनादेखील मोफत गणवेश.
- औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील मौजे वांजरगाव तसेच नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील सावकी आणि विठेवाडी अशा तीन कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना मान्यता.
- राज्यात लिंबूवर्गीय फळांच्या संशोधनाला बळ देण्यासाठी लिंबूवर्गीय फळपिकांसाठी अमरावती जिल्ह्यातील मासोद (ता. चांदूर बाजार) येथे सिट्रस इस्टेट तयार करण्याचा निर्णय.
- औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील गंगापूर उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता.
- ग्रामपंचायत निवडणुकीसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्यास मान्यता.
- पाकिस्तानने त्यांच्या सागरी हद्दीत पकडलेल्या महाराष्ट्रातील मच्छीमारांच्या कुटुंबीयांना दरमहा ३०० रुपये देण्याचा निर्णय.
- राज्यात पशु, दुग्ध आणि मत्स्यव्यवसायात अधिक प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन, खासगी पशु वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्याचा निर्णय.

**– टीम लोकराज्य**



निर्णय वेगवान
#महाराष्ट्र गतिमान
श्री. नरेंद्र मोदी
गतिमान प्रवासाचे प्रमुख टप्पे
श्री. देवेंद्र फडणवीस
श्री. एकनाथ शिंदे
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

### अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज